
Agatha
Christie
वृषाली जोशी
Dead Man's
Mirror
मृत माणसाचा आरसा
SoRRY

# DEAD MAN’S MIRROR

# मृत माणसाचा आरसा

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

मृत माणसाचा आरसा

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ ऑक्टोबर २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.


पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या

गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. 'The Murder of Roger Ackroyd' या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

प्रस्तुत कादंबरी ही अगाथा ख्रिस्तीच्या सर्वोत्कृष्ट कादंबऱ्यांपैकी मानली जाते..

# DEAD MAN'S MIRROR



# मृत माणसाचा आरसा

## एक

ती सदनिका आधुनिक होती. त्यातील सामानसुद्धा आधुनिक होते. हातवाल्या खुर्चा चौकोनी होत्या. सरळ खुर्चा टोके असलेल्या होत्या. एक लिहायचे आधुनिक टेबल खिडकीसमोर होते आणि त्याच्या शेजारी एक वयाने मोठा पण चणीने लहान मनुष्य बसला होता. त्या खोलीत फक्त त्याचे डोके चौकोनी नव्हते. ते अंड्याच्या आकाराचे होते.

हर्क्युल पायरो एक पत्र वाचत होता.

स्टेशनः व्हीम्पर्ले हॅमबोरोग सेंट जॉन हॅमबोरोग जवळ हॅमबोरोग सेंट मेरी, वेस्टशायर सप्टे २४, १९३६

तार

*मिस्टर हर्क्युल पायरो*

*प्रिय सर, खूप नाजूकपणे व गुपित न फोडता काम करायला लागेल, अशी एक गोष्ट उपटली आहे. मी तुमचे बरेच नाव ऐकले आहे आणि हे काम तुमच्याकडे सुपूर्द करायचे ठरवले आहे. मी काही गैरकृत्यांची शिकार बनलो आहे, असे मला वाटते आहे. पण कुटुंबाच्या हितासाठी मी पोलिसात जाऊ इच्छित नाही. मी माझ्या परीने माझ्या कामात सर्व काळजी घेतो आहेच. पण तुम्हाला ही*

*तार मिळाल्यावर काम सुरु करायच्या तयारीनेच तुम्ही इथे या. तुम्ही या पत्राला काही उत्तर दिले नाहीत, तर मी तुमचा ऋणी राहीन."*

*तुमचा विश्वासू,*

*गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर*

पायरोच्या भुवया कपाळावरून वर जवळजवळ केसात जात नाहीशा झाल्या. त्याने चौकशी केली, "हा गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर कोण आहे?"

त्याने पुस्तकांचे कपाट उघडून, एक मोठे जाडे पुस्तक काढले. त्याला हवे असलेले त्याला सहज सापडले.

चेव्हेनिक्स-गोर, सर फ्रान्सिस झेविअर, १६९४ ची १० वी तुकडी, आधी १७ वा लान्सर असलेला --- पत्नी व्हेन्डा एलिझाबेथ --- १९१४ ते १९१८ युरोपिअन युद्धात काम केलेले कर्नल फ्रेडरिक यांची मुलगी --- छंद प्रवास, शिकार --- पत्ता हॅमबोरोग सेंट मेरी, वेस्टशायर

पायरोने थोड्या असमाधानकारक रीतीने डोके हलवले. एक दोन मिनिटे तो विचारात हरवला. मग त्याने टेबलाशी जाऊन, खण उघडला आणि आमंत्रण कार्डांची चळत बाहेर काढली. त्याचा चेहरा खुलला. अगदी योग्य वेळी हे काम माझ्याकडे आले आहे. तो तिकडे नक्की असेल

## दोन

एका बाईसाहेबांनी पायरोचे मोठ्या आवाजात अभिनंदन केले.

“मिस्टर पायरो, शेवटी तुम्ही यायचे जमवलेत तर! हे चांगले झाले.”

पायरो वाकून बोलला, “बाईसाहेब, मी हा माझा गौरव समजतो.”

अनेक महत्वाच्या व चांगल्या लोकांपासून तो सटकला --- प्रसिद्ध परदेशी दूत, प्रसिद्ध नटी आणि उत्कृष्ट खेळाडू --- आणि शेवटी तो शोधत असलेला माणूस त्याला सापडला. आणि तो दुसरा तिसरा कुणी नसून, ‘शिवाय हजर’ असलेला पाहुणा मिस्टर सॅटर्थवैट होता.

मिस्टर सॅटर्थवैट मित्रत्वाने चिवचिवला. “आवडत्या बाईसाहेब --- मला त्यांच्या मेजवान्या नेहमीच आवडतात --- काय व्यक्तिमत्व आहे! मला काय म्हणायचे आहे, तुम्हाला समजले असेल. काही वर्षांपूर्वी मला कोर्सिकामध्ये त्यांच्यातील खूप काही दिसले होते --- “

मिस्टर सॅटर्थवैट यांच्या उच्च वर्तुळातील ओळखींपैकी लोकांच्या उल्लेखाने अर्थातच त्यांचे संभाषण भरलेले होते. असे

असू शकेल की कधीतरी त्यांना मेसर्स जोन्स ब्राऊन आणि रॉबिन्सन यांच्या बरोबर आनंद मिळाला असेल. पण असे असेल तर, त्यांनी तसे काही म्हटले नाही. तो उच्च सामाजिक दर्जा असलेल्या माणसांना व श्रीमंत माणसांना नको इतका मान देणारा होता. परंतु त्याचे तेवढेच वर्णन करणे, म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे होते. तरीही मिस्टर सॅटर्थवैट यांचे मानवी स्वभावाचे निरीक्षण चांगले होते. नुसते माणसाकडे बघून ते जे आडाखे बांधत, त्यावरून मिस्टर सॅटर्थवैट यांना खूप काही माहिती असल्याचे लक्षात येई.

“माझ्या आवडत्या लोकांनो, मी तुम्हाला बघून अनेक वर्षे उलटली आहेत. ‘क्रोज नेस्ट’ या व्यवसायात असल्यापासून, मी तुम्हाला जवळून काम करतांना पाहिले आहे व त्याबद्दल मला अभिमान आहे. मला तेव्हापासून असे वाटते, की तसे पाहिले, तर मी तुम्हाला ओळखतो. मी मेरी बाईसाहेबांना फक्त गेल्या आठवड्यात पाहिले. आणि त्या सुंदर आणि फुलांसारख्या सुगंध दरवळणाऱ्या आहेत.”

त्यावेळच्या एक दोन प्रकरणातून वरवर गेल्यावर --- उमराव अर्लच्या मुलीचे चांगला अंदाज नसलेले वर्तन असो वा त्याच्या हाताखालील व्हीस्काऊंटचे दुःख व्यक्त करणारे वर्तन असो.

गेरव्हास चेव्हेनिक्स-गोरचे नाव माहिती करून देण्यात पायरो यशस्वी झाला.

मिस्टर सॅटर्थवैट यांनी लगेच शेरा मारला, “ओहो, आता अशी एक व्यक्ती येत आहे, तुम्हाला ती आवडते का ते बघा. शेवटचा [कमी दर्जाचा] उमराव, असे त्याचे टोपण नाव आहे.”

“कृपया, परत सांगा. मला समजले नाही.”

मिस्टर सॅटर्थवैट दानशूरपणाचा आव आणत, त्या न समजणाऱ्या परदेशी माणसापुढे ताठ उभे रहात, बोलले, “हा विनोद आहे, कळले का --- हा विनोद आहे. सहजतेने तो इंग्लंडचा शेवटचा [कमी दर्जाचा] उमराव आहे पण तो काही युगाच्या शेवटाचे प्रतिनिधित्व करत नाही. वाईट, धीट उमराव --- मागच्या शतकातील कादंबऱ्यांमधील प्रसिद्ध, वेडा, बेजबाबदार व धसमुसळा उमराव आहे. अशक्य भासणारे धोके घेऊन, ते जिंकून दाखवणारा मनुष्य आहे.”

त्याला काय म्हणायचे आहे, ते तो अजून स्पष्ट करत राहिला. अलीकडील काही वर्षात गेरव्हास चेव्हेनिक्स-गोरने व्यापारी बोटीने सबंध जगाचा गोल प्रवास केला आहे. ध्रुव प्रदेशातही त्याने मोहीम मारली आहे. आधुनिक शस्त्रात्रे घेऊन दोघांमधील मानाच्या असलेल्या स्पर्धेसाठी त्याने दुसऱ्याला आव्हान दिले आहे.

त्याच्या आवडत्या घोडीवर स्वार होऊन, राजवाड्याच्या जिन्यावर, चढण्याचे दुःसाहस त्याने केले आहे. एकदा त्याने उडी मारणाऱ्या एका प्रसिद्ध नटीला एका पेटाऱ्यावरून रंगमंचावर स्वतः उडी मारतांना बरोबर पकडले आहे. त्याच्या बाबतीत असे अनेक प्रसंग आहेत.

मिस्टर सॅटर्थवैट पुढे सांगत राहिले, “सर गाय डे चेव्हेनिक्स मध्ययुगीन मुसलमानांविरुद्ध्च्या पहिल्या आक्रमणांमध्ये सहभागी झाला. अरेरे, आता ते सर्व शेवटाला आल्यासारखे दिसते आहे. वयस्क गेरव्हास हा शेवटचा चेव्हेनिक्स-गोर आहे.”

“त्याची संपत्ती लयाला गेली का?”

“नाही कणभरसुद्धा नाही. गेरव्हास हा अतिशय श्रीमंत होता. भले मोठे घर होते. कोळशाच्या खाणी होत्या. शिवाय दक्षिण अमेरिकेतील पेरू की अजून कुठे असलेल्या ठिकाणी एका खाणीवरदेखील तो मालकी हक्क सांगत होता. जेव्हा तो तरुण मनुष्य होता, तेव्हा नशीब त्याच्या बाजूने होते. आश्चर्यकारक माणूस! त्याने करायला घेतलेल्या प्रत्येक कामात तो नशीबवान ठरला.”

“आता अर्थात, तो वयाने मोठा असेल?”

मिस्टर सॅटर्थवैट डोके हलवत बोलला, “हो. गरीब बिचारा गेरव्हास! बहुतेक लोक तुम्हाला तो टोप्या विकणाऱ्यांसारखा वेडा असल्याचे सांगतील. एक प्रकारे, ते खरे आहे. तो वेडा आहे --- पण त्याच्यात काही मानसिक त्रुटी आहे म्हणून नव्हे, तर तो थोडा वेगळा म्हणजे असामान्यपणे वागतो म्हणून! तो नेहमीच मोठा सत्चारित्र्याचा माणूस राहिला आहे.”

पायरोने सुचवले, “आणि जशी वर्षे जातील तसे सत्चारीत्र्य विचित्रपणात बदलत जाते का?”

“खरे आहे. गरीब बिचाऱ्या गेरव्हासच्या बाबतीत तसेच झाले आहे.”

“कदाचित त्याने त्याचे महत्व वाढवण्याची कल्पना जास्त फुगवली असेल का?”

“बरोबर. मला वाटते, गेरव्हासच्या मनात असे असावे, की जग हे दोन भागात विभागले गेले आहे. एका भागात चेव्हेनिक्स-गोर आहे आणि दुसऱ्या भागात सर्व इतर लोक.”

“कुटुंबाची फारच ताणलेली कल्पना!”

“हो. सगळे चेव्हेनिक्स-गोर राक्षसासारखे उन्मत्त आहेत --- ते म्हणतील तो कायदा, असे समजणारे. गेरव्हास हा त्यांच्यातील

शेवटचा असल्याने, फार वाईट ठरला आहे. खरे तर तुम्ही त्याला बोलताना ऐकलेत, तर तुम्ही त्याला सर्वशक्तिमान समजाल."

पायरोने विचारपूर्वक हळूहळू त्याचे डोके हलवले.

"हो. मी कल्पना केली. असे बघा, मला त्याच्याकडून पत्र आले होते. ते फार वेगळे आहे. ते मागणी करत नसून मला आज्ञा देत आहे."

मिस्टर सॅटर्थवैट गालातल्या गालात हसत बोलले, "राजाज्ञा!"

"बरोबर तसेच. सर गेरव्हासला असे वाटल्याचे जाणवत नाही, की मी हर्क्युल पायरो हा महत्वाचा माणूस आहे. अगणित समस्या सोडवलेला माणूस आहे. मी माझी सर्व कामे बाजूला ठेऊन, आज्ञाधारक कुत्र्यासारखा घाईने --- कोणी नसल्यासारखा, फक्त मिळणाऱ्या पैशांच्या आशेने येईन, असे त्याला वाटले तरी कसे?"

मिस्टर सॅटर्थवैटनी हसू दाबण्याच्या प्रयत्नात ओठ चावला. अहंमन्यतेचा प्रश्न आल्यामुळे, हर्क्युल पायरो आणि गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर यांच्यात निवड करायचा काही प्रश्न नव्हता.

तो पुटपुटला, "अर्थात, जर बोलावण्याचे कारण तातडीचे असते तर --- ?"

पायरोचे हात जोराने हालचाल करत वर गेले. “ते तसे नव्हते. त्याला माझी गरज असल्यामुळे, त्याच्या इच्छेप्रमाणे मला वागावे लागले, एवढेच. त्यामुळे मी दुखावला गेलो.”

मिस्टर हर्क्युल पायरोने रागाच्या शब्दांत ते सांगण्यापेक्षा, परत हात उंचावून सांगितले.

मिस्टर सॅटर्थवैट म्हणाले, “मी धरून चालतो, की तुम्ही नकार दिला?”

पायरो सावकाश बोलला, “मला अजून तसे करायला संधी मिळाली नाही.”

“पण तुम्ही नकार देणार?”

लहानशा मनुष्याच्या चेहऱ्यावर नवीन भाव उमटले. कोड्यात पडल्यासारख्या त्याच्या भुवया उंचावल्या. तो म्हणाला, “मी मला कसे व्यक्त करू? नकार द्यावा --- हो. असे मला पहिल्यांदा वाटत होते. पण मला कळत नाही --- एखाद्याला कधीकधी अशी भावना असते. पुसटपणे मला त्याचा संशय आला --- “

मिस्टर सॅटर्थवैटने मनोरंजन झाल्याचे काही न दाखवता हे ऐकून घेतले. तो म्हणाला, ‘ओहो, हे रुचीपूर्ण आहे --- “

पायरो म्हणाला, “मला असे वाटते, की तुमच्यासारख्या माणसाने केलेले वर्णन कदाचित धोकादायकपणे आक्रमक असू शकेल --- “

मिस्टर सॅटर्थवैटने नवल वाटून म्हटले, “धोकादायकपणे आक्रमक ?” गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर याच्याबद्दल तो शब्द त्याने सहज वापरला असावा. झटपट निरीक्षण करून, तो सावकाश बोलला, “मला वाटते, तुम्हाला काय म्हणायचे आहे, ते मला समजले आहे.”

“नाही. नाही. तो असा नाही. मध्ययुगीन योद्ध्यासाठी आक्रमक म्हणजे काहीच नाही. हा शब्द चढेलपणा व स्वतःबद्दलच्या गर्वाचा आहे. हे एक प्रकारचे संरक्षणकवच आहे. रोजच्या आयुष्यातील टोचणाऱ्या गोष्टी! त्याकडे दुर्लक्ष करा. पण त्यात धोका आहेच. चिलखत घातलेल्या माणसाला कदाचित त्याच्यावर हल्ला झाल्याचे कळणारही नाही. गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर दिसायला, ऐकायला व समजून घ्यायला तुम्हाला मंद वाटेल.”

तो थांबला मग पद्धत बदलून विचारले, “या सर गेरव्हासचे कुटुंब कशा प्रकारचे आहे?

“त्याची बायको व्हेन्डा स्कॉटीश किंवा उत्तर आयरिश आहे.. फार सुंदर होती. अजूनही आहे. थोडी घाबरलेली पण गेरव्हासशी एकनिष्ठ आहे. मला वाटते, तिचा अमानवी जादुई गोष्टींवर विश्वास आहे. ती वाईट गोष्टींपासून बचाव करणारे कडे घालते. ती इजिप्शियन राणीचा अवतार असल्याचे सांगते --- त्यांना स्वतःचे मूल नाही. रुथ ही दत्तक घेतलेली, आधुनिक पद्धतीची खूप

आकर्षक मुलगी आहे. एवढेच कुटुंब आहे. फक्त ह्युगो ट्रेंट आहे. तो गेरव्हासचा भाचा आहे. पामेला चेव्हेनिक्स-गोर हिने रेगी ट्रेंटशी लग्न केले. ह्युगो त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. तो अनाथ झाला. त्याला वारसाहक्काने काही मिळाले नाही. पण मला वाटते, शेवटी गेरव्हासचे बरेचसे पैसे त्याला मिळणार आहेत. तो दिसायला चांगला आहे. तो गाण्याच्या कार्यक्रमात असतो.”

पायरोने विचारपूर्वक डोके हलवून विचारले, “हे सर गेरव्हासचे दुःख आहे, की त्याला त्याचे नाव लावणारा मुलगा नाही?”

“मला वाटते, हे शल्य त्याला फार टोचते.”

“कुटुंबाचे नाव, ही त्याची फार बळकट भावना आहे का?”

“हो.”

मिस्टर सॅटर्थवैट गप्प झाले. “तो काहीतरी करायला उद्युक्त झाला व शेवटी दत्तक मुलगी घ्यायचे साहस केले.”

हॅमबोरोगजवळ जाण्याचे काही विशिष्ट कारण आहे का?”

पायरोने सावकाश डोके हलवले. तो म्हणाला, “नाही. मला दिसते त्याप्रमाणे, काही कारण नाही. पण तरीही मला वाटते, की तिथे जावे.”

## तीन

इंग्लिश गावाकडील भागातून जाणाऱ्या गाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्याच्या कोपऱ्यात पायरो बसला होता. मध्येच त्याने एक दुमडलेली तार काढली. ती उघडून तो परत वाचू लागला.

'पानक्रास स्टेशनपासून साडेचारची गाडी घ्या. पण ती व्हीम्पर्लेला थांबत असल्याची खात्री करा.' चेव्हेनिक्स-गोर

त्याने तार दुमडून परत खिशात ठेऊन दिली.

गाडीचा गार्ड चटकन दखल घेणारा होता. तुम्ही हॅमबोरोगजवळ जात आहात? ओहो, हो. सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर यांचे पाहुणे? ही गाडी नेहमी व्हीम्पर्लेला थांबते. सर, ही त्यांच्यासाठीची खास सोय आहे."

त्यानंतर तो गार्ड दोनदा आला व काय हवे-नको विचारून गेला --- पहिल्यांदा प्रवाश्याला दिलासा द्यायला की पूर्ण डबा त्याच्यासाठीच ठेवला जाईल आणि दुसऱ्यांदा हे सांगायला की गाडी दहा मिनिटे उशीराने धावत आहे.

गाडी पोचायची वेळ ७ - ५९ होती पण ती ८ - ०२ ला पोचली. त्या गावाच्या लहान स्टेशनवर पायरो उतरला तेव्हा त्या लक्ष देणाऱ्या गार्डच्या हातात त्याने अर्धा क्राउन ठेवला.

इंजिनाची शिट्टी झाली. नॉर्दन एक्स्प्रेस परत एकदा धाऊ लागली. गडद हिरव्या रंगाच्या गणवेषातील उंच चालक पायरोकडे चालत आला. हॅमबोरोगजवळ जाण्यासाठी मिस्टर पायरो?"

त्याने गुप्तहेराचे सामान उचलले आणि स्टेशनबाहेर जाऊ लागला. मोठी रोल्स गाडी थांबली होती. पायरोला आत बसण्यासाठी चालकाने दार उघडून धरले. त्याच्या गुडघ्यांवर महाग दिसणारा रग घातला आणि ते निघाले.

दहा मिनिटांनी गावठाणाचा व वळणदार कोपऱ्यांचा रस्ता ओलांडून, गाडी मोठ्या दगडांमधून गेटमध्ये शिरली. बागेतून गाडी घरापर्यंत गेली. ते तिथे आल्याबरोबर दार उघडले गेले. आणि स्वयंपाक्याने त्याला पुढच्या पायऱ्यांपर्यंत नेले.

"मिस्टर पायरो? सर, इकडून या."

त्याने उजवीकडील दार उघडून, त्याला हॉलपर्यंत नेले. तो म्हणाला, "मिस्टर हर्क्युल पायरो?

त्या खोलीत संध्याकाळच्या कपड्यातील बरेच लोक होते. पायरो आत गेल्यावर त्याच्या चपळ डोळ्यांनी पाहिले की त्याचे तिथे येणे अपेक्षित नव्हते. सगळे त्याच्याकडे आश्चर्ययुक्त गांभीर्याने बघू लागले. मग काळे केस मधूनच करडे झालेली एक उंच बाई त्याच्याकडे येऊ लागली.

पायरोने तिला वाकून अभिवादन केले. “माझी गाडी थोडी उशीरा आली. मी तुमची माफी मागतो.”

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब गुळमुळीतपणे बोलल्या, “त्याचे एवढे काही नाही.” अजूनही तिचे डोळे त्याच्याकडे प्रश्नार्थकतेने बघत होते. ”ठीक आहे. मिस --- ट र, तुमचे नाव --- “

“हर्क्युल पायरो.”

त्याने स्पष्टपणे नाव सांगितले. त्याच्यामागे त्याने अचानक श्वास आत घेण्याचा आवाज ऐकला. त्याच वेळी त्याच्या लक्षात आले, की त्याचा यजमान त्या खोलीत नव्हता. तो हळूवारपणे पुटपुटला, “बाईसाहेब, तुम्हाला मी येणार असल्याचे माहिती होते?”

“ओहो. हो. हो.” पण तिचे हावभाव तसे वाटत नव्हते.“ मला वाटते --- म्हणजे मला म्हणायचे आहे, मला माहिती असणे अपेक्षित होते. पण मी तशी व्यवहारी नसल्याने, मी सर्व विसरले.” तिचा स्वर खरे तर उगीचच थोडा दुःखी वाटत होता. “मला सर्व काही सांगितले जाते. मी ते ऐकत असते, असे वाटते. पण ते माझ्या मेंदूत इकडून शिरून तिकडून बाहेर पडते. गायब होते. जसे काही ते तिथे कधी पोचलेच नव्हते.”

नंतर बराच वेळ करायचे असलेले कर्तव्य केल्यासारखे, तिने तिच्याभोवती पाहिले व ती पुटपुटली, "तुम्हाला सगळे माहिती असल्याची अपेक्षा मी करते."

पण हे खरे नसल्याने, हे बाईसाहेबांचे हे बोलणे म्हणजे सगळयांची ओळख करून देण्याच्या त्रासातून स्वतःची सुटका करून घेण्याचे व सगळयांची नावे आठवण्याचा त्रास घेण्याचे टाळण्याचे प्रसिद्ध तंत्र होते. या केसमधील टोकाचा प्रयत्न करण्यातील अडचण जाणवून, ती म्हणाली, "माझी मुलगी, रुथ."

त्याच्यासमोर उभी असलेली मुलगीसुद्धा उंच आणि काळी, पण वेगळया प्रकारची होती. चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांच्या चपट्या, ठसठशीत नसलेल्या नाकडोळयांपेक्षा तिचे नाक आकर्षक, थोडेसे टोक खाली वाकलेले होते. जबड्याची रेष स्पष्ट व उठून दिसणारी होती. तिचा रंग सतेज व थोडासा मेकप केलेला होता. पायरोला वाटले, त्याने पाहिलेल्या मुलींमध्ये ती सर्वात सुंदर होती. ती सुंदर होतीच पण ती हुशारही असल्याचे त्याच्या लक्षात आले. तिचा अभिमान आणि स्वभावाचे काही पैलूदेखील जाणवत होते. ती बोलतांना तिचा आवाज अगदी सावकाश येत होता व मुद्दाम काढल्यासारखा वाटत होता. ती म्हणाली, "मिस्टर हर्क्युल

पायरो यांचे स्वागत करण्याचे उत्कंठावर्धक काम आम्हाला देऊन, डॅडींनी आम्हाला किती चांगले आश्चर्यात बुडवले आहे.''

तो झटपट बोलला, ''बाईसाहेब, म्हणजे मी येणार असल्याचे तुम्हाला माहिती नव्हते?''

''मला काहीच कल्पना नव्हती. आता जेवण होईपर्यंत, मला माझ्या सही घ्यायच्या पुस्तकासाठी थांबायला पाहिजे.''

हॉलपासून कुणी गेल्याचा आवाज आला. मग स्वयंपाकी दार उघडून बोलला, ''जेवण वाढले आहे.''

आणि त्याचे बोलून होण्यापूर्वी, काहीतरी भलतेच झाले. पोकळ घरगुती आकृतीचा क्षणभर फार गोंधळलेला माणूस झाला ---

हा बदल इतक्या झटपट झाला आणि प्रशिक्षित नोकराचा मुखवटा परत होता तसा झाला. म्हणजे तो बदलला होता, हे कुणाला समजलेही नसते. पण पायरो ते बघत असल्याने त्याला नवल वाटले. स्वयंपाकी दारात घुटमळला. जरी त्याचा चेहरा भावरहित झाला, तरी त्याच्या आकृतीभोवती ताण जाणवत होता.

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब गुळमुळीतपणे म्हणाल्या, ''ओहो प्रिय --- हे फार असामान्य आहे. खरे तर मला --- कळत नाही आहे, की मी काय करू.''

रुथ पायरोला म्हणाली, “मिस्टर पायरो, हे वेगळेच काही अचानक झाल्याने आम्ही थोड्या काळजीत आहोत. गेल्या वीस वर्षात माझ्या वडिलांना जेवायला यायला असा उशीर कधीच झाला नाही.”

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब किरट्या आवाजात दुःखाने ओरडल्या, “गेरव्हास कधीच --- “

एक सैनिकाच्या थाटातील एक मनुष्य तिच्या शेजारी येऊन उभा राहिला. तो आरामशीरपणे हसत बोलला, “गेरव्हासला शेवटी उशीर झाला. आता तो आला की त्याला यावरून भरपूर छळायचे. मोठ्या रुबाबात ताठ कॉलर मिरवणारा! कधी उशीर न करणारा, आज बरा तावडीत सापडणार आहे. तुम्हाला नाही का असे वाटत, की गेरव्हासमध्ये काहीही सामान्य त्रुटी नाहीतच?

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब गोंधळलेल्या खालच्या आवाजात म्हणाल्या, “पण गेरव्हास कधीच उशीर करत नाही.” काहीतरी नको ते झाल्याने, काळजी व दुःख वाटून, त्याना असे झाले असावे. हे फारच मूर्खपणाचे होते. काळजीमुळे त्याला अस्वस्थ वाटू लागले. कदाचित भीतीही. आणि त्याला सुद्धा हे विचित्र वाटले, की त्याने बोलावलेल्या पाहुण्याचे स्वागत करायला इतक्या गूढ पद्धतीने गेरव्हास हजर नव्हता.

मधल्या वेळात, हे स्पष्ट झाले, की कोणालाच काय करावे, ते कळत नव्हते. पूर्वी कधी अशी परिस्थिती उद्भवली नव्हती. त्यामुळे कोणालाच कळत नव्हते, की काय करावे.

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांनी शेवटी पुढाकार --- जर त्याला पुढाकार म्हटले असते तर --- घेतला. खात्रीने तिची पद्धत टोकाची संदिग्ध होती.

ती बोलली, "स्नेल, तुझे मालक --- ?" तिचे वाक्य संपले नाही. तिने स्वयंपाक्याकडे काही अपेक्षेने बघितले. त्याच्या मालकिणीच्या माहिती काढायच्या पद्धतीची सवय असणाऱ्या स्नेलने गुळमुळीत प्रश्नाला ताबडतोब उत्तर दिले. "बाईसाहेब सर गेरव्हास आठला पाच मिनिटे असताना, खाली आले आणि सरळ अभ्यासिकेत गेले."

"ओहो, अस्स अस्स --- " तिचे तोंड उघडेच राहिले. डोळे कुठेतरीच बघू लागले. "तुला असे वाटत नाही का --- म्हणजे --- त्याने घंटीचा आवाज ऐकला का?"

"मला वाटते, बाईसाहेब, त्यांनी तो ऐकला असावा. कारण घंटी अभ्यासिकेबाहेरच आहे. अर्थात सर गेरव्हास अजून तिथे आहेत का, हे मला माहिती नाही. नाहीतर मी त्यांना सांगितले असते, की जेवण तयार होते. बाईसाहेब, मी ते आता करू का?"

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांनी ही सूचना उचलून धरत, सुटकेचा निःश्वास सोडलेला दिसला. "ओहो, स्नेल, मी तुझी आभारी आहे. कृपया तसे नक्की कर." हे ऐकून स्वयंपाकी निघून गेला. "स्नेल म्हणजे एक रत्न आहे. मी त्याच्यावर अगदी अवलंबून राहू शकते. त्याच्याशिवाय माझे मुळीच चालणार नाही."

कोणीतरी सहानुभूतीपूर्ण आवाजात पुटपुटले पण कोणी काही बोलले नाही. पायरो ती लोकांनी भरलेली खोली अचानक खूप लक्ष देऊन पहात होता. त्याला वाटले तेथील प्रत्येकजण ताणाखाली आहे. त्या लोकांवरून त्याची नजर झरझर फिरली. त्याने त्यांचे अदमासे वर्गीकरण केले. दोन वयस्क लोकांमधील, एकजण आताच बोललेला सैनिकासारखा दिसणारा होता. तर दुसरा बारीक, करड्या केसांचा व ओठ घट्ट मिटलेला माणूस होता. दोन तरुण माणसे --- एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाची होती. एकजण मिशावाला असून थोडा मग्रूर वाटत होता. तो बहुधा सर गेरव्हासचा गाण्याच्या कार्यक्रमात असणारा भाचा असावा. दुसऱ्याचे केस मऊ आणि चकचकीत असून मागे वळवलेले होते. त्यामुळे तो चांगला दिसत होता. पण तो खात्रीने थोडा निम्न सामाजिक स्तरातील वाटत होता. तिथे एक नाकावर क्लिप

असलेल्या चष्म्याची, बुद्धिमान डोळ्यांची मध्यमवयीन बाई होती आणि लालभडक केसांची एक मुलगी होती.

स्नेल दारात आलेला दिसला. त्याची पद्धत योग्य होती. परत एकदा भावनाशील नसलेल्या स्वयंपाक्याने मुखवट्याखालील चेहरा दाखवला.

“बाईसाहेब, मला माफ करा. अभ्यासिकेचा दरवाजा कुलुपबंद आहे.”

“कुलुपबंद?”

तो एका तरुण सजग व उत्सुक माणसाचा आवाज होता. तो बोलणारा माणूस केस उलटे मागे वळवलेला, दिसायला चांगला असलेला माणूस होता. तो घाईने बोलला, “मी जाऊन बघू का?”

पण पायरोने झटपट कृती केली. त्याने हे इतके सहज केले, की कोणाला तो नुकताच आलेला पाहुणा असल्याचे काही वाटले नाही. त्याने पटपट परिस्थितीचा ताबा घेतला. तो म्हणाला, “चल आपण अभ्यासिकेत जाऊ.” तो स्नेलशी बोलत राहिला. “मला मार्ग दाखव.” स्नेलने ऐकले. पायरो त्याच्यामागून मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे चालत राहिला. बाकी सगळेही आले. स्नेलने हॉल, वक्राकार जिना, आजोबांचे भले मोठे घड्याळ आणि अरुंद पॅसेजमधील धातूची घंटी ओलांडली. मग एक दार लागले.

इथे पायरोने स्नेलला मागे सारून हळूवारपणे दाराचे हँडल फिरवून दार उघडायचा प्रयत्न केला. पण ते उघडेना. दाराच्या लाकडावर नखांनी काही करायचा प्रयत्न केला तो जोरजोरात प्रयत्न करू लागला. अचानक तो थांबला. मग गुडघे वाकवून, त्याने किल्लीच्या भोकातून बघितले. हळूहळू तो उठला व भोवताली पाहिले. त्याचा चेहरा कठोर झाला होता.

तो म्हणाला, “लोकहो, हे दार ताबडतोब मोडून उघडायला पाहिजे.”

त्याच्या सांगण्याप्रमाणे दोन उंचनिंच व बळकट तरूण माणसे दारावर तुटून पडली. ते सोपे नव्हते. हॅमबोरोग जागेची दारे अतिशय पक्की होती. शेवटी कसेबसे कुलूप तोडण्यात यश आले व करकर आवाज येत, दार आत ढकलले गेले. दिवे लागलेले होते. डावीकडील भिंतीजवळ महोगनी लाकडाचे लिहायचे दणकट टेबल होते. टेबलावर बसून नव्हे तर बाजूला, त्यांच्याकडे पाठ करून, एक मोठा माणूस खुर्चीत वाकून बसला होता. खुर्चीच्या उजव्या बाजूला त्याचे डोके व शरीराचा वरील भाग लोंबकळत होता. त्याखाली गालीच्यावर, एक लहानसे, चकाकणारे पिस्तुल होते --- तर्क करायची काही गरज नव्हती. चित्र स्पष्ट होते. सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर याने स्वतःला गोळी मारून घेतली होती.

## चार

एक दोन मिनिटे दरवाज्यातील गर्दी त्या दृष्याकडे बघत स्तब्ध राहिली. मग पायरो पुढे आला. त्याच वेळेस ह्युगो ट्रेन्ट ठामपणे बोलला, “अरे देवा, या वयस्क माणसाने स्वतःला मारून घेतले!” चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांच्या तोंडून एक दीर्घ दबलेली किंकाळी बाहेर पडली. “ओहो, गेरव्हास --- गेरव्हास!” पायरो धारदार स्वरात ओरडला, “चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांना बाजूला न्या. त्या इथे काही करू शकणार नाहीत.” सैनिकासारख्या दिसणाऱ्या वयस्क माणसाने आज्ञापालन केले. तो म्हणाला, “व्हेन्डा, चल. माझ्या आवडत्या व्हेन्डा, चल. तू काही करू शकणार नाहीस. सर्व संपले आहे. रुथ, ये आणि तुझ्या आईकडे बघ.” पण रुथ गोर खोलीत घुसून अधीरतेने, खुर्चीतील भयानक माणसाच्या आकृतीवर वाकलेल्या पायरोच्या बाजूला उभी राहिली. ती आकृती स्नायुबल असलेल्या व चाचे लोकांसारखी दाढी असलेल्या दणकट माणसाची होती. ती खालच्या ताणयुक्त आवाजात म्हणाली, “ते मेले आहेत, याबद्दल तुमची खात्री आहे?” पायरोने वर पाहिले. मुलीच्या चेहऱ्यावर त्याला न कळणारे, गंभीरपणे दबलेले जिवंत भाव दिसत होते. ते दुःख नव्हते --- ती

अर्धवट भीतीदायक उत्सुकता दिसत होती. नाकावर क्लीपचा चष्मा लावलेली बाई पुटपुटली, “अग माझ्या प्रिय मुली, तुला असे वाटत नाही का --- ?” लाल केसांची मुलगी ओरडली, “तर मग ती गाडी किंवा शँपेनचे बूच नव्हते. आपण ऐकले तो पिस्तुलाचा बार होता.” पायरोने वळून त्या सर्वांकडे पाहिले. “कोणीतरी पोलिसांना बोलवायला हवे --- “ रुथ चेव्हेनिक्स-गोर आक्रमकपणे ओरडली, “नको.” कठोर चेहऱ्याचा वयस्क माणूस बोलला, “मला वाटते, ते अटळ आहे. बरोज, ह्युगो, तुम्ही ते बघाल का? मिशावाल्या उंच माणसाला पायरो बोलला, “तू मिस्टर ह्युगो ट्रेन्ट आहेस का? फक्त तू आणि मी सोडून सर्वांनी खोलीबाहेर जाणे ठीक राहील, असे मला वाटते.” यावर कुणी काही बोलले नाही. वकिलाने सर्वांना बाहेर हाकलले. पायरो आणि ह्युगो ट्रेन्ट दोघेच राहिले. ह्युगो पायरोकडे रोखून बघत बोलला, “इकडे बघा. तुम्ही कोण आहात? मला जराही कल्पना नाही. तुम्ही इथे काय करत आहात?”

पायरोने खिशातून स्वतःचे कार्ड काढून दिले. ह्युगो त्याकडे निरखून बघत म्हणाला. “खासगी गुप्तहेर --- बरोबर? मी तुमचे नाव ऐकले आहे --- पण तरीही मला हे कळत नाही, की तुम्ही इथे काय करत आहात?

“हे तुमचे मामा आहेत ना? तुम्हाला माहिती नाही का त्यांनी -- “

ह्युगोचे डोळे क्षणभर मेलेल्या माणसावर खिळले. “ हा माणूस माझा मामा होता, हे बरोबर आहे.”

“तुम्हाला हे माहिती नाही का, की त्याने मला बोलावले होते?” ह्युगोने डोके हलवले. तो सावकाश बोलला, “मला कल्पना नव्हती.” त्याच्या आवाजात कुठल्या भावना होत्या, हे समजणे अवघड होते. त्याचा चेहरा लाकडी व मूर्खासारखा दिसत होता. पायरोने विचार केला ताण असलेल्या काळासाठी हा चांगला मुखवटा आहे. तो बोलला, “आपण वेस्टशायरमध्ये आहोत. मला येथील मुख्य कॉन्स्टेबल मेजर रिडल चांगला माहिती आहे.” ह्युगो बोलला “तो अर्ध्या मैलावर रहातो. तो स्वतःहूनच येईल.” पायरो म्हणाला, “ते बरे पडेल.” तो खोलीमध्ये अस्वस्थपणे फेऱ्या मारू लागला. त्याने खिडकीचा पडदा बाजूला केला. फ्रेंच खिडकीची हळूवारपणे तपासणी केली. मग ती बंद केली.

टेबलामागील भिंतीवर एक गोल आरसा लटकत होता. तो हलत होता. पायरोने वाकून एक छोटीशी वस्तू उचलली. ह्युगो म्हणाला, “ते काय आहे?” “गोळी.” ती त्याच्या डोक्यातून सरळ जाऊन आरशावर आपटली?

“असे वाटते आहे.”

पायरोने गोळी जिथे सापडली, तिथे सूक्ष्मपणे परत ठेऊन दिली. तो टेबलाशी आला. तिथे व्यवस्थितपणे ठेवलेला कागदांचा ढीग होता. टीपकागदाच्या पॅडवर एक सुटा कागद पडला होता. त्यावर थरथरत्या हाताने मोठ्या अक्षरात ‘माफ करा’ असे लिहिलेले होते.

ह्युगो म्हणाला, “हे त्याने स्वतःला मारून घेण्याच्या थोडेच आधी लिहिले असावे.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.

त्याने परत फुटक्या आरशाकडे व नंतर मेलेल्या माणसाकडे पाहिले. गोंधळल्यामुळे त्याची भुवई थोडी आक्रसली गेली. जिथे कुलूप वेडेवाकडे मोडून लटकत पडले होते, त्या दाराकडे तो गेला. तिथे किल्ली नव्हती. ते त्याला माहिती होते. नाहीतर त्याला किल्लीच्या भोकातून काही दिसले नसते. तिथे जमीनीवरदेखील कशाचा काही पत्ता नव्हता. पायरो मृत व्यक्तीवर वाकला व त्यावरून त्याची बोटे फिरवली.

तो बोलला, “हो, किल्ली त्याच्या खिशात आहे.”

ह्युगोने सिगरेट केस काढून सिगरेट पेटवली. तो घोगऱ्या आवाजात बोलला, “हे सर्व काही स्पष्ट दिसते आहे. माझ्या

मामानी इथे स्वतःवर गोळी झाडून घेतली. कागदावर तो निरोप लिहून ठेवला आणि मग गोळी झाडून घेतली.

पायरोने ध्यानस्थपणे मान हलवली. ह्युगो बोलत राहिला, “पण मला समजत नाही, की त्याने तुम्हाला का बोलावले होते? ते कशासाठी होते?”

“ते स्पष्ट करणे अवघड आहे. मिस्टर ट्रेन्ट, आपण थांबलो आहोत, तोपर्यंत तुम्ही अधिकार तुमच्या ताब्यात घेऊन, मला हे सांगा, की काल मी आल्यापासून पाहतो आहे, ते सर्व लोक कोण आहेत?”

ह्युगो अनवधानाने बोलला, “कोण आहेत? हो. हो. अर्थात. माफ करा. आपण बसूया का?” प्रेतापासून दूर खोलीच्या पलीकडील बाजूला, त्याने बसण्यासाठी निर्देश केला. त्याने थरथरत बोलायला सुरवात केली. “तुम्हाला माहिती आहे, इथे माझी मामी व्हेन्डा आहे आणि माझी बहीण रुथ आहे. दुसरी मुलगी सुसान कार्डवेल आहे. ती इथे रहाते आहे. कर्नल बरी हे कुटुंबाचे जुने मित्र आहेत. आणि मिस्टर फोर्ब्स हे पण जुने मित्र आहेत. शिवाय ते कुटुंबाचे वकील व सर्वेसर्वा आहेत. या दोघा वयस्क लोकांना व्हेन्डाबद्दल ती तरुण असताना आपुलकी होती आणि अजूनही ते काहीशा विश्वासू व नेक पद्धतीने तिच्याभोवती घोटाळत

असतात. हे थोडे विचित्र पण भिडणारे आहे. मग इथे गॉडफ्रे बरोज आहे. तो मामाचा सचिव होता.आणि मिस लींगार्ड इथे चेव्हेनिक्स-गोर कुटुंबाचा इतिहास लिहिण्यासाठी मामाला मदत करत असे. ती लेखनासाठी ऐतिहासिक संदर्भ गोळा करते. एवढे लोक इथे असतात."

पायरो मान डोलावून म्हणाला, "मला वाटते तुझ्या मामाचा जीव घेणाऱ्या गोळीचा आवाज तू ऐकलास का?"

"हो आम्ही ऐकला. आम्हाला वाटले तो शँपेनची बाटली उघडल्याचा आवाज होता --- निदान मला तरी असे वाटले. सुसान आणि मिस लींगार्डला वाटले, हा गाडी उलटी येत असलेला आवाज आहे --- इथून रस्ता तसा जवळ आहे, हे तुम्हाला माहिती असेल."

"ही केव्हाची गोष्ट आहे?"

"ओहो, आठला दहा मिनिटे असतानाची. स्नेलने नुकतीच पहिली घंटी वाजवली होती."

"आणि ती ऐकली तेव्हा तुम्ही कुठे होतात?"

"हॉलमध्ये. आम्ही --- आम्ही त्यावर हसत होतो. तुम्हाला माहिती आहे, वादविवाद चालू होता, आवाज कुठून आला. मी म्हटले तो जेवायच्या खोलीतून आला. सुसान म्हणाली, तो

हॉलमधून आला. आणि मिस लींगार्डला वाटले, तो वरच्या मजल्यावरून आला. स्नेल म्हणाला, तो बाहेरील रस्त्यावरून, पण वरील खोलीच्या खिडकीतून आला. सुसान म्हणाली, “अजून काही अंदाज? मी हसून म्हणालो, “असा नेहमी खून होतो. आता असे म्हटल्याचे फार वाईट वाटते.”

त्याचा चेहरा उदास होऊन वेडावाकडा झाला. ”सर गेरव्हासने डोक्यात गोळी मारून घेतली असावी का?” पण असे कोणाचे न होवो.”

“नाही. अर्थात असे व्हायला नको.”

“तुम्हाला खरोखर काही कल्पना नाही का, की त्याने स्वतःला का गोळी मारली?”

ह्युगो सावकाश म्हणाला, “ओहो, खरे तर मी हे सांगू नये --“

“तुम्हाला काही कल्पना आहे का?”

“हो --- म्हणजे --- तसे ते स्पष्ट करायला अवघड आहे. अर्थात तो आत्महत्या करेल, अशी माझी अपेक्षा नव्हती.त्यामुळे मी घाबरलो आहे व मला नवलही वाटते आहे. खरे तर माझा मामा टोप्या विकणाऱ्याइतका मूर्ख आहे. मिस्टर पायरो, हे सर्वांना माहिति आहे.”

“एवढे स्पष्टीकरण तुम्हाला पुरेसे वाटते?”

“लोक जरा वेडे असतात, तेव्हा स्वतःवर गोळी झाडून घेतात.”

“हे अगदी साधे पण वाखाणण्यासारखे स्पष्टीकरण झाले.”

ह्युगो जायला निघाला.

पायरो उठला व खोलीत कसाही फिरू लागला. त्या खोलीत व्हिक्टोरियन पद्धतीचे चांगले फर्निचर होते. मोठी पुस्तकांची कपाटे होती. हातवाल्या मोठ्या खुर्चा होत्या. पिळदार स्नायूंच्या बलवान माणसांसारख्या सरळ, दणकट खुर्च्या होत्या. तिथे फार काही शोभेच्या वस्तू नव्हत्या. पण शेकोटीच्या कट्ट्यावरील ब्रॉंझच्या वस्तूंनी पायरोचे लक्ष वेधून घेतले. त्याला त्या आवडल्या. त्याने त्या एकेक करून उचलल्या व परत ठेवण्यापूर्वी त्यांचे काळजीपूर्वक निरीक्षण केले. एका अगदी डावीकडील वस्तूवरील काही त्याने बोटाच्या नखाने झटकले.

ह्युगोने फार उत्सुकता न दाखवता विचारले, “ते काय होते?”

“विशेष काही नाही. आरशाचा लहानसा चकचकीत तुकडा.” पायरो म्हणाला.

ह्युगो म्हणाला, “गोळी लागून त्या आरशाचे विनोदी तुकडे उडालेले दिसतात. फुटका आरसा म्हणजे वाईट नशीब. बिचारा

म्हातारा गेरव्हास --- मला वाटते त्याच्या नशीबाने त्याला बराच काळ साथ दिली होती.”

“तुमचे मामा नशीबवान गृहस्थ होते का?

ह्युगो थोडा हसला. “का, त्याचे नशीब एका म्हणीसारखे होते. तुम्ही ज्या ज्या वस्तूला हात लावाल, ती सोन्याची होईल! जर त्याने संशयास्पद खाणीत पैसे गुंतवले, तर तिथे त्या धातूचे प्रचंड साठे सापडत. जर त्याने कुठच्या बाहेरील माणसाला घरी आणून ठेवले, तर घराची प्रगती होई. कुठल्याही अती संकटमय जागेमधून त्याची आश्चर्यकारक रीतीने सुटका होई. अनेकदा तो आयुष्यात चमत्कार झाल्यासारखा वाचलेला आहे. असे बघा, त्याच्या पद्धतीने तो आनंदी म्हातारा होता. त्याच्या पिढीतील लोकांपेक्षा त्याने खूप ठिकाणे व खूप वस्तू पाहिल्या होत्या.”

पायरो संभाषणाच्या आवाजात पुटपुटला, “मिस्टर ट्रेन्ट, तुम्हाला तुमच्या मामाचा खूप लळा होता का?”

या प्रश्नामुळे ह्युगो थोडासा चक्रावून गेला. “ओहो --- हो, अर्थात. तो जरा गुळमुळीतपणे बोलला. तुम्हाला माहिती आहे का, कधीकधी तो खूप कठीण वाटायचा. त्याच्याबरोबर रहायचा एक भीतीदायक ताण यायचा आणि असेच काही. नशीबाने मी त्याच्याबरोबर जास्त काळ नव्हतो.”

“त्याना तुमचा लळा होता का?”

“तुम्हाला जाणवेल असा नाही. खरे तर त्याला, माझ्या अस्तित्वाबद्दल थोडा कडवटपणा होता.”

“मिस्टर ट्रेन्ट, असे कसे काय?”

“म्हणजे असे बघा, त्याला स्वतःचा मुलगा नव्हता --- आणि याचे त्याला खूप वाईट वाटे. तो कुटुंबांबद्दल आणि तशा अनेक गोष्टींबद्दल वेडा होता. मला विश्वास आहे, की त्याबद्दल तो फार खंत बाळगून होता. जेव्हा तो मरेल, तेव्हा चेव्हेनिक्स-गोर कुटुंब जगायचे थांबवेल. नॉर्मन लढाईपासून ते जगत आलेले आहेत, हे तुम्हाला माहिती आहे. त्यापैकी गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर हा शेवटचा होता. मला वाटते, त्याच्या दृष्टीकोनातून, हे सगळे खराब होते.”

“आणि तुम्हाला असे वाटत नाही का?”

ह्युगोने त्याचे खांदे शहारवले.

“अशा प्रकारच्या गोष्टी मला जुन्या वाटतात.”

“संपत्तीचे काय होणार?”

“खरे तर मला माहिती नाही. कदाचित मला मिळेल. किंवा त्याने ती रुथसाठी ठेवली असेल. बहुधा व्हेन्डा असेपर्यंत, ती तिच्या मालकीची असेल.”

“तुझ्या मामांनी त्यांचा काय विचार आहे, ते कधी बोलून दाखवले नाही का?”

“असे बघा, त्यांची जी काही कल्पना असेल, ती काहीतरी भन्नाट असणार.”

“आणि ती काय असावी?”

“त्याची कल्पना अशी होती, की रुथ आणि मी ती वाटून घ्यावी.”

“हे खरेच अगदी योग्य असे वाटते.”

“तसे पाहिले, तर योग्य आहे. पण रुथ --- तिचे आयुष्याबद्दलचे दृष्टीकोन पूर्णपणे ठरलेले आहेत. तुम्हाला सांगतो, ती अतिशय आकर्षक तरुण स्त्री आहे आणि ती हे जाणते. ती लग्नाची घाई करून स्थिरस्थावर होण्याच्या विचारात नाही.”

पायरो पुढे झुकला. “मिस्टर ट्रेन्ट, त्यासाठी तुम्ही तयार आहात का?”

ह्युगो कंटाळवाण्या आवाजात बोलला, “अलीकडील दिवसात, तुम्ही कुणाशी लग्न करता, यावर तुमचे सुख अवलंबून नाही. विवाहविच्छेदन इतके सोपे झाले आहे. जर तुमचे पटले नाही, तर लग्न मोडून पुन्हा नव्याने सुरवात करावी.”

दार उघडून फोर्ब्स, एका उंच स्पृस झाडासारखा दिसणाऱ्या माणसाबरोबर आत शिरला. त्या माणसाने ट्रेन्टकडे बघून मान डोलावली. “हॅलो, ह्युगो, जे झाले, त्याबद्दल मला फार वाईट वाटते. तुमच्यावर मोठे संकट आले आहे.”

पायरो पुढे आला. “मेजर रिडल, कसे काय? तुम्हाला मी आठवतो का?”

“हो तर, म्हणजे तुम्ही इथे आहात तर!” त्याच्या आवाजाचा सूर विचाराधीन वाटला. त्याने चौकसपणे पायरोकडे कटाक्ष टाकला.

# पाच

मेजर रिडल बोलला, “ठीक आहे?”

त्यानंतर वीस मिनिटांनी मुख्य कॉन्स्टेबलचे प्रश्नार्थक “ठीक आहे?” हे लंगड्या काळया पांढऱ्या केसांच्या वयाने मोठ्या पोलीस सर्जनला उद्देशून होते. त्या सर्जनने खांदे शहारवले.

“तो अर्ध्या तासापूर्वी मेला --- पण तासापेक्षा जास्त नव्हे. तुम्हाला तांत्रिक बाबी नको आहेत, हे मला माहिती आहे. त्यामुळे मी त्या करणार नाही. या माणसाच्या डोक्यातून गोळी आरपार गेली आहे. त्याच्या उजव्या पोटरीपासून काही इंच अंतरावर पिस्तुल पडले होते. गोळी थेट मेंदूतून गेली व बाहेर पडली.”

“ही पूर्णपणे आत्महत्येची केस आहे?”

“अगदी पूर्णपणे. नंतर प्रेत खुर्चीवरून घसरले आणि त्याच्या हातातून पिस्तुल पडले.”

“तुम्हाला गोळी मिळाली का?”

“हो.” डॉक्टरने ती हातात धरली.

मेजर रिडल बोलला, “छान, आम्ही पिस्तुलाशी तुलना करण्यासाठी ही आमच्याजवळ ठेवतो. ही सरळ केस असल्याने व काही अडचणी नसल्याने मी आनंदी झालो.”

पायरोने हळूच विचारले, “डॉक्टर, तुमची खात्री आहे, की यात काही अडचणी नाहीत?”

डॉक्टर सावकाश बोलले, “मला एक गोष्ट जरा खटकते आहे. जेव्हा त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतली, तेव्हा तो थोडासा उजवीकडे झुकलेला असणार. नाहीतर गोळी भिंतीवरील आरशाच्या मध्यभागी लागण्याऐवजी आरशाखाली लागली असती.”

पायरो म्हणाला, “आत्महत्या करण्यासाठी ही स्थिती सोयीस्कर नाही.” डॉक्टरने खांदे शहारवले. “ओहो, ठीक आहे --- जर तुम्ही हे संपवणार असाल, तर --- त्याने वाक्य अर्धवट सोडले.

मेजर रिडल म्हणाला, “आता प्रेत हलवायला हरकत नाही?”

“हो, माझे संध्याकाळपर्यंतचे काम झाले आहे..”

एका साध्या कपड्यातील उंच भावनारहित चेहऱ्याच्या माणसाला मेजर रिडल बोलला, “इन्स्पेक्टर, तुमचे काय?

“ठीक आहे, सर. आम्हाला पाहिजे ते मिळाले. पिस्तुलावर फक्त मेलेल्या माणसाचे ठसे होते.”

गेरव्हास चेव्हेनिक्स-गोरच्या मर्त्य खुणा मिटवल्या गेल्या. मुख्य कॉन्स्टेबल व पायरो एकदम बाहेर पडले. “तर मग रिडल, सगळे काही कायदेशीर रीत्या स्पष्ट झाले. दार लावले गेले. खिडकी बंद झाली. दाराची किल्ली मृत माणसाच्या खिशात. एक परिस्थिती सोडून प्रत्येक गोष्ट कॉकर [मोठ्या लोंबणाऱ्या कानांचा कुत्रा] सारखी.”

पायरोने विचारले, “आणि ती कुठली, माझ्या मित्रा?”

रिडल बोथटपणे बोलला, “तू? तू इथे काय करतो आहेस?”

उत्तर देण्याऐवजी पायरोने आठवड्यापूर्वी त्याला मृत माणसाकडून आलेले पत्र त्याच्या हातात दिले आणि त्याला इथे येण्यास भाग पडलेली तारही.

मुख्य कॉन्स्टेबल बोलला, “हं, हे रुचीपूर्ण आहे. आपल्याला याच्या मुळाशी जायला हवे. मला असे म्हणायला हवे की याचा संबंध त्याच्या आत्महत्येशी असला पाहिजे.”

“बरोबर आहे.”

“घरात कोण कोण आहे, हे पाहिले पाहिजे.”

“मी त्यांची नावे सांगू शकतो. मी आताच मिस्टर ट्रेन्टशी बोलत होतो. त्याने सर्व नावे सांगितली. “मेजर रिडल, कदाचित तुम्हाला या लोकांबद्दल काही माहिती असेल?”

“मला त्यातील काहीजण माहिती आहेत. मिसेस चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब म्हाताऱ्या गेरव्हासइतक्याच चक्रम आहेत. ते एकमेकांशी एकनिष्ठ होते आणि दोघेही अगदी वेडे होते. ती जगातील सर्वात जास्त गुळमुळीत बाई आहे. तिच्यात विचित्र प्रासंगिक गर्विष्ठपणा आहे आणि हे नवलपूर्ण रीतीने अगदी खरे आहे. तिला लोक खूप हसतात. मला वाटते, तिला हे माहिती आहे पण ती काही त्याची पर्वा करत नाही. तिला जरादेखील विनोदबुद्धी नाही.”

“मिस चेव्हेनिक्स-गोर ही त्यांची दत्तक मुलगी आहे, बरोबर?”

“हो.”

“खूप सुंदर तरुण स्त्री.”

“ती फार सुंदर व आकर्षक आहे. येथील आजूबाजूच्या तरुणांचा तिने खात्मा करून टाकलेला आहे. त्याना नादी लावून, घुमवून, त्याना हास्यविषय केले आहे. ती चांगली घोडेस्वार आहे व तिचे हात नवलपूर्ण आहेत.”

“पण त्याचा आपल्याशी काही संबंध नाही.”

“नाही --- कदाचित नाही --- इतर लोकांबद्दल --- अर्थात मला म्हातारा बरी माहिती आहे. तो इथे बऱ्याचदा असतो. जणू घरातले पाळीव मांजर. चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांचा गुप्त खासगी ऑफिसर आहे. तो खूप जुना मित्र आहे. सर्व आयुष्य त्यांनी एकमेकांबरोबर काढले आहे. मला वाटते, तो आणि सर गेरव्हास या दोघानाही बरी संचालक असलेल्या कंपनीत रस होता.”

“ओस्वाल्ड फोर्ब्सबद्दल तुला काही माहिती आहे का?”

“मी त्याला एकदा भेटलो होतो.”

“आणि मिस लिंगार्डबद्दल?”

“काहीच माहिती नाही.”

“मिस सुसान कार्डवेल?”

“लाल केसांची दिसायला चांगली मुलगी? मी तिला गेल्या काही दिवसात रुथबरोबर पाहिले आहे.”

“मिस्टर बरोज?”

‘हो. मी त्याला ओळखतो. चेव्हेनिक्स-गोरचा सचिव. आपल्या आपल्यात म्हणून सांगतो, मला तो फारसा पटत नाही. तो

दिसायला चांगला आहे. आणि त्याला ते माहिती आहे. पण तो फार वरच्या सामाजिक स्तरातील नाही.

“तो सर गेरव्हासबरोबर खूप वर्षे आहे का?”

“मला वाटते, दोन वर्षे.”

“आणि तिथे अजून कुणी नाही --- ?”

पायरो जाऊ लागला.

एक उंच, छान केसांचा माणूस बाहेरून घाईने आत आला. त्याला दम लागला होता आणि तो त्रासलेला वाटत होता.

“मेजर रिडल, शुभ संध्याकाळ. मी अशी अफवा ऐकली, की सर गेरव्हासने स्वतःवर गोळी झाडून घेतली आणि म्हणून मी घाईने इथे आलो. स्नेल मला सांगतो आहे, की हे खरे आहे. हे अविश्वसनीय आहे. माझा विश्वास बसत नाही.”

“लेक, हे खरे आहे. मी तुझी ओळख करून देतो. हा कॅप्टन लेक आहे. सर गेरव्हासच्या इस्टेटीचा दलाल. आणि हा हर्क्युल पायरो. याच्याबद्दल तू ऐकले असशील.”

लेकचा चेहरा उजळला. ती आनंदित अविश्वसनीयता होती.

“मिस्टर हर्क्युल पायरो? मला तुम्हाला भेटून आनंद झाला. शेवटी --- “ तो थांबला. त्याचे सुंदर हसू मावळले --- तो

गोंधळलेला व उदास वाटू लागला. “या आत्महत्येबद्दल --- इथे काही निसरडे नाही. सर, आहे का?”

मुख्य कॉन्स्टेबल धारदारपणे म्हणाला, “तुम्ही म्हणता तसे, इथे काही निसरडे का असेल?

“म्हणजे पायरो इथे असल्यामुळे, मी अविश्वासार्ह असे म्हणतो आहे. आणि हे सर्व प्रकरण अविश्वासार्ह वाटते आहे.”

पायरो लगबगीने म्हणाला, “नाही. नाही. मी सर गेरव्हास यांच्या मृत्युसंदर्भात इथे आलेलो नाही. मी पाहुणा म्हणून आधीच घरात होतो.”

“अस्स! हे विनोदी आहे. मी दुपारी त्याच्याबरोबर हिशेब बघत असतांना, तो तुम्ही येत असल्याचे मला कधीच बोलला नाही.”

पायरो शांतपणे बोलला, “अविश्वासार्ह हा शब्द तुम्ही दोनदा वापरलात. कॅप्टन लेक, तुम्हाला सर गेरव्हास यांची आत्महत्या इतकी नवलपूर्ण वाटते आहे का?”

‘हो. मला ती तशी वाटते आहे. सगळे मान्य करतील की, तो वेडा टोपीविक्या होता. पण तरीही मी अशी कल्पनादेखील करू शकत नाही, की त्याच्याशिवाय जग चालू शकेल.”

पायरो म्हणाला, “हो. हा एक मुद्दा आहे. तो त्या तरूण माणसाच्या चेहऱ्यावरील बुद्धिमान हावभावांनी व मोकळेपणानी, कौतुकाने त्याच्याकडे पाहू लागला.

मेजर रिडलने घसा खाखरला. “कॅप्टन लेक, तुम्ही इथे असल्यामुळे, तुम्ही कदाचित बसाल आणि काही प्रश्नांची उत्तरे द्याल.”

“नक्कीच, सर.”

लेक त्या दोघांच्या विरुद्ध बाजूला असलेल्या खुर्चीवर बसला.

“तुम्ही सर गेरव्हासला शेवटचे कधी पाहिले?”

“आज दुपारी, तीन वाजण्यापूर्वी. काही हिशेब पडताळून बघायचे होते. आणि शेतावरील एका नवीन भाडेकरूचा प्रश्नही होता.”

“किती वेळ तुम्ही त्याच्याबरोबर होतात?”

“कदाचित अर्धा तास.”

“नीट विचार करून सांगा. तुम्हाला त्याच्या वागणुकीत काही वेगळे जाणवले का?”

तरूण माणसाने विचार केला. “नाही असे काही मला आढळले नाही. तो कदाचित थोडा उत्तेजित वाटत होता --- पण ते काही फार वेगळे नव्हते.”

“तो उदास मुळीच वाटत नव्हता?”

‘ओहो, नाही. तो चांगल्या मनस्थितीत होता. तो कुटुंबाचा इतिहास लिहित होता व चांगला मजेत दिसत होता.”

“तो कधीपासून हे काम करतो आहे?”

“गेल्या सहा महिन्यांपासून.”

“तेव्हाच मिस लिंगार्ड इथे आली का?”

“नाही. जेव्हा त्याच्या हे लक्षात आले की संशोधनाचे काम त्याला एकट्याला उरकत नाही आहे, तेव्हा ती सुमारे दोन महिन्यांपूर्वी आली.”

‘आणि तुम्हाला वाटते, की तो मस्त मजेत जगत होता?”

“ओहो, नक्कीच मजेत जगत होता. त्याचे कुटुंब सोडून जगात काही आहे, हे त्याच्या खिसगणतीतदेखील नव्हते.” क्षणभर त्या तरुण माणसाच्या स्वरात विषाद उमटून गेला.

“म्हणजे तुम्हाला माहिती आहे त्याप्रमाणे, सर गेरव्हासला काही काळज्या नव्हत्या?”

“फक्त थोडा वेळ --- अगदी थोडा वेळ थांबून, --- “कॅप्टन लेक म्हणाला. “नाही.”

पायरोने अचानक एक प्रश्न टाकला. “तुम्हाला वाटते, सर गेरव्हासला त्याच्या मुलीची काहीशी काळजी वाटत होती का?”

“मुलीची?

“मी तेच म्हणत होतो.”

“तरूण मनुष्य कडकपणे बोलला, “मला तरी असे काही माहिती नाही.”

पायरो पुढे काही बोलला नाही. मेजर रिडल म्हणाला, “ठीक आहे. आभारी आहे. मला तुम्हाला अजून काही विचारायची गरज भासली, तर तुम्ही आसपासच रहा.”

“नक्कीच, सर. अजून काही मी करू शकतो का?” तो उठला.

“हो. तुम्ही स्वयंपाक्याला इथे पाठवू शकता. आणि चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब कशा आहेत, ते तुम्ही माझ्याकरता शोधून काढा. ती फार उदास नसेल, तर मला तिच्याशी थोडे बोलायचे आहे.”

तरुण माणसाने मान हलवली आणि तो भरभर पाऊले टाकत खोलीबाहेर पडला.

पायरो बोलला, “याचे व्यक्तिमत्व आकर्षक आहे.”

“हो, तो छान माणूस आहे. त्याच्या कामातही तो चांगला आहे. प्रत्येकाला तो आवडतो.”

## सहा

मेजर रिडल मित्रत्वाच्या स्वरात म्हणाला, “स्नेल, बस. मला तुला बरेच प्रश्न विचारायचे आहेत. आणि मला वाटते तुला त्यामुळे धक्का बसेल.”

स्नेल इतक्या काळजीपूर्वक बसला, की तो जवळजवळ उभाच होता.

“तू इथे बराच काळ आहेस का?”

सोळा वर्षे, सर. आभारी आहे, सर. तसे म्हटले तर, सर गेरव्हास इथे स्थाईक झाल्यापासून मी आहे.”

“ओहो, अर्थात, त्या दिवसात तुझे मालक खूप प्रवास करत असत.”

“हो. ते उत्तर ध्रुवावर आणि इतरही बऱ्याच रुचीपूर्ण ठिकाणी मोहीम काढत असत.”

“स्नेल, तू तुझ्या मालकांना त्या संध्याकाळी शेवटचे कधी पाहिलेस?

“सर जेवायच्च्या खोलीत सर्व व्यवस्था ठीकठाक आहे ना, हे बघताना पाहिले. हॉलचे दार उघडे होते. मी सर गेरव्हासना जिना

उतरून येतांना पाहिले. त्यांनी हॉल ओलांडला आणि पॅसेजमधून जात अभ्यासिकेत गेले.”

“हे किती वाजता घडले?”

“आठ वाजण्यापूर्वी किंवा आठला पाच मिनिटे असतील.”

“आणि तेच तू त्याना शेवटचे पाहिलेस?”

“हो, सर.”

“तू गोळीचा आवाज ऐकलास का?

‘हो. खरेच ऐकला. पण अर्थात तेव्हा त्याची काही कल्पना नव्हती. कशी असणार?”

“तुला तो कसला आवाज वाटला?”

‘मला वाटले तो गाडीचा आवाज होता. बागेच्या भिंतीनंतर लगेच रस्ता सुरु होतो. किंवा तो जंगलातून आल्यासारखे मला वाटले. कदाचित अंडे उकडण्याच्या पात्राचा असेल. असेही वाटले. मी कधीच स्वप्न बघत नाही --- ”

मेजर रीडलने त्याला जाऊ दिले. “त्यावेळेस किती वाजले होते?”

“बरोबर आठ वाजून आठ मिनिटे झाली होती.”

मुख्य कॉन्स्टेबल धारदारपणे बोलला, “तू इतकी अचूक वेळ कशी काय सांगू शकतोस?”

“ते सोपे आहे, सर. मी नुकतीच पहिली घंटी ऐकली होती.”

“पहिली घंटी?’

“हो, सर. सरांच्या आज्ञेप्रमाणे, ती नेहमी प्रत्यक्ष जेवणाच्या घंटी पूर्वी आठ मिनिटे वाजवली जात असे. त्याबाबतीत ते एकदम आग्रही होते. सगळ्यांनी हॉलमध्ये त्या वेळेला, म्हणजे दुसरी घंटी वाजल्यावर हजर असले पाहिजे. मी दुसरी घंटी वाजवली व हॉलमध्ये गेलो. जेवण तयार असल्याचे सांगितले. मग सगळेजण आत आले.”

पायरो म्हणाला, “आता मला समजले की तू संध्याकाळचे जेवण तयार असल्याचे सांगितलेस, तेव्हा तू इतका आश्चर्यचकीत का झालास. सर गेरव्हास नेहमीप्रमाणे तेव्हा हॉलमध्ये नव्हते?”

“यापूर्वी अशावेळी ते तिथे नाहीत, असे मला कधीच आठवत नव्हते. हा मला धक्का होता. मी थोडा विचार केला.”

परत मेजर रिडल मोठ्या कौशल्याने मध्येच बोलला, “आणि इतरजणदेखील सहसा तिथे असायचे का?”

स्नेल खोकला.

जो जेवायला यायला उशीर करेल, त्याला सर कधीही घरी बोलावत नसत.

“हं, हे फार टोकाचे झाले.”

“आधी मोर्व्हियाच्या सम्राटाकडे काम करणाऱ्या स्वयंपाक्याला सर गेरव्हासने इथे आणले होते. तो म्हणत असे जेवण हे धार्मिक विधीं इतकेच महत्वाचे आहे.”

“आणि त्यांच्या स्वतःच्या कुटुंबांबद्दल काय?”

“चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब तो नाराज होऊ नये म्हणून दक्ष असत. मिस रुथसुद्धा कधी जेवायला यायला उशीर करत नसे.”

पायरो पुटपुटला, “हे रुचीपूर्ण आहे.”

रिडल बोलला, “अस्स! म्हणजे जेवण सव्वा आठला असल्यामुळे, तुम्ही पहिली घंटी नेहमीप्रमाणे आठ वाजून आठ मिनिटांनी वाजवली का?”

“बरोबर, सर --- पण ती नेहमीसारखी नव्हती. जेवणाची नेहमीची वेळ आठ होती. सर गेरव्हासनी आज्ञा दिली होती, की आज संध्याकाळी जेवण पंधरा मिनिटे उशीरा असेल, कारण एक मनुष्य त्याना भेटायला उशीराच्या गाडीने येणार होता.”

स्नेल पायरोकडे बघून थोडा झुकला.

“जेव्हा तुझे मालक अभ्यासिकेकडे गेले, तेव्हा ते काळजीत किंवा दुःखात दिसत होते का?”

“ते मला सांगता येणार नाही. हावभाव दिसण्यासाठी मी त्यांच्या पासून फारच लांब होतो. मला ते दिसले, एवढेच.”

“ते अभ्यासिकेत गेले, तेव्हा एकटेच होते का?

“हो, सर.”

“त्यानंतर कोणी अभ्यासिकेत गेले का?”

“मला सांगता येणार नाही. मी त्यानंतर स्वयंपाकघरात गेलो. आणि मी आठ वाजून आठ मिनिटांनी पहिली घंटी वाजवेपर्यंत तिथेच होतो.”

“तेव्हाच तू गोळीचा आवाज ऐकलास का?”

“हो, सर.”

पायरोने हळूवारपणे मध्येच एक प्रश्न विचारला, “तिथे असलेल्या इतरांनीदेखील गोळीचा आवाज ऐकला असेल, नाही का?”

“हो, सर. मिस्टर ह्युगो, मिस कार्डवेल आणि मिस लीगार्ड.”

“हे लोकसुद्धा हॉलमध्ये होते?”

“मिस लीगार्ड हॉलमधून बाहेर आली होती आणि मिस कार्डवेल व मिस्टर ह्युगो वरून खाली येत होते.”

पायरोने विचारले, “तिथे याबद्दल काही संभाषण झाले का?”

“सर, मिस्टर ह्युगोने विचारले, “जेवणात शँपेन आहे का. मी त्याना सांगितले की, शेरी, हॉक आणि बरगंडी देण्यात येणार आहे.”

“त्याला तो आवाज शँपेनची बाटली उघडल्याचा वाटला का?”

“हो, सर.”

“पण कोणीच ते गंभीरपणे घेतले नाही?”

“नाही, सर. ते सगळे बोलत व हसत हॉलमध्ये गेले.”

“घरातील इतर सदस्य कुठे होते?”

“मला सांगता येणार नाही, सर.”

मेजर रिडल बोलले, “तुला या पिस्तुलबद्दल काही माहिती आहे का?” हे बोलतांना त्याने ते हातात धरले होते.

“हो, सर. ते सर गेरव्हास यांचे होते. ते नेहमी त्यांच्या टेबलाच्या खणात ठेवलेले असे.”

“ते सहसा भरलेले असे का?”

“ते मला सांगता येणार नाही.”

मेजर रिडल यांनी ते खाली ठेऊन त्यांचा घसा खाखरला. “स्नेल, आता मी तुला काही महत्वाचे प्रश्न विचारणार आहे. मी अशी अपेक्षा करतो, की तू त्यांची जास्तीत जास्त खरी उत्तरे देशील. तुझ्या मालकांनी आत्महत्या करण्याचे, एक तरी कारण तुला ठाऊक आहे का?”

“नाही, सर. मला काही माहिती नाही.”

सर गेरव्हास यांचे वर्तन अलीकडे काही वेगळे नव्हते ना? थोडे मलूल, किंवा काळजीत असल्यासारखे?

स्नेल माफी मागत खोकला. “तुम्ही मला हे सांगितल्याबद्दल माफ कराल. पण सर गेरव्हास यांचे वर्तन पाहुणे मंडळींना कदाचित थोडे विचित्र वाटले असेल. पण ते फार उच्च प्रकारे अतिशय सभ्य गृहस्थ होते.”

“हो. हो. ते मला चांगले माहिती आहे.”

“पाहुणे नेहमी सर गेरव्हासना समजून घेतील, असे नाही.

स्नेलने ही फार महत्वाची गोष्ट असल्यासारखी सांगितली.

“मला माहिती आहे. पण त्यात तुला वेगळे दिसेल, असे काही नव्हते, नाही का?

स्वयंपाकी हो नाही करू लागला. शेवटी तो म्हणाला, ‘‘मला वाटते, सर, सर गेरव्हास कसल्या तरी काळजीत होते.’’

‘‘काळजी आणि उदासी?’’

‘‘मला उदास वाटले नाहीत. पण काळजीत होते. हो.’’

‘‘तुम्हाला त्याना कसली काळजी होती, याची काही कल्पना आहे का?’’

‘‘नाही, सर.’’

‘‘ती कुणा एखाद्या व्यक्तीशी संबंधित होती का?

‘‘मला तसे काही सांगता येणार नाही. पण असे आपले मला वाटत होते.’’

पायरो परत म्हणाला, ‘‘तुम्हाला त्याच्या आत्महत्येमुळे नवल वाटले?’’

‘‘फारच नवल वाटले. मला खूप धक्का बसला. मला कधी स्वप्नातही असे होईल, असे वाटले नव्हते.’’

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.’’

रिडलने त्याच्याकडे नजर टाकली व म्हटले, ‘‘स्नेल, मला वाटते आमचे प्रश्न संपले आहेत. तुझी खात्री आहे का, की तू

आम्हाला अजून काही सांगू शकत नाहीस? उदाहरणार्थ, मागील काही दिवसात घडलेली एखादी असामान्य घटना?"

स्वयंपाक्याने उभे रहात मान डोलावली. "काही नाही, सर"

"मग तू जाऊ शकतोस."

"आभारी आहे, सर."

दाराकडे जात, स्नेल परत येऊन बाजूला उभा राहिला. चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब खोलीत शिरल्या.

तिने पूर्व आशियातील वाटणारे जांभळे आणि शेंदरी घट्ट बसणारे रेशमी कपडे घातले होते. तिचा चेहरा शांत आणि तिचे वर्तन संथ होते.

मेजर रिडल उभा रहात बोलला, "चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब"

ती बोलली, "ते मला म्हणाले तुम्हाला माझ्याशी बोलायचे आहे, म्हणून मी आले. आपण दुसऱ्या खोलीत जायचे का? हे तुमच्यासाठी टोकाचे त्रासदायक असेल."

तिने मान हलवली व ती एका छानशा खुर्चीत बसली व पुटपुटली, "ओहो, ठीक आहे. त्याचे एवढे काही नाही, नाही का?"

“चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब, तुमच्या भावना बाजूला ठेऊन, तुम्ही आलात हे चांगले झाले. मला माहिती आहे, हा तुमच्यासाठी केवढा मोठा धक्का होता --- “

ती मध्येच बोलली, “पहिल्यांदा तो धक्का होता. पण इथे मरणासारखी काही गोष्ट नाही आहे. तुम्हाला माहिती आहे का, खरे तर, हा केवळ बदल आहे.” तिचा आवाज सोपा आणि संभाषण करणारा होता. “खरे तर गेरव्हास आता तुमच्या मागे डाव्या खांद्याजवळ उभा आहे. मला तो ठळकपणे दिसतो आहे.”

मेजर रिडलचा डावा खांदा थोडासा हलला. त्याने बाईसाहेबांकडे संशयाने बघितले.

ती त्याच्याकडे बघून हसली. “अर्थात, तुमचा विश्वास बसत नाही. अगदी थोड्या लोकांचा बसेल. माझ्यासाठी आत्मिक जग खरे असल्यासारखेच आहे. पण तुम्हाला काय पाहिजे ते विचारा. आणि मला दुःख होईल, याची काळजी करू नका. मला काहीही दुःख होत नाही आहे. हा सगळा नशीबाचा खेळ आहे. कुणालाच कर्म चुकलेले नाही. हे सगळे काही --- आरशासारखे पारदर्शी असते --- सगळेच.”

“बाईसाहेब, आरसा?”

तिने निरर्थकपणे मान हलवली.

“हो. तो फुटला आहे. हे प्रतिकात्मक आहे. तुम्हाला टेनिसनची कविता माहिती आहे? मी लहान असताना ती वाचत असे --- तेव्हा मला त्याचा गूढार्थ समजला नव्हता. शॅलोट बाईसाहेब ओरडल्या, ‘आरसा या बाजूपासून त्या बाजूपर्यंत फुटला. “शाप माझ्यावर आला.”’ गेरव्हासच्या बाबतीत हेच झाले. अचानक त्याच्यावर शाप चालून आला. मला वाटते, तुम्हाला माहिती आहे, जुन्या कुटुंबांना शाप असतो --- आरसा फुटला. त्याला माहिती होते, तो मरणार आहे. शाप खरा ठरला.”

“पण बाईसाहेब, पण आरसा काही शापाने फुटला नाही --- ती पिस्तुलातील गोळी होती.”

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब अजूनही त्याच गोड अंमलाखाली होत्या.” खरे तर ते सर्व काही, सारखेच आहे --- ते नशीब होते.”

“पण तुमच्या नवऱ्याने स्वतःला मारून घेतले.”

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब कुठल्याही गोष्टीसाठी तयार असल्यासारख्या हसल्या. “त्याने असे करायला नको होते. पण तो नेहमी अधीरपणा करायचा. त्याला कधी थांबता यायचे नाही. त्याची वेळ आली --- तो तिला भेटायला धाऊन गेला. खरेच, हे इतके साधे आहे.”

मेजर रिडल त्याचा घसा खाखरत तीक्ष्णपणे बोलला, “म्हणजे तुमच्या नवऱ्याने स्वतःचे आयुष्य संपवले, त्याचे तुम्हाला काहीच वाटले नाही? तुम्हाला असे काही होण्याची अपेक्षा होती का?”

तिने डोळे मोठे करून म्हटले, “ओहो, नाही. कोणाला भविष्य कळत नाही. गेरव्हास फार विचित्र माणूस होता. अगदी वेगळ्या प्रकारचा. तो कुणासारखा नव्हता. तो एक वेगळाच माणूस जन्मला होता. मला ते काही काळ समजले होते. त्याला स्वतःलाही ते माहिती होते. रोजच्या जगातील मूर्खपणाचा क्षुल्लक दर्जा समजून घेणे त्याला कठीण गेले.” ती मेजर रिडलच्या खांद्यावरून मागे बघत बोलली, “तो आता हसतो आहे. त्याला वाटते आहे, आपण सगळे मूर्ख आहोत. तसे खरेच आहे. मुलांसारखे! आयुष्य खरे आहे, असे ढोंग करणारे, त्यामुळेच असे होते --- आयुष्य म्हणजे अनेक मृगजळांपैकी एक आहे.”

आपण एक लढाई हरतो आहोत असे वाटून, मेजर रिडलने हताश होऊन विचारले, “तुमच्या नवऱ्याने आयुष्य का संपवले, हे समजून घेण्यासाठी तुम्ही आम्हाला काही मदत करू शकत नाही का?”

तिने तिचे बारीक खांदे उडवले. “आपण कठपुतळया असल्यासारखे वरून आपल्याला दोर हलवत असतात. वास्तविक जगात तुम्ही त्याप्रमाणे जगत असता.”

पायरो खाखरला. “बाईसाहेब, तुम्हाला तुमच्या नवऱ्याने त्याच्या संपत्तीचे काय करायचे ठरवले होते, याची काही कल्पना आहे का?”

ती त्याच्याकडे बघत राहिली. पैसे? मी त्याचा कधीच विचार करत नाही.” तिचा स्वर बेफिकिरीचा होता.

पायरोने विषय बदलला. “आज संध्याकाळी जेवणासाठी तुम्ही किती वाजता खाली उतरलात?”

“वेळ? किती वाजता? वेळ अनंत आहे. अनंत हेच माझे उत्तर आहे.”

पायरो पुटपुटला, “बाईसाहेब, पण तुमचा नवरा वेळाच्या बाबतीत आग्रही होता --- विशेषतः जेवणाच्या वेळाच्या बाबतीत --- असे मला सांगितले गेले.”

ती उदारपणे हसली, “प्रिय गेरव्हास त्याबाबतीत फार मूर्ख होता. पण त्यामुळे तो आनंदित होई. त्यामुळे आम्ही कधी उशीर करत नसू.”

“बाईसाहेब, पहिली घंटी वाजली, तेव्हा तुम्ही हॉलमध्ये होतात का?”

“नाही. मी माझ्या खोलीत होते.”

“तुम्हाला आठवते का की तुम्ही खाली आलात, तेव्हा हॉलमध्ये कोणकोण होते?”

“मला वाटते, बहुतेक सर्वजण” ती संदीग्धतेने म्हणाली. “त्याचे काय एवढे?”

पायरोने कबूल केले, “सहसा एवढे काही नाही. पण दुसरे काही आहे. तुमच्या नवऱ्याने तुम्हाला कधी असे सांगितल्याचे आठवते का, की तो कधी लुटला गेला आहे?

तिला प्रश्नात फार स्वारस्य नव्हते. “लुटला गेला? नाही, मला असे वाटत नाही.”

“लुटला गेला, पैसे चोरीला गेले --- त्याच्यावर हल्ला केला गेला?”

“नाही. नाही. मला असे वाटत नाही --- जर गेरव्हासबरोबर कुणी असे वर्तन केले असते, तर तो फार रागावला असता.”

“म्हणजे त्याने तुम्हाला असे काही झालेले, सांगितले नाही?”

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब डोके हलवत, फार रस न घेता बोलल्या. “नाही --- नाही. नाहीतर मला आठवले असते --- ”

“तुम्ही तुमच्या नवऱ्याला शेवटचे जिवंत केव्हा पाहिले?

“जेवणापूर्वी जिन्यातून खाली उतरतांना, त्याने नेहमीप्रमाणे, पाहिले. माझी नोकराणी तिथे होती. तो एवढेच बोलला, की तो खाली चालला आहे.”

“गेल्या काही आठवड्यात तो जास्त कशाबद्दल बोलला?”

“ओहो, कुटुंबाच्या इतिहासाबद्दल. त्याचे ते काम खूप छान चालले होते. त्याला बऱ्याच मजेशीर जुन्या गोष्टी सापडल्या. मिस लिंगार्ड अगदी अमूल्य आहे. तिने त्याच्यासाठी ब्रिटीश वस्तुसंग्रहालयातील --- तशा प्रकारच्या वस्तु पाहिल्या --- तुम्हाला माहिती आहे का, उमराव मुल्कास्टरने लिहिलेल्या पुस्तकासाठी तिने मदत केली होती. ती कसबी व भावविभोर होती. म्हणजे ती चुकीचे काही करत नसे. शेवटी एखाद्याला आपल्या पूर्वजांची निंदानालस्ती करायची नसते. गेरव्हास फार भावस्पर्शी होता. तिने मलाही खूप मदत केली होती. तिने माझ्यासाठी हटशेपसूटबद्दल [१४५८ ते १४७३ मधील इजिप्तची राणी] बरीच माहिती गोळा केली होती. तुम्हाला माहिती आहे का, मी म्हणजे

त्या इजिप्शियन राणीच्या आत्म्याच्या माझ्या शरीरात झालेला जन्म आहे.''

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांनी हे अगदी शांत आवाजात सांगितले. ती म्हणाली, ''त्यापूर्वी, मी अटलांटीसमध्ये धर्मगुरू होते.

मेजर रिडल त्याच्या खुर्चीत थोडा सरकून बसला. तो म्हणाला, ''अरेच्च्या, हे फार रुचीपूर्ण आहे. ठीक आहे. बाईसाहेब, तुम्ही इथे आलात म्हणून मी तुमचा आभारी आहे. एवढेच बोलायचे होते.''

बाईसाहेब त्यांच्या पोषाखाचा घोळ सावरत उठल्या. ''शुभरात्र'' एवढे बोलून तिचे डोळे मेजर रीडलच्या खांद्यावरून मागे वळले. ''प्रिय गेरव्हास, शुभरात्र. माझी इच्छा आहे की तू परत यावेस पण मला माहिती आहे, तुला तिथे रहावे लागेल.'' तिने स्पष्टीकरणात्मक रीत्या पुढे म्हटले, ''गेले चोवीस तास तू तिथे आहेस आणि तुला तिथे रहावे लागेल. काही वेळाने तुला हलता व बोलता येऊ शकेल.'' एवढे बोलून, ती खोलीबाहेर गेली.

मेजर रिडलने त्याच्या भुवईवर रुमाल फिरवला. ''सुटलो! मला वाटले होते, त्यापेक्षा ही फारच वेडी आहे. खरेच तिचा या सर्व मूर्खपणावर विश्वास आहे?''

पायरोने विचारपूर्वक डोके हलवले. तो म्हणाला, “आता तिला त्याची गरज आहे. स्वतःभोवती आभासात्मक जग उभे करून नवऱ्याच्या मृत्युच्या कठोर वास्तवामधून निसटण्यासाठी ती तसे करते आहे.”

मेजर रिडल बोलला, “मला तर ती सर्टिफिकीट देण्यायोग्य वाटली. ती म्हणजे मूर्खपणाचा गोंधळलेला अर्क आहे. तिच्या बोलण्यात काहीच अर्थ नाही.”

“नाही. नाही. माझ्या मित्रा, जसे मिस्टर ह्युगो बोलतांना मला सहज म्हणाला तसे, येथील सर्व घटनांमध्ये, प्रासंगिक गर्विष्ठपणाची आस आहे.” तो उठून खोलीत फेऱ्या मारू लागला. “या प्रकरणातील काही गोष्टी मला आवडल्या नाहीत. नाही. मला मुळीच आवडल्या नाहीत.”

रिडलने त्याच्याकडे चौकसपणे पाहिले. “म्हणजे तुला आत्महत्येचा उद्देश असे म्हणायचे आहे का?”

“आत्महत्या --- आत्महत्या! तुला सांगतो, हे सर्व चुकीचे आहे. मानसशास्त्रीय दृष्ट्या चुकीचे आहे. चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब त्याच्याबद्दल कसा विचार करतात? तर एखादा विश्वाचा केंद्रबिंदू असलेल्या मोठया फार महत्वाच्या माणसाचा, पुतळा असावा, तसा! असा माणूस स्वतःला संपवेल का? मुळीच नाही.

तो दुसऱ्या कुणाला तरी संपवेल. त्याला राग आणणारी कोणीतरी विचित्रपणे हालचाल करणारी मानवी मुंगी --- असले कृत्य करणे त्याला जरुरीचे वाटेल --- काही पवित्र कृत्य वाटेल. पण स्वतःची हत्या? प्रत्यक्ष स्वतःची हत्या?"

"पायरो, हे सगळे ठीक आहे. पण पुरावा स्पष्ट आहे. दार कुलुपबंद. किल्ली स्वतःच्या खिशात. खिडकी घट्ट लावून घेतलेली. मला माहिती आहे, अशा गोष्टी पुस्तकात घडतात. पण त्या प्रत्यक्षात घडलेल्या मी कधी पाहिल्या नव्हत्या. अजून काही?"

पायरो खुर्चीत बसत बोलला, "पण हो, अजून काहीतरी आहे. समजा मी चेव्हेनिक्स-गोर आहे. मी टेबलाशी बसलो आहे. मी स्वतःला मारून घ्यायचे ठरवले आहे --- कारण, आपण असे म्हणूया, मला कुटुंबाच्या नावाशी संबंधित भयंकर मानहानीकारक असे काही समजते. ते पूर्णपणे खात्रीशीर नसले, तरी आत्महत्या करायला पुरेसे कारण असणार."

"अरे मित्रा, मी काय करेन? मी एका कागदावर माफ करा, असे खरडेन. हं! असे करणे शक्य आहे. मग मी टेबलाचा खण उघडतो. नेहमी तिथे असणारे पिस्तुल बाहेर काढतो. जर त्यात गोळ्या नसतील, तर त्या भरतो, आणि नंतर --- मी मलाच मारून घ्यायला प्रवृत्त होतो? नाही. पहिल्यांदा मी माझी खुर्ची फिरवतो --

- मग मी थोडासा उजवीकडे वाकतो. मग पिस्तुल माझ्या कानशीलाला टेकवतो आणि चाप ओढतो!"

पायरो त्याच्या खुर्चीतून उठून, म्हणतो, "मी तुला विचारतो, यात काही अर्थ आहे का? खुर्ची का फिरवायची? उदाहरणार्थ, जर भिंतीवर चित्र असेल तर मग हो, तर काही स्पष्टीकरण असू शकत होते. मरणाऱ्या माणसाने आपल्या डोळ्यांनी बघायची इच्छा केलेली या पृथ्वीतलावरील शेवटची वस्तू, पण खिडकीचा पडदा --- हे काही बरोबर वाटत नाही."

"त्याने खिडकीतून बाहेर त्याच्या इस्टेटीवर नजर टाकायची इच्छा केली असेल."

"अरे माझ्या प्रिय मित्रा, हे तू काही ठामपणे सुचवत नाही आहेस. खरे तर तुला माहिती आहे, यात काही अर्थ नाही. आठ वाजून आठ मिनिटांनी, सर्वत्र अंधार आहे. आणि खिडकीचे पडदे ओढलेले आहेत. नाही, काही दुसरे स्पष्टीकरण असले पाहिजे --- "

"मला एकच शक्य वाटते आहे. की गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर वेडा होता."

पायरोने असमाधानाने डोके हलवले.

मेजर रिडल उठला. तो बोलला, "चला. आपण जाऊन इतर लोकांशी बोलू. त्यातून आपल्या हाती काही लागेल."

# सात

चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांकडून, काही ठोस माहिती न मिळाल्याने, मेजर रिडलला फोर्ब्ससारख्या गर्विष्ठ वकिलाकडून, माहिती मिळवायला फारच बरे वाटत होते.

मिस्टर फोर्ब्स त्यांचे शब्द अगदी काळजीपूर्वक वापरत होते. पण त्यांची उत्तरे जेवढ्यास तेवढी होती. त्यांनी कबूल केले की सर गेरव्हासच्या आत्महत्येमुळे त्याला चांगलाच धक्का बसला होता. सर गेरव्हास स्वतःचा जीव घेईल, असे त्याला कधीच वाटले नव्हते. त्याने असे का केले, त्याचे काही उत्तर त्यांच्याकडे नव्हते. “सर गेरव्हास माझे फक्त अशील नव्हते, तर चांगले जुने मित्र होते. मी लहानपणापासून त्यांना ओळखतो. मी असे म्हणेन, की तो नेहमी आयुष्य मजेत जगत होता.”

मिस्टर फोर्ब्स, या परिस्थितीत मी तुम्हाला अगदी मोकळेपणे खरे बोलायची विनंती करतो. तुम्हाला त्याच्या आयुष्यातील एखादी गुप्त स्वरूपाची काळजी किंवा दुःख माहिती होते का?”

“नाही. त्याला बऱ्याच लोकांना असतात, तशा काही लहानसहान काळज्या होत्या, पण गंभीर स्वरूपाची अशी काही नव्हती.”

“काही आजार? नवराबायकोत काही कुरबुरी?”

“नाही. सर गेरव्हास आणि त्याची बायको, हे एकमेकांशी एकनिष्ठ होते.”

मेजर रिडल काळजीपूर्वक बोलले, “चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांचा दृष्टीकोन आम्हाला थोडा विचित्र वाटला.”

मिस्टर फोर्ब्स थोडे उदार, पुरुषी हसू हसले. “बायकांना त्यांचे तर्कवितर्क आपण लढवू दिले पाहिजेत.”

मुख्य कॉन्स्टेबल बोलला, “तुम्ही सर गेरव्हास यांचे सर्व कायदेशीर व्यवहार बघत होतात?”

‘हो. फोर्ब्स, ओजील्व्ही आणि स्पेन्स ही माझी कंपनी चेव्हेनिक्स-गोर कुटुंबासाठी गेले शंभर वर्षे काम करत आहे.”

“चेव्हेनिक्स-गोर कुटुंबात काही भानगडी होत्या का?”

“मिस्टर फोर्ब्सच्या भुवया वर गेल्या. “तुम्ही काय म्हणत आहात, मला कळत नाही.”

“मिस्टर पायरो, तुम्ही मिस्टर फोर्ब्सना तुम्हाला आलेले पत्र दाखवाल का?”

पायरो गुपचूप उठला व थोडे वाकून, मिस्टर फोर्ब्सच्या हातात पत्र दिले.

मिस्टर फोर्ब्सने ते वाचले व त्याच्या भुवया अजूनच वर चढल्या. तो बोलला, "फार उल्लेखनीय पत्र आहे. मी आता तुमच्या प्रश्नाचे कौतुक करतो. नाही. मला माहिती आहे, तोपर्यंत अशा पत्राचे विशेष काही नाही. सर गेरव्हासने तुम्हाला या पत्राबद्दल काही सांगितले नव्हते?"

"काहीही नाही. काही सांगितले नाही, हे जरा गूढ वाटते. त्याने असे करायला नको होते."

त्याला तुमच्याबद्दल पूर्ण विश्वास होता, असे वाटते, नाही का?"

"मला वाटते, तो माझ्या अंदाजावर विसंबून होता."

"आणि तुम्हाला याबद्दल काहीच कल्पना नाही?"

"मला काही नको त्या कल्पना लढवायला, आवडत नाहीत."

मेजर रिडलला त्या उत्तरातील सच्चेपणा आवडला. "मिस्टर फोर्ब्स, आता तुम्ही आम्हाला सांगू शकाल, की सर गेरव्हासने त्याच्या संपत्तीचे वाटप कसे केले आहे?"

"नक्कीच. हे सांगायला माझी काहीच हरकत नाही. इस्टेटीमधून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी वार्षिक सहा हजार पौंड आणि डोवर येथील घर किंवा लोन्डेस येथील घर, जे तिला पाहिजे ते, त्याने त्याच्या बायकोसाठी ठेवले आहे. यात अनेक कायदेशीर

बाबी व काही इतर गोष्टी आहेत पण त्या काही फार अवघड नाहीत. इतर सर्व त्याच्या दत्तक मुलीला, रुथला अशा अटीवर दिले आहे, की तिने लग्न केले व तिच्या नवऱ्याने चेव्हेनिक्स-गोर हे आडनाव लावायचे मान्य केले तर."

. "भाचा ह्युगो याच्यासाठी काही ठेवले नाही का?"

"हो. पाच हजार पौंड."

"मी धरून चालतो, की सर गेरव्हास हा श्रीमंत माणूस होता?"

"तो खूपच श्रीमंत होता. त्याची इस्टेट सोडून त्याचे खासगी नशीब खूप चांगले होते. पण तरीही तो पूर्वीइतका श्रीमंत नव्हता. बहुतेक सर्व गुंतवणूक ताणाखाली होती. शिवाय सर गेरव्हासने काही कंपन्यांमध्ये पैसे गुंतवले होते --- पॅरॅगॉन सिंथेटिक रबर सबस्टीट्युट यात पैसे गुंतवायचा सल्ला त्याला कर्नल बरीने दिला होता."

"तो सल्ला फार शहाणपणाचा नव्हता का?"

मिस्टर फोर्ब्सने सुस्कारा टाकला. "निवृत्त सैनिकांना यात सर्वात जास्त फटका बसला. त्यांच्या विधवांना त्याचा बराच त्रास झाला."

"पण या दुर्दैवी गुंतवणुकीमुळे, सर गेरव्हासच्या पैशांवर तसा काही गंभीर परिणाम झाला नाही?"

“नाही. गंभीरपणे नाही. तरी तो पुष्कळ श्रीमंत होता.”

“हे इच्छापत्र केव्हा केले होते?

“दोन वर्षांपूर्वी.”

पायरो पुटपुटला, “ही व्यवस्था मिस्टर ह्युगोवर थोडा अन्याय करणारी होती, असे वाटत नाही का?” शेवटी तो सर गेरव्हासच्या रक्ताच्या नात्यातील होता, नाही का?”

मिस्टर फोर्ब्सने खांदे शहारवले.

प्रत्येकाने आपल्या कुटुंबाचा इतिहास काही प्रमाणात लक्षात घ्यायला हवा.”

“जसे की --- “

मिस्टर फोर्ब्स पुढे बोलण्यास थोडे नाराज दिसले.

मेजर रिडल बोलला, “तुम्ही असा विचार करू नका, की आम्ही काही संबंध नसलेली जुनी प्रकरणे वा तत्सम काही उकरून काढत आहोत. पण सर गेरव्हासचे पायरोला लिहिलेल्या या पत्राचे स्पष्टीकरण मिळवायला हवे.”

मिस्टर फोर्ब्स लगेच म्हणाले, “सर गेरव्हासच्या त्याच्या भाच्याबद्दलच्या दृष्टीकोनाच्या स्पष्टीकरणात काही प्रकरण घुसडायचे कारण नाही. पण पत्राचे स्पष्टीकरण हवे, हे बरोबर आहे.

हे सरळ आहे, की सर गेरव्हास कुटुंबात गंभीरपणे प्रमुख भूमिका निभावत असत. त्यांना लहान बहीण, पामेला होती व भाऊ, अँथनी चेव्हेनिक्स-गोर लढाईत मारला गेला होता.

पामेलाचे लग्न सर गेरव्हासना पसंत नव्हते. म्हणजे त्याचे म्हणणे असे होते, की तिने लग्नापूर्वी त्याची मान्यता घ्यायला हवी होती. कॅप्टन ट्रेन्टचे कुटुंब चेव्हेनिक्स-गोर कुटुंबाच्या तोलामोलाचे नव्हते. त्याच्या बहिणीचे या वक्तव्याने फक्त मनोरंजन झाले. त्यामुळे सर गेरव्हासना त्यांचा भाचा आवडत नसे. त्यामुळे बहुधा त्याने मुलगी दत्तक घेतली असावी."

"त्याला स्वतःला मुले होण्याची आशा नव्हती का?"

"नव्हती. लग्नानंतर एक वर्षाने त्याच्या पोटी मृत बालक जन्माला आले होते. डॉक्टर म्हणाले, की चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांना कधीच अजून मूल होऊ शकणार नाही. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांनी रुथला दत्तक घेतले."

"आणि रुथ कोण होती? त्यांनी तिला कसे निवडले?"

"मला वाटते, ती लांबच्या नात्यातील होती."

पायरो म्हणाला, "मी असा अंदाज केला होता. त्याने कुटुंबातील व्यक्तींच्या तसबिरींनी भरलेल्या भिंतीकडे नजर टाकली. "एखाद्याला कळेल की ती त्याच रक्ताची होती --- नाक.

हनुवटीची रेषा. हे गुण या तसबिरींमध्ये अनेक वेळा उमटलेले दिसत होते.”

मिस्टर फोर्ब्स कोरडेपणे म्हणाले, “तिने स्वभावसुद्धा उचलला आहे.”

“त्यामुळे मी कल्पना करू शकतो. ती आणि तिचे दत्तक वडील यांचे एकमेकांशी कसे जमत असेल?”

“तुम्ही कल्पना कराल, तेवढे थोडे आहे. इच्छापत्रावरुन एकापेक्षा जास्त वेळा वाद झालेले आहेत. पण ही भांडणे होऊनही त्यंच्यात खरी एकी होती, असा मला विश्वास आहे.”

“पण तरी तिने त्याच्यासाठी चांगलीच काळजी उत्पन्न केली होती का?”

“सततची काळजी. पण मी तुम्हाला मी खात्री देऊ शकतो, की ती स्वतःचा जीव घेण्याचे कारण होण्याइतकी नव्हती.”

पायरोने कबूल केले, “ओहो, एवढी नव्हती, बरोबर. एखाद्याला उत्साही व ठाम निश्चयाची मुलगी असेल, तरी त्याने स्वतःच्या डोक्याला त्रास करून घेऊ नये. तिचे ते गुण वंशपरंपरेने आलेले होते. सर गेरव्हास यांनी त्याचे इच्छापत्र बदलायचा विचार कधीच केला नाही का?”

त्रासिकपणा लपवण्यासाठी मिस्टर फोर्ब्सने घसा खाखरला. "खरे पाहता, मी सर गेरव्हासकडून नवीन इच्छापत्र करण्यासंबंधी सूचना घेतल्या होत्या. [म्हणजे दोन दिवसांपूर्वी]" मेजर रिडलने त्याची खुर्ची थोडी जवळ आणत म्हटले, "हे काय? तू हे आम्हाला कधीच सांगितले नाहीस."

मिस्टर फोर्ब्स लगेच म्हणाले, "तुम्ही मला एवढेच विचारले, की त्याच्या इच्छापत्रातील बाबी काय होत्या? त्यासाठी मी उत्तर दिले. नवे इच्छापत्र तयारही झाले नव्हते, मग सह्यांची गोष्ट दूरच राहिली."

"त्यात काय होते? त्यावरून सर गेरव्हासच्या मनाची अवस्था लक्षात येऊ शकेल."

"मुख्य म्हणजे, बाकी सगळे पूर्वीसारखेच होते. फक्त मिस चेव्हेनिक्स-गोरने मिस्टर ह्युगो ट्रेन्टशी लग्न केले, तरच तिला वारसाहक्काने संपत्ती मिळाली असती."

पायरो बोलला, "आहा, पण यात अगदी ठरवून केलेला बदल आहे."

मिस्टर फोर्ब्स म्हणाले, "मी हा बदल मान्य करत नाही. आणि मला हे सुचवणे बंधनकारक वाटते, की अशी शक्यता आहे, की हे

यशस्वी होऊ शकेल. अशा सूचना कोर्ट मान्य करत नाही. पण मिस्टर गेरव्हास मात्र या बाबतीत ठाम होते.''

''आणि जर मिस चेव्हेनिक्स-गोरने [किंवा मिस्टर ट्रेन्टने] हे लग्न करण्यास नकार दिला तर?''

''जर मिस्टर ट्रेन्ट मिस चेव्हेनिक्स-गोरबरोबर लग्नाला तयार असेल, तर पैसा तिच्याकडे जाईल. पण तो तयार असेल आणि तिने नकार दिला, तर पैसा त्याला मिळेल.''

मेजर रिडल बोलला, ''हे काहीतरीच आहे.''

पायरो पुढे झाला व त्याने मिस्टर फोर्ब्सच्या गुडघ्यावर थोपटले. ''पण याच्यामागे काय आहे? सर गेरव्हासच्या मनात हा बदल करताना काय होते? काहीतरी अगदी नेमक्या स्वरूपाचे असणार --- मला वाटते, त्याच्या मनात त्याला न आवडणाऱ्या कुठल्यातरी माणसाचा विचार असणार. मिस्टर फोर्ब्स, तो मनुष्य कोण आणि कसा होता, हे तुम्हाला माहिती असणार.''

''मिस्टर पायरो, मला काही माहिती नाही.''

''पण तुम्ही अंदाज करू शकता.''

मिस्टर फोर्ब्स धक्का बसल्यासारख्या म्हणाले, ''मी कधी अंदाज करत नाही. त्यांचा नाकावर क्लीप असलेला चष्मा काढून

रुमालाने पुसत, ते बोलले, “तुम्हाला अजून काही जाणून घ्यायचे आहे का?”

पायरो म्हणाला, “या क्षणी मला तरी काही विचारायचे नाही.”

मिस्टर फोर्ब्सने त्याच्याकडे असे पाहिले, की तो क्षण फार लांब नव्हता. आणि मग त्याचे लक्ष मुख्य कॉन्स्टेबलकडे वळवले.

“मिस्टर फोर्ब्स, मी आपला आभारी आहे. मला वाटते एवढे पुरेसे आहे. मी मिस चेव्हेनिक्स-गोरबरोबर बोलू शकलो, तर मला आवडेल.”

“ओहो, आणि कदाचित थोडे --- काय त्याचे नाव? --- मिस्टर बरोजबरोबरही बोलतो. पण पहिल्यांदा कुटुंबाच्या इतिहास लिहिण्यास मदत करणाऱ्या बाईबरोबर.”

“ते दोघेही वाचनालयात आहेत. मी त्यांना सांगतो.”

# आठ

वकील खोलीतून बाहेर पडल्यावर मेजर रिडल बोलले, “हे कठीण काम आहे. या जुन्या वळणाच्या लोकांकडून कायद्याच्या बाबतीतील माहिती काढून घेणे म्हणजे मोठे काम आहे. हे सगळे प्रकरण त्या मुलीभोवती फिरते आहे, असे मला वाटते.”

“असे वाटते आहे खरे!”

“ओहो, हा बरोज आला.”

त्याच्याबरोबर आम्हाला उपयोगी असलेली आनंदी उत्सुकता घेऊन, गॉडफ्रे बरोज आला. त्याचे हास्य अगदी थोडेसे दात दिसतील असे, काही गुप्तता पाळण्यासाठी केलेले वाटत होते. ते सहज न वाटता, मुद्दाम केलेले वाटत होते.

“मिस्टर बरोज, आता आम्ही तुम्हाला काही प्रश्न विचारणार आहोत.”

“मेजर रिडल, अगदी खात्रीने, काहीही विचारा.”

“सर्वात महत्वाचे म्हणजे, साध्या शब्दात, तुम्हाला सर गेरव्हासने आत्महत्या का केली असावी, याबद्दल काही कल्पना आहे का?”

“अजिबात नाही. मला तो मोठा धक्का होता.”

“तुम्हाला पिस्तुलाच्या गोळीचा आवाज ऐकू आला का?”

“नाही. माझ्या अंदाजाप्रमाणे, मी तेव्हा बहुधा वाचनालयात असेन. मी जेवायला लवकर आलो. मला एक संदर्भ बघायचा होता. म्हणून मी वाचनालयात गेलो. वाचनालय घराच्या अभ्यासिकेपासून विरुद्ध बाजूला आहे. त्यामुळे मला काही ऐकू आले नसेल.”

पायरोने विचारले, “वाचनालयात तुमच्याबरोबर कोण होते?

“कोणी नव्हते.”

“त्यावेळी घरातील इतर लोक कुठे होते, याची तुम्हाला काही कल्पना नव्हती का?”

‘मला वाटते वरती कपडे करत असावेत.”

“तुम्ही हॉलमध्ये केव्हा आलात?”

“मिस्टर पायरो येण्यापूर्वी थोडे आधी अर्थात सर गेरव्हास सोडून --- . तेव्हा तिथे सगळेजण होते.”

“तो तिथे नसल्याने, तुम्हाला नवल वाटले का?”

“हो. खरे तर वाटले. पहिली घंटी वाजण्यापूर्वीच तो तिथे हजर असे.”

“अलीकडे सर गेरव्हासच्या वागण्यात तुम्हाला काही बदल दिसला का? तो काळजीत असलेला, नाराज किंवा उदास दिसला का?”

गॉडफ्रे बरोजने ऐकून घेतले. “नाही. मला असे वाटत नाही. कदाचित फार कामामुळे --- थोडासा.”

“पण तो कुठल्या विशिष्ट कारणाने तसा वाटत होता का?

“ओहो, नाही.”

“काही पैशांसंबंधी काळज्या?”

“पॅरॅगॉन सिंथेटिक रबर कंपनी नावाच्या कंपनीत गुंतवलेल्या पैशांमुळे तो थोडासा अस्वस्थ होता.”

“तो त्याबद्दल काही बोलला का?”

परत गॉडफ्रे बरोजचे उसने हसू उमलून आले. ते जरासे खोटे वाटत होते.

“खरे तर तो असे म्हणाला --- “मिस्टर बरी मूर्ख तरी आहे किंवा लबाड आहे. मला वाटते, मूर्ख. पण व्हेन्डासाठी मला त्याला सांभाळून घेतले पाहिजे.”

पायरोने विचारले. “तो व्हेन्डासाठी असे का म्हणाला?”

"असे बघा, मिसेस चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांना कर्नल बरीबद्दल ममत्व होते आणि तोही तिला पूजत असे. पाळीव कुत्र्याप्रमाणे तिच्या मागेमागे असे."

"त्यामुळे सर गेरव्हासना मत्सर वाटत नसे का?"

"मत्सर? बरोज रोखून बघत हसू लागला. "सर गेरव्हास मत्सरी? त्याना याचे काय करावे, तेच कळायचे नाही. एवढेच काय, त्याच्या डोक्यात कधी हे शिरलेच नाही, की कोणीही त्याच्यापेक्षा इतर कोणत्याही माणसाला पसंत करेल. तुम्हाला समजले का, असे काही शक्य नव्हते."

पायरो सावकाश बोलला, "मला वाटते तुम्हाला सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर फारसा आवडत नसावा?"

बरोज लाजला. "ओहो, हो, आवडत नव्हता. पण हल्ली अशा गोष्टी एखाद्याला विचित्र वाटू शकतात."

पायरोने विचारले, "अशा गोष्टी म्हणजे?"

"राबवणूकीचे कलात्मक रूप, असे तुम्ही म्हणू शकता. पूर्वजांची पूजा आणि व्यक्तिगत चढेलपणा. सर गेरव्हास हा खूप क्षमता असलेला माणूस होता आणि त्याने फार छान आयुष्य घालवले होते. पण त्याने स्वतःला त्याच्या अहंपणात इतके गुंतवून घेतले नसते, तर तो अजून चांगले आयुष्य जगू शकला असता."

“या बाबतीत त्याच्या मुलीचे मत पण असेच आहे का?”

बरोज परत हसला --- अगदी जांभळा होईपर्यंत हसला. तो म्हणाला, “मिस चेव्हेनिक्स-गोर मुलगी खूप आधुनिक आहे, अशी कल्पना मला केली पाहिजे. त्यामुळे तिच्याबरोबर तिच्या वडिलांची चर्चा करता येणार नाही.”

पायरो बोलला, “पण आधुनिक मुली त्यांच्या वडिलांबरोबर बरीच चर्चा करतात. आधुनिक पद्धतीत तुमच्या पालकांवर टीका करणे बसते.”

बरोजने त्याचे खांदे शहारवले.

मेजर रीडलने विचारले, “म्हणजे अजून काही नव्हते? आर्थिक काळजी वगैरे ? सर गेरव्हास कधी त्याचा बळीचा बकरा बनवला गेल्याबद्दल काही बोलले होते का?”

बरोजने मोठ्या आश्चर्याने विचारले, “बळीचा बकरा? नाही. नाही.”

“तुमचे त्याच्याशी चांगले जमायचे का?”

“हो. का नाही?”

‘मिस्टर बरोज, मी तुम्हाला विचारतो आहे.”

तो तरुण मनुष्य रागावलेला दिसला. “आमचे चांगले पटत असे.”

तुम्हाला हे माहिती आहे का, की सर गेरव्हासने मिस्टर पायरोला इकडे येण्याबद्दल पत्र लिहिले होते?”

“नाही.”

सर गेरव्हास सहसा त्यांची पत्रे स्वतः लिहित असत?”

“नाही. ते नेहमी माझ्याकडून लिहून घेत.”

“पण या बाबतीत त्यांनी तसे केले नाही?”

“नाही.”

“त्यांनी असे का केले असेल, असे तुम्हाला वाटते?”

“मला काही कल्पना नाही.”

“त्यांनी हे पत्र स्वतः का लिहिले, याचे काही कारण तुम्ही सुचवू शकता का?”

“नाही.”

“आहा, मोठे चौकस प्रकरण आहे! तुम्ही सर गेरव्हासना शेवटचे केव्हा भेटलात?”

“जेव्हा मी जेवणापूर्वी कपडे करायला गेलो, तेव्हा मी काही पत्रांवर, त्यांच्या सह्या घेतल्या.”

“तेव्हा ते कसे वाटले?”

“अगदी नेहमीसारखेच. खरे तर ते काही कारणाने स्वतःवर खूष दिसत होते.”

त्याच्या खुर्चीत पायरो थोडासा हलला. तो बोलला, “आहा, म्हणजे तुम्हाला असे वाटले, नाही का? की ते काही कारणाने खूष झाले होते? आणि तरी त्यानंतर जवळजवळ लगेच त्यांनी आत्महत्या केली. हे जरा विचित्र वाटत नाही का?”

गॉडफ्रे बरोजने खांदे शहारवले. आणि तो म्हणाला, “हे मी फक्त माझे मत सांगितले.”

“हो. हो. ते आमच्यासाठी मूल्यवान आहे. शेवटी सर गेरव्हासना जिवंत असताना शेवटचे भेटणाऱ्या काही लोकांपैकी तुम्ही एक आहात.”

“त्याना शेवटचे बघणारा स्नेल होता.”

“बघणारा, पण बोलणारा नव्हे.”

बरोजने काही उत्तर दिले नाही.

मेजर रिडल बोलला, “तुम्ही कपडे बदलायला वर गेलात, तेव्हा किती वाजले होते?”

“साधारण सात वाजून पाच मिनिटे.”

“सर गेरव्हास काय करत होते?

मी त्यांना अभ्यासिकेत सोडले.”

“ नेहमी त्यांना कपडे बदलायला किती वेळ लागत असे?”

“नेहमी ते त्यासाठी पूर्ण पाऊण तास घेत.”

“पण जर जेवण सव्वाआठला असेल, तर त्यांनी तिथे निदान साडेसातला जायला हवे होते, नाही का?”

“हो. बरोबर आहे.”

“तुम्ही स्वतःदेखील कपडे बदलण्यासाठी लवकर गेलात?”

“हो. मी विचार केला मी कपडे बदलून वाचनालयात जाईन व मला हवा असलेला संदर्भ शोधेन.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली. मेजर रिडल बोलला, “मला वाटते, आज एवढे बास झाले. तुम्ही तिला --- काय तिचे नाव --- मिस --- तिला पाठवाल का?”

छोटीशी मिस लिंगार्ड ताबडतोब हजर झाली. तिने खूप चेन्स घातल्या होत्या. ती बसली, तेव्हा त्यातून थोडा किणकिण आवाज आला. ती प्रश्नार्थक नजरेने आळीपाळीने दोघांकडे पाहू लागली.

मेजर रिडलने सुरु केले, “मिस लिंगार्ड, हे सर्व फा --- र उदास करणारे होते.”

मिस लिंगार्ड चांगल्या भावाने म्हणाली, “खरेच खूप वाईट झाले.”

“तुम्ही या घरात केव्हा आलात?”

“साधारण दोन महिन्यांपूर्वी. “सर गेरव्हासनी वस्तुसंग्रहालयातील त्यांच्या मित्राला, कर्नल फॉदरींगे यांना, पत्र लिहून माझी आठवण काढली होती. मी बऱ्यापैकी ऐतिहासिक संशोधनाचे काम केलेले होते.”

“तुम्हाला सर गेरव्हासबरोबर काम करायला जड गेले का?

“ओहो, नाही. अर्थात त्याना हास्यविनोदाने थोडेसे उत्फुल्ल ठेवावे लागत असे. पण तसे सगळ्याच पुरुषांना ठेवावे लागते, असे मला वाटते.”

थोड्या अस्वस्थतेने ती बहुधा मेजर रिडललादेखील तसे करत होती. मेजर रिडल बोलला, “सर गेरव्हासना पुस्तक लिहिण्याच्या कामात मदत करणे, हे तुमचे काम होते, नाही का?

“हो.”

“त्यात काय होते?”

मिनिटभर मिस लिंगार्ड गप्प राहिली. तिचे डोळे उत्तर देतांना चकाकत होते. “तुम्हाला माहिती आहे, खरे तर, हे पुस्तक लिहिण्यासंबंधी होते. मी सगळी माहिती जमवत असे. टिपा लिहित

असे आणि मजकूर नीट लावत असे. त्यानंतर मी सर गेरव्हासनी लिहिलेल्याची उजळणी करत असे.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला खूप युक्तीने हे करावे लागत असेल.”

मिस लिंगार्ड म्हणाली, “युक्तीने आणि ठामपणाने, दोन्ही वापरून.”

“सर गेरव्हास तुमच्या ठामपणाला हरकत घेत नसत?”

“ओहो, अजिबात नाही. बारीकसारीक तपशीलात त्याना शिरायला लागून त्रास होऊ नये, याची मी काळजी घेत असे.”

“ओहो, अस्स.”

मिस लिंगार्ड म्हणाली, ते खरे तर अगदी सोपे होते. सर गेरव्हासना सांभाळणे, जर योग्य पद्धतीने केले, तर खूप सोपे होते.”

“मिस लिंगार्ड, त्याच्या बाबतीत जी दुर्घटना झाली, त्याबाबतीत तुम्ही काही उजेड पाडू शकाल का?”

मिस लिंगार्डने नकारार्थी मान हलवली. “मला वाटते, नाही. नैसर्गिकपणे त्यांचा माझ्यावर विश्वास नव्हता. मी तशी परकी होते. कौटुंबिक त्रासाबद्दल कोणाशीही बोलायला ते तसे अभिमानी होते.”

“तुम्हाला असे वाटते का, की कौटुंबिक त्रासामुळे त्यांनी आत्महत्या केली?”

“मला माहिती होते, की ते खूप मानसिक दुःखात आहेत.”

“ओहो, तुम्हाला हे माहिती होते का?”

“का? अर्थात.”

मिस लिंगार्डला आश्चर्य वाटलेले दिसले. “अर्थात. अजून काही होते का?”

“बाईसाहेब, तुम्ही त्यांच्याशी त्याबद्दल बोलला होतात का?”

“तितक्या स्पष्टपणे नाही.”

“ते काय म्हणाले?”

“मी आठवते. मला असे आढळले, की मला वाटत होते, तशा पद्धतीने ते काही घेत नव्हते.”

“एक मिनिट, हे नेमके कधी घडले?”

“आज दुपारी. आम्ही सहसा तीन ते पाच काम करायचो.”

“चालू ठेवा.”

“मी म्हटल्याप्रमाणे सर गेरव्हास यांचे कामात लक्ष लागत नव्हते --- खरे तर ते असे म्हणाले, की त्यांच्या मनात पुष्कळ दुःखदायक गोष्टी येत आहेत. आणि ते बोलले --- मी बघतो ---

असेच काहीतरी [अर्थात मला नेमके शब्द सांगता येणार नाहीत.] मिस लिंगार्ड, ही भयंकर बाब आहे. जेव्हा कुटुंब त्या भागातील अभिमानी कुटुंब असते, तेव्हा त्यांच्यावर अशी नामुष्कीची वेळ यावी!"

"त्यावर तुम्ही काय म्हणालात?"

"ओहो, काहीतरी त्याना शांत करणारे. मला वाटते, मी म्हणाले प्रत्येक पिढीला त्यांच्या अशा काही मर्यादा असतात --- ते महत्तेला लागलेले गालबोट असते --- पण पुढील भरभराटीने ते क्वचितच लक्षात रहाते."

"तुम्हाला अपेक्षित असलेला थोडा चांगला परिणाम त्यांच्यावर झाला का?

"थोडाफार. आम्ही पुन्हा सर रॉजर चेव्हेनिक्स-गोरवर आलो. समकालीन कागदपत्रांमध्ये मला त्यासंबंधी एक स्वारस्य वाटेल, अशी गोष्ट सापडली होती. पण सर गेरव्हास यांचे लक्ष परत उडाले. शेवटी ते म्हणाले की आज आता अजून काम नको. ते म्हणाले, त्यांना धक्का बसला आहे."

"धक्का?"

"हो. ते असेच बोलले. अर्थात मी काही प्रश्न विचारले नाहीत. मी फक्त बोलले, "सर गेरव्हास, हे ऐकून मला वाईट वाटले." मग

त्यांनी मला स्नेलला सांगायला सांगितले, की मिस्टर पायरो येतील आणि आज जेवणाची वेळ सव्वा आठपर्यंत लांबवावी.''

''ते सहसा कधी असले निरोप तुम्हाला सांगत असत का?''

''खरे तर --- नाही. ती वस्तुस्थिती होती. हे खरे तर मिस्टर बरोज यांचे काम होते. मी फक्त माझे साहित्यविषयक काम करत असे. मी कुठल्याही प्रकारे सचिव नव्हते.''

पायरोने विचारले, ''तुम्हाला असे वाटते का, सर गेरव्हास यांनी मिस्टर बरोज यांच्याऐवजी तुम्हाला हे काम सांगायचे काही विशिष्ट कारण होते?''

मिस लिंगार्डने ऐकून घेतले. ''अं --- त्याना त्यावेळी --- मी त्यावेळी त्याचा विचार केला नाही. मला वाटते, ते फक्त सोयीचे म्हणून त्यांनी केले असावे. तरीही हे खरे आहे की --- आता मला असे वाटते आहे, की त्यांनी मला असे सांगितले, की मिस्टर पायरो येत आहेत, हे कुणाला सांगू नका. ते सर्वांसाठी एक आश्चर्य असेल, असे ते बोलले.''

''आहा, ते असे म्हणाले --- खरेच म्हणाले का? फार रुचीपूर्ण आहे. आणि तुम्ही कुणाला सांगितले का?''

“नक्कीच नाही, मिस्टर पायरो. मी स्नेलला जेवणाचा निरोप सांगितला व गाडीच्या चालकाला सात वाजून पन्नास मिनिटांनी पायरोंना आणण्यासाठी स्टेशनवर हजर रहायला सांगितले.”

सर गेरव्हास यांनी त्या परीस्थितीवर प्रकाश पडेल असे अजून काही सांगितले का?”

मिस लिंगार्ड विचार करू लागली. “नाही. मला असे वाटत नाही --- ते फार बेचैन झाले होते --- मला चांगले आठवते, की मी खोलीबाहेर जाण्याच्या थोडे आधी, ते म्हणाले, “आता ते येत आहेत, त्यामुळे काही विशेष चांगले होऊ शकणार नाही. ‘फार उशीर झाला आहे.’”

“आणि ते काय म्हणाले, त्याचा काय अर्थ होता, याची तुम्हाला काही कल्पना नव्हती?”

“न --- नव्हती.”

अमान्यता दाखवत, पायरो बोलला, “फक्त साध्या नकारार्थी वाक्याच्या गुळमुळीतपणाचा पुसटसा संशय! ‘फार उशीर’ असे तो म्हणाला, नाही का? ‘फार उशीर’”

मेजर रिडल बोलला, “मिस लीगार्ड, कुठल्या परिस्थितीमुळे सर गेरव्हास एवढे खचले, याची तुम्ही आम्हाला नेमकी कल्पना देऊ शकत नाही?”

मिस लीगार्ड सावकाश बोलली, "मला माहिती नव्हते, की हे पर्यायाने मिस्टर ह्युगो ट्रेन्ट यांच्याशी निगडीत असेल."

"मिस्टर ह्युगो ट्रेन्ट? असे तुम्हाला का वाटले?"

"माझी खात्री नाही. पण काल संध्याकाळी आम्ही एक पूर्वज सर ह्युगो डे चेव्हेनिक्सबद्दल बोलत होतो. [मला भीती आहे, की त्याचे चारित्र्य इंग्लंडच्या गादीसाठी राजघराण्यात आपापसात झालेल्या लढाईत फार चांगले नव्हते.] आणि सर गेरव्हास असे म्हणाले, "माझ्या बहिणीने तिचा मुलगा ह्युगोसाठी हे नाव निवडले! ते आमच्या कुटुंबासाठी नेहमीच असमाधानकारक नाव होते. तिला कदाचित माहिती असेल, की हे नाव ह्युगोसाठी चांगले ठरणार नाही.'"

पायरो म्हणाला, "तुम्ही आम्हाला जे सांगत आहात, सूचक असून आम्हाला नवी कल्पना सुचवते आहे."

मेजर रिडलने विचारले, "सर गेरव्हास यापेक्षा नेमके, असे काही बोलले नाहीत का?"

मिस लिंगार्डने मान हलवली. "नाही. आणि अर्थात यात मी काही बोलावे, असे नाही. सर गेरव्हास फक्त स्वतःशीच बोलत होते. ते खरे तर माझ्याशी बोलत नव्हते."

"असेल."

पायरो म्हणाला, “बाईसाहेब, तुम्ही परक्या असलात, तरी इथे दोन महिने आहात. मला वाटते, तुम्ही या कुटुंबांबद्दलची तुमची मते मोकळेपणे सांगितलीत, तर ते फार अमूल्य ठरेल.”

मिस लिंगार्डने तिचा नाकावर क्लिप असलेला चष्मा काढत विचार केला.

“ठीक आहे. प्रथम अगदी मोकळेपणे मला वाटते, की मी एका वेड्यांच्या घरात वावरते आहे! चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब सतत इथे नसणाऱ्या वस्तू बघत असतात. आणि सर गेरव्हास एखाद्या राजासारखे फिरत असतात. आणि पूर्ण असामान्य नाटकीपणे वागत असतात. मला भेटलेल्या माणसांमध्ये हे सर्वात विचित्र लोक आहेत. अर्थात मिस चेव्हेनिक्स-गोर अगदी सर्वसामान्य आहे. लवकरच मला समजले, की मिसेस चेव्हेनिक्स-गोर खरेच खूप दयाळू व चांगली बाई आहे. तिच्यापेक्षा अधिक दयाळू व चांगले माझ्याशी कुणी वागलेले नाही. सर गेरव्हास --- तसे पाहिले तर मला वाटते, ते मूर्ख आहेत. त्यंचा अहंमन्यपणा --- की अजून काही, दिवसेंदिवस वाईट होत चालला होता.”

“आणि इतर लोक?”

मिस्टर बरोंजना सर गेरव्हास यांच्याशी जमवून घेणे अवघड जात असे. आमच्या पुस्तकावरील कामामुळे त्याना थोडी सुटका

झाल्यासारखे वाटत असावे, असा माझा अंदाज होता. कर्नल बरी नेहमीच प्रसन्न असत. ते चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेबांशी एकनिष्ठ होते. तर सर गेरव्हास यांना उत्तम प्रकारे सांभाळू शकत असत. मिस्टर ट्रेन्ट, मिस्टर फोर्ब्स आणि मिस कार्डवेल हे तिघे इथे फक्त काही दिवस होते. त्यामुळे मला त्यांच्याबद्दल फारसे माहिती नाही.''

''बाईसाहेब, मी आपला आभारी आहे. आणि दलाल कॅप्टन लेकबद्दल काय?''

''ओहो, तो फार चांगला आहे. सगळ्यांना तो आवडतो.''

''सर गेरव्हासना सुद्धा?''

''हो. मी त्याला असे बोलतांना ऐकले आहे की लेक त्यांच्यासाठी सर्वात चांगला दलाल आहे. अर्थात कॅप्टन लेक यांनापण सर गेरव्हास यांच्याबरोबर जमवून घेणे कठीण जात असे. पण तरी एकंदरीत पाहता, ते त्यांच्याशी बऱ्यापैकी जमवून घेत. ते सोपे नव्हते.''

पायरोने विचारपूर्वक डोके हलवले. तो पुटपुटला, ''माझ्या मनात --- तुम्हाला काही --- विचारायचे होते --- काही छोटी गोष्ट --- ती काय होती बरं?

मिस लिंगार्डने तिचा शांत चेहरा त्याच्याकडे वळवला.

पायरोने थोडे चिडून, डोके हलवले. “अरेर, ते माझ्या अगदी जिभेवर आहे, पण या क्षणी आठवत नाही”

मेजर रिडल एकदोन मिनिटे थांबला. नंतर पायरोने गोंधळून भुवई चढवायला सुरवात केली, तेव्हा त्याने पुन्हा प्रश्नार्थक चेहरा केला.

“तुम्ही सर गेरव्हासना शेवटचे केव्हा पाहिले?”

“या खोलीत, चहाच्या वेळी.”

“तेव्हा ते कसे वाटले? नेहमीप्रमाणेच?”

“अगदी नेहमीसारखेच.”

“त्यावेळी तिथे काही ताण होता का?”

“नाही. मला वाटते, सगळेजण नेहमीसारखेच वाटत होते.

”सर गेरव्हास चहानंतर कुठे गेले?”

“त्यांनी नेहमीसारखे मिस्टर बरोज यांना अभ्यासिकेत नेले.”

“तेव्हा तुम्ही त्यांना शेवटचे पाहिले?”

“हो. मी जिथे काम करत असे, त्या लहानशा सकाळच्या खोलीत गेले आणि सात वाजेपर्यंत, सर गेरव्हास यांच्या टिपांवरून चर्चा केलेल्या पुस्तकाचे एक प्रकरण टंकलिखित करू लागले. नंतर मी विश्रांतीसाठी व जेवणापूर्वी कपडे बदलण्यासाठी वर गेले.”

“मला वाटते, तुम्ही गोळीचा आवाज प्रत्यक्ष ऐकला?”

“हो. मी या खोलीत होते. मला पिस्तुलातून सुटलेल्या गोळीसारखे काही ऐकू आले. मी हॉलमध्ये गेले. तिथे मिस्टर ट्रेन्ट व मिस कार्डवेल होते. मिस्टर ट्रेन्ट यांनी स्नेलला विचारले, की जेवणासाठी शॅंपेन आहे का आणि त्याचा विनोद केला. तो गंभीरपणे घ्यायचे, आम्हाला समजले नाही. मी घाबरले. मला वाटले तो मोटारीच्या स्फोटाचा आवाज आहे.”

पायरो म्हणाला, “तुम्ही मिस्टर ट्रेन्टला असे बोलतांना ऐकले का की ‘अशावेळी नेहमी खून होतो.’?”

“मला वाटते, तो अर्थात असे काहीतरी विनोदी बोलला.”

“नंतर काय झाले?”

“आम्ही सगळे इथे आलो.”

“तुम्ही जेवणासाठी एकेकजण कुठल्या क्रमाने आलात, ते तुम्हाला आठवते का?”

“मिस चेव्हेनिक्स-गोर पहिली आली. मला वाटते, नंतर मिस्टर फोर्ब्स आले. मग कर्नल बरोज आणि मिसेस चेव्हेनिक्स-गोर त्यानंतर लगेच आले. मला वाटते, असा क्रम होता. पण माझी खात्री नाही. कारण ते सर्वजण साधारण एकाच वेळी आले.”

“पहिली घंटी ऐकून आले का?”

“हो. सगळेजण ती ऐकल्यावर घाई करत असत. सर गेरव्हास संध्याकाळच्या जेवणाची वेळ पाळण्याबाबत, फार आग्रही असत.”

“ते स्वतः नेहमी कधी खाली येत असत?”

“ते नेहमी पहिली घंटी होण्यापूर्वीच खोलीत येत असत.”

“त्यावेळी ते तिथे नसलेले पाहून, तुम्हाला आश्चर्य वाटले का?”

“फारच.”

पायरो ओरडला, “मला सापडले.”

बाकीचे दोघे त्याच्याकडे चौकसपणे पाहू लागल्यावर तो म्हणाला, “मला काय विचारायचे होते, ते मला आठवले. बाईसाहेब, स्नेलने अभ्यासिका उघडत नसल्याचे सांगितल्यावर आपण आज संध्याकाळी जेव्हा तिथे गेलो, तेव्हा तुम्ही वाकून काहीतरी उचलले.”

“मी उचलले?” मिस लिंगार्डला फार नवल वाटलेले दिसले.

“हो. आपण सगळे अभ्यासिकेकडे जाणाऱ्या सरळ पॅसेजला लागलो, तेव्हा काही छोटेसे चकचकीत”

“किती चमत्कारिक --- मला आठवत नाही. एक मिनिट थांबा. हो. मी उचलून घेतले. पण मी विचार करत नव्हते. मी आठवते --- ते इथे असले पाहिजे.”

तिने तिची काळी सॅटीनची बॅग उघडली. तिने त्यातील सर्व वस्तु टेबलावर ओतल्या.

पायरो आणि मेजर रिडलने रस घेऊन, सर्व ढीग तपासला. त्यात दोन रुमाल होते. एक पावडरचा छोटा डबा, किल्ल्यांचा छोटा गठ्ठा आणि चष्म्याचे आवरण होते. अजून एका वस्तूवर पायरोने उत्सुकतेने झडप घातली.

मेजर रिडल बोलला, “अरेच्या, ही तर पिस्तुलातील गोळी आहे!”

त्या वस्तूचा आकार खरोखर गोळीसारखा होता. पण ती एक लहानशी पेन्सिल होती.

मिस लिंगार्ड म्हणाली, “हीच मी उचलली. मी त्याबद्दल विसरून गेले.”

“मिस लिंगार्ड, ही कुणाची आहे, हे तुम्हाला माहिती आहे का?

“हो. ती कर्नल बरींची आहे. त्यांनी पिस्तुलातील गोळीपासून बनवली आहे आणि ती त्याना दक्षिण आफ्रिकेतील लढाईत

लागली --- किंवा खरे तर लागली नाही. मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला समजले असेल.”

“ती त्यांच्याकडे केव्हापर्यंत होती?”

“या दुपारपर्यंत ते ब्रिज खेळत होते, तोपर्यंत होती. मी चहाला आले, तेव्हा त्याना त्याने ब्रिजमधील गुण लिहितांना पाहिले होते.”

“ब्रिज कोणकोण खेळत होते?”

कर्नल बरी, चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब, मिस्टर ट्रेन्ट आणि मिस कार्डवेल.”

पायरो शांतपणे बोलला, “मला वाटते, आपण ही आपल्याजवळ ठेऊ आणि कर्नलला आपण परत करू.”

‘ओहो, ठीक आहे. मी इतकी विसराळू आहे. मला हे कदाचित आठवले नसते.”

“बाईसाहेब, कदाचित तुम्ही कर्नल बरीला आता इथे यायला सांगितलेत, ते चांगले केलेत, नाही का?”

“मी जाऊन त्यांना ताबडतोब घेऊन येते.”

ती घाईने गेली. पायरो उठला आणि खोलीत दिशाहीनपणे फिरू लागला.

तो म्हणाला, ‘आपण दुपारपासून कायकाय झाले हे बघायला सुरवात करू. त्यात मला स्वारस्य आहे. अडीच वाजता, सर गेरव्हास कॅप्टन लेक बरोबर हिशेब तपासत होते. ते जरा कामाच्या भाराखाली आहेत. तीन वाजता ते मिस लिंगार्डबरोबर पुस्तकासंबंधी चर्चा करतात. ते मनाने फार दुःखी असतात. मिस लिंगार्ड त्याचा संबंध जोरदारपणे काही शेरा मारून, ह्युगो ट्रेन्टशी असल्याचे दर्शवते. चहाच्या वेळी त्याचे वर्तन नेहमीसारखेच असते. चहानंतर गॉडफ्रे बरोज आम्हाला ते कशामुळे तरी चांगल्या मनस्थितीत असल्याचे सांगतो. आठला पाच मिनिटे असतांना, सर गेरव्हास खाली येतो. अभ्यासिकेत जातो. एका कागदावर ‘माफ करा’ असे लिहितो आणि स्वतःवर पिस्तुल चालवतो.”

रिडल हळूहळू म्हणाला, “तुम्हाला काय म्हणायचे आहे, ते मला समजले. यात काही सुसूत्रता वाटत नाही.”

“सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर यांच्या मनस्थितीतील विचित्र बदल! ते फार कामात आहेत --- ते गंभीरपणे उदास आहेत --- पण नेहमीसारखे वागत आहेत --- ते फार उच्च आत्मिक पातळीवर आहेत! इथे काहीतरी अती चमत्कारिक असे आहे! आणि मग तो ते शब्द वापरतो. ‘फार उशीर’ म्हणजे मी इथे येण्यास फार उशीर

केला. ठीक आहे. ते खरे आहे. मी त्याला जिवंत बघायला यायला, खरेच फार उशीर केला.”

“तुम्ही असा विचार केला तर --- ?“

“आता मला कधीच समजणार नाही, हे नक्की आहे, की सर गेरव्हासने मला कशासाठी बोलावले होते?”

पायरो अजूनही खोलीत फिरत होता. त्याने शेकोटीच्या कट्ट्यावरील एकदोन वस्तु सरळ केल्या. एका भिंतीजवळील पत्त्यांचे टेबल त्याने तपासले. भिंतीजवळ उभा राहिला. टेबलाचा खण उघडला व ब्रिजचे पत्ते बाहेर काढले. मग तो लिहायच्या टेबलाभोवती फिरला. केराच्या टोपलीत डोकावला. त्यात काही नव्हते. फक्त एक कागदी पिशवी होती. पायरोने ती बाहेर काढली. त्याचा वास घेतला. पुटपुटला, “संत्री.” ती चपटी करून त्यावरील नाव वाचले. ‘कार्पेंटर आणि सन्स, फळविक्रेता, हॅमबोरोग, सेंट मेरी’ तो त्याची नीट चौकोनी घडी घालत होता. तेव्हा कर्नल बरीने खोलीत प्रवेश केला.

## नऊ

कर्नल खुर्चीत बसला. डोके हलवले आणि सुस्कारा टाकत बोलला, “हे भयंकर प्रकरण आहे. रिडल, मिसेस चेव्हेनिक्स-गोर फार नवलपूर्ण आहे --- फारच नवलपूर्ण आहे. थोर बाई! फार धीट!”

त्याच्या खुर्चीशी हळूच येत, पायरो म्हणाला, “मला वाटते, तुम्ही तिला खूप वर्षे ओळखता.”

“हो, खरेच. मी तिच्याबरोबर नाच करत असे. तिच्या केसात गुलाब माळत असे. मला आठवते, तिचा पांढरा गुबगुबीत ड्रेस --- तिला स्पर्श करायला --- खोलीत कोणी नव्हते.

त्याचा आवाज जोरदार होता. पायरोने पेन्सिल त्याच्यापुढे केली. “मला वाटते, ही तुमची आहे.”

“ऑ? काय? ओहो, आभारी आहे. आम्ही दुपारी ब्रिज खेळत होतो, तेव्हा ती माझ्याकडे होती. पण नवल म्हणजे मला तीन वेळा इस्पिकचा छान डाव लागला. असे पूर्वी कधी झाले नव्हते.”

पायरो बोलला, “मला वाटते, तुम्ही चहापूर्वी ब्रिज खेळत होतात. सर गेरव्हास तिथे चहाला आले, तेव्हा त्यांची मनस्थिती कशी होती?”

“नेहमीसारखी --- अगदी नेहमीसारखी होती. ते लगेचच त्यांचे जीवन संपवणार आहेत असे मुळीच वाटत नव्हते. पण आता मी म्हणू शकतो, की कदाचित ते नेहमीपेक्षा थोडे उत्तेजित होते.”

“तुम्ही त्यांना शेवटचे कधी पाहिले?”

“का? तेव्हाच चहाच्या वेळी. त्यानंतर त्या गरीब बिचाऱ्यांना मी जिवंत पाहिले नाही.”

“तुम्ही चहानंतर अभ्यासिकेत गेला नाहीत?”

“नाही. त्यानंतर मी त्याना कधीच पाहिले नाही.”

“तुम्ही जेवणासाठी कधी खाली उतरलात?”

“पहिली घंटी झाल्यावर.”

“तुम्ही आणि चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब एकदमच खाली उतरलात का?”

“नाही. आम्ही फुले बघण्यासाठी, की कशासाठी तरी हॉलमध्ये भेटलो.”

मेजर रिडल म्हणाले, “कर्नल बरी, तुम्ही रागावणार नाही, असे समजून मी तुम्हाला एक खासगी प्रश्न विचारतो. पॅरॅगॉन सिंथेटिक रबर कंपनीच्या प्रश्नावरून, तुमच्यात काही वितुष्ट आले होते का?”

कर्नल बरींचा चेहरा एकदम जांभळा झाला. त्यांनी घसा खाखरला. “नाही. मुळीच नाही. वयस्क गेरव्हास हे अतार्किक स्वरूपाचा माणूस होते. तुम्हाला हे ध्यानात ठेवावे लागे. त्याना नेहमी असे वाटे, की ते ज्याला हात लावतील, ते विजयी झाले पाहिजे! सर्व जग एक प्रकारच्या विनाशक घडामोडींमधून जात आहे, हे त्याना समजत नसे. त्यामुळे सारे शेअर्स आणि गुंतवणुकींना धक्का बसणार होता.”

“म्हणजे तुमच्यामध्ये काही तणाव होता?”

“काही त्रास नव्हता. तो गेरव्हासचा अतार्किकपणा होता!”

“त्याला झालेल्या काही नुकसानीचे खापर त्याने तुमच्यावर फोडले होते?”

“गेरव्हास हा साधा, सामान्य माणूस नव्हता. व्हेंडालाही ते माहिती होते. पण ती त्याला व्यवस्थित वागायला लावू शके. मी ते सर्व तिच्यावर सोडून देई.”

पायरो खोकला आणि त्याच्याकडे बघून मेजर रिडलने विषय बदलला. “कर्नल बरी, मला माहिती आहे तुम्ही कुटुंबाचे जुने मित्र आहात. सर गेरव्हासने त्याच्या पैशांसंबंधी काय निर्णय घेतला आहे. ते तुम्हाला माहिती आहे का?”

“अं --- मला वाटते, त्यातील बराचसा भाग रुथकडे जाईल. असे गेरव्हासने म्हटल्याचे मला वाटते.”

“हे ह्युगो ट्रेन्टसाठी अन्यायकारक असल्याचे तुम्हाला वाटते का?”

“गेरव्हासला ह्युगो आवडत नसे. त्यांचे एकमेकांशी कधीच लागते नव्हते.”

“पण कुटुंबाचे पाश फार घट्ट होते. मिस चेव्हेनिक्स-गोर शेवटी त्याची दत्तक मुलगी होती.”

कर्नल बरी आढेवेढे घेऊ लागला. पण क्षणभराने म्हणाला, “हे बघा, मला वाटते अगदी गुप्त असे काही, तुम्हाला सांगून टाकलेले बरे!”

“अर्थात --- अर्थात.”

“रुथ दत्तक मुलगी आहे. पण ती चेव्हेनिक्स-गोर आहे. सर गेरव्हास यांच्या भावाची, लढाईत मारला गेलेल्या अँथनीची ती मुलगी आहे. त्याच्या टंकलेखिकेशी त्याची भानगड होती. तो लढाईत मारला गेला, तेव्हा तिने व्हेन्डाला लिहिले. व्हेन्डा तिला भेटायला गेली --- तिला मूल होणार होते. व्हेन्डाने तिला गेरव्हासकडे नेले. एक मृत बालक जन्मल्यावर आता व्हेन्डाला मूल होणार नाही, असे डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले होते. त्यामुळे ते

मूल जन्मल्यावर त्यांनी ते कायदेशीरपणे दत्तक घेतले. त्या मुलाच्या आईने सर्व हक्क सोडले. त्यांनी रुथला स्वतःच्या मुलीसारखे वाढवले. त्यामुळे तिच्याकडे बघूनच तुम्हाला कळेल, की ती चेव्हेनिक्स-गोर आहे.”

पायरो बोलला, “आहा, असे आहे का? त्यामुळे सर गेरव्हासचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. पण जर त्यांना ह्युगो आवडत नव्हता, तर तो त्याचे लग्न रुथशी लावून देण्यात एवढा रस का दाखवत होता?”

“कुटुंबाची स्थिती पुन्हा पहिल्यासारखी होण्यासाठी. ती सुदृढतेची भावना त्याला खूष करणारी होती.”

“जरी त्याला तो तरुण आवडत नव्हता किंवा त्याच्यावर त्याचा विश्वासही नव्हता तरी?”

कर्नल बरीने विरोध दर्शवत, नाकातून जोराने आवाज काढला. “तुम्हाला वयस्क गेरव्हास काही कळत नाही. तो लोकांना माणूस जातीचे समजत नसे. तो लग्ने जुळवताना फक्त दोन्ही बाजूंच्या सामाजिक दर्जाचा विचार करत असे. रुथ आणि ह्युगोचे लग्न त्याला त्या दृष्टीने योग्य वाटत होते. कारण ह्युगोने चेव्हेनिक्स-गोर हे आडनाव धारण केले होते. ह्युगो आणि रुथ यांना

एकमेकांबद्दल काय वाटत होते, ती गोष्ट त्याच्या दृष्टीने खिजगणतीत नव्हती.”

“पण रुथला हे लग्न मान्य होते का?”

कर्नल बरी गालातल्या गालात हसला. “मान्य नसेल तरी, शेवटी ती दत्तक आहे!”

“तुम्हाला हे माहिती आहे का, की सर गेरव्हासच्या मरणापूर्वी काही काळ आधी सर गेरव्हास एक नवीन इच्छापत्र बनवत होता. त्यात लिहिल्याप्रमाणे मिस चेव्हेनिक्स-गोरने मिस्टर ह्युगोशी लग्न केले तरच तिला वारसाहक्काने वडिलांची संपत्ती मिळणार होती?”

कर्नल बरीने शिट्टी वाजवली. “म्हणजे त्याने खरेच तिचे आणि बरोजचे प्रकरण संपुष्टात आणले --- “

तो असे बोलल्याबरोबर, त्याने शब्द मागे घेतले. पण तोपर्यंत उशीर झाला होता. पायरोने ते ऐकले होते.

“मिस चेव्हेनिक्स-गोर व तरुण मिस्टर बरोज यांच्यात काही होते का?”

“बहुधा काही नव्हते --- काहीच नव्हते.”

मेजर रिडल खोकत म्हणाला, “कर्नल बरी, मला वाटते, तुम्ही तुम्हाला माहिती असलेले सर्व काही सांगावे. त्यामुळे सर गेरव्हासच्या मनस्थितीवर उजेड पडेल.

कर्नल बरी संशयाने म्हणाले, “कदाचित पडेल. पण मला संशय आहे. यातला खरा भाग असा आहे, की तरुण बरो दिसायला काही वाईट नाही --- निदान बायकांना तरी असे वाटते. रुथ आणि तो यांचे अलीकडे चांगलेच मेतकूट जमलेले दिसते. पण गेरव्हासला हे मान्य नव्हते. त्याला ते मुळीच पसंत नव्हते. पण तो बरोला नोकरीवरून फक्त अचानक काही अघटीत व्हायला नको म्हणून, काढून टाकत नव्हता. रुथची पसंती काय आहे, हे त्याला माहिती होते. तिला सांगून ऐकणाऱ्यातील ती नव्हती. त्यामुळे त्याला वेगळे इच्छापत्र बनवायचे असावे. पण रुथ ही मुलगी प्रेमासाठी सर्व काही सोडणारी नव्हती. ती ऐहिक सुखाला आणि पैशाला चटावलेली होती.”

“तुम्ही मिस्टर बरोजना पसंत केले असते का?”

कर्नलने असे म्हटले की गॉडफ्रे बरोज थोडा अविश्वासार्ह आणि धोकादायक आहे. यामुळे पायरो पूर्णपणे गोंधळून गेला. पण मेजर रिडल मिशांमध्ये हसू लागला.

अजून काही प्रश्न विचारले गेले. उत्तरे दिली गेली आणि मग कर्नल बरी निघून गेला.

विचारात हरवलेल्या पायरोकडे रिडलने नजर टाकली. “मिस्टर पायरो, या सर्व माहितीवरून, तुम्ही काय निष्कर्ष काढाल?”

पायरोने त्याचे हात हवेत उडवले. “असे वाटते आहे की यात विशिष्ट आविष्काराची काही आकृती आहे.”

रिडल बोलला, “हे अवघड आहे.”

“हो. अवघड आहे. पण एकच एक शब्दसमूह हळूहळू सांगितला जातो आहे. तो मला सूचक वाटतो आहे.”

“तो काय आहे?”

“ह्युगोने हसत उच्चारलेले ते वाक्य --- ‘तिथे नेहमी खून असतो’ --- “

रीडल टोकदारपणे बोलला, “हो. तुम्ही त्या बाजूला झुकत असल्याचे मला जाणवत होते.”

“माझ्या मित्रा, तू सहमत नाहीस का? आपण जितकी अधिकाधिक माहिती काढतो, तितका आत्महत्येचा हेतू आपल्यापासून दूर दूर जातो, नाही का? पण खुनासाठीच्या हेतूसाठीची नवलपूर्ण माहिती आपल्याला मिळते आहे.”

“तरीही आपल्याला घडलेल्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात --- दार कुलुपबंद, किल्ली मृत माणसाच्या खिशात. ओहो, मला

माहिती आहे तिथे नेहमी अनेक मार्ग आणि साधने असतात. वाकवलेल्या पिना, दोरे --- अनेक प्रकारच्या युक्त्या! मला वाटते, हे शक्य आहे --- पण या गोष्टी खरोखर बेत घडवून आणतात का? याची मला जरा शंका आहे.''

''सगळ्या घटनांमध्ये आपण आत्महत्येच्या नव्हे, तर खुनाच्या दृष्टीने तपासणी करू.''

''ठीक आहे. त्यावेळची परिस्थिती पाहता, तो बहुधा खून असावा.''

पायरो क्षणभर हसला. ''मला हा शेरा फारसा आवडला नाही.'' नंतर तो गप्प झाला.

''हो. आपण या केसचा खुनाच्या दृष्टीने विचार करू. गोळीचा आवाज ऐकू येतो. मिस लिंगार्ड, मिस कार्डवेल, ह्युगो ट्रेन्ट आणि स्नेल, हे चौघे हॉलमध्ये आहेत. इतर सर्वजण कुठे आहेत?''

''त्याच्या सांगण्याप्रमाणे, बरोज वाचनालयात होता. पण याची खात्री पटवायला कोणी नाही. बाकी सगळे आपापल्या खोलीत आहेत, असे आपण धरु. पण ते खरेच तिथे होते का, हे कोणाला माहीत? प्रत्येकजण स्वतंत्रपणे खाली आलेला दिसतो. मिस्टर बरी आणि मिसेस चेव्हेनिक्स-गोरसुद्धा खाली आल्यावरच हॉलमध्ये भेटले आहेत. मिसेस चेव्हेनिक्स-गोर जेवायच्या

खोलीतून आली आणि बरी कुठून आला? असे शक्य आहे का, की तो वरून नव्हे, तर अभ्यासिकेतून आला? तिथे पेन्सिलही आहे.”

“हो. पेन्सिल रुचीपूर्ण आहे. मी ती त्याला दिली, तेव्हा त्याने काही भावना दर्शवल्या नाहीत. पण ते तसे असेल कारण त्याला हे माहिती नाही, की मला ती कुठे मिळाली. ती त्याच्या हातून कुठे पडली, याची त्याला काही कल्पना नव्हती. आता आपण पेन्सिल वापरली जात असतांना, ब्रिज कोणकोण खेळत होते, ते बघू. ह्युगो ट्रेन्ट आणि मिस कार्डवेल. पण ते त्या भानगडीत होते, असे वाटत नाही. मिस लिंगार्ड आणि स्वयंपाकी यांनी दिलेले स्पष्टीकरण खरे असावे. चौथी होती मिसेस चेव्हेनिक्स-गोर.”

“तुम्ही तिच्यावर गंभीरपणे संशय घेऊ शकत नाही.”

“माझ्या मित्रा, का नाही? मी तुला सांगतो, मी सगळयांचा संशय घेऊ शकतो! आपण असे धरून चालू, की हा संशय तिच्या नवऱ्याबद्दल असलेल्या तिच्या वरवरच्या एकनिष्ठतेसाठी व ती खरे प्रेम करत असलेल्या विश्वासू बरीसाठी, असू शकेल?”

रिडल म्हणाला, “हं, एक प्रकारे हा प्रेमाचा त्रिकोण दिसतो आहे. खूप वर्षे एकत्र रहाणाऱ्या या त्रिकोणातील एकाने कशावरून खून केला नसेल?”

“आणि त्या कंपनीवरून सर गेरव्हास आणि कर्नल बरीचे वाजले होते.”

“असे असू शकेल, की कदाचित सर गेरव्हास खरेच वाईटपणा घ्यायला तयार झाले असतील. त्यातले बारकावे आपल्याला माहिती नाहीत. त्यातले तुम्हाला जे काही पाणी मुरत असलेले वाटतात, ते बरोबर असू शकतील. असे समजा की सर गेरव्हासला असे वाटले, की बरी मुद्दामून, त्याच्या दोषांवर पांघरून घालतो आहे. पण तो हे जाहीर करत नाही, कारण त्याची बायको कदाचित त्याच्यात गुंतलेली आहे. हो. हे शक्य आहे. यामुळे त्यांच्यापैकी दोघांनाही खून करण्याचा हेतू मिळू शकतो आणि हे खरेच थोडे विचित्र आहे, की मिसेस चेव्हेनिक्स-गोरने तिच्या नवऱ्याचे मरण एवढे शांतपणे घ्यावे. हे सर्व वागणे हे नाटक दिसते आहे.”

पायरो म्हणाला, “त्यात अजूनही एक गोम आहे. मिस चेव्हेनिक्स-गोर आणि बरोज. सर गेरव्हासने नवीन इच्छापत्रावर सही न करणे, हे त्यांच्या दृष्टीने बरे आहे. असे झाल्यास तिला सर्व काही एका अटीवरच मिळते, की तिच्या नवऱ्याने कुटुंबाचे नाव लावावे --- “

“हो. सर गेरव्हासच्या दृष्टीकोनाप्रमाणे, आजच्या संध्याकाळी बरोजचे खाते थोडेसे निसरडे आहे. चांगली मनस्थिती कशाबद्दल

तरी खूष असल्याचे दाखवते. आपल्याला सांगितले गेले आहे, त्यात ते बसत नाही.”

‘त्यात मिस्टर फोर्ब्सदेखील आहे. जुन्या नावाजलेल्या कंपनीचे सर्वात बरोबर, सर्वात कडक असे धोरण! पण प्रसिद्ध वकीलही, ते अडचणीत आल्यावर, त्यांच्या पक्षकाराने मोठ्या विश्वासाने त्यांच्या कंपनीत गुंतवलेल्या पैशांची चोरी करू शकतात.”

“पायरो, तू थोडया योग्य प्रकारे चालला आहेस, असे वाटते आहे.”

“तुला असे वाटते आहे का, की मी जे सुचवतो आहे ते अगदी सिनेमातल्यासारखे आहे? पण मेजर रिडल, आयुष्य हे आश्चर्यकारक रीत्या सिनेमासारखेच असते.”

मुख्य कॉन्स्टेबल म्हणाला, “अजून तरी वेस्टशायरमध्ये ते तसे आहे. आता आपण उरलेल्या लोकांच्या मुलाखती घेणे थांबवू या, असे तुम्हाला वाटत नाही का? उशीर होतो आहे. आपण अजून रुथ चेव्हेनिक्स-गोरला भेटलो नाही. आणि या सर्वांमध्ये ती सर्वात महत्वाची आहे.”

“कबूल आहे. मिस कार्डवेलही आहे. कदाचित आपण आधी तिला भेटू. कारण त्याला फार वेळ लागणार नाही. आणि मिस चेव्हेनिक्स-गोरला शेवटी भेटू.”

“चांगली कल्पना आहे.

## दहा

पायरोने सुसान कार्डवेलवर फक्त एक ओझरता कटाक्ष टाकला होता. आता त्याने जास्त लक्ष देऊन तिची तपासणी केली. त्याने विचार केला, बुद्धिमान चेहरा, फार सुंदर नाही पण एखाद्या फक्त सुंदर मुलीला हेवा वाटेल इतका आकर्षक! तिचे केस मोठे होते. छान मेकप केलेला होता. तिचे डोळे जागरुक असल्याचे त्याला जाणवले.

काही प्राथमिक प्रश्नांनंतर मेजर रिडल म्हणाला, “मिस कार्डवेल, तुम्ही या कुटुंबाच्या किती जवळच्या मैत्रीण आहात?”

“मला ते कोणीच माहिती नाहीत. ह्युगो म्हणाला की मी इथे यावे.”

“म्हणजे तुम्ही ह्युगोची मैत्रीण आहात?”

“हो, तसे आहे.” हे बोलतांना सुसान हसली.

“तुम्ही त्याला खूप काळ ओळखता का?”

“ओहो, नाही. फक्त एक महिना.” ती थोडे थांबून म्हणाली, “माझे त्याच्याशी लग्न ठरले आहे.”

“आणि त्याने तुम्हाला इथे या लोकांच्या ओळखी करून देण्यासाठी बोलावले?”

“नाही. तसे काही नाही. आम्ही हे गुप्तपणे ठरवले. मी सहज घर बघायला म्हणून आले. ह्युगो म्हणाला, की हे जसे काही वेड्यांचे घर आहे. मी ठरवले, की स्वतःच जाऊन बघावे. बिचारा ह्युगो अगदी पाळीव प्राण्यासारखा आहे. त्याला जराही डोके नाही. त्यामुळे परिस्थिती जरा तंग आहे. माझ्याकडे व ह्युगोकडेही पैसा नाही. आणि त्याला ज्यांची आशा होती, ते वयस्क सर गेरव्हास यांचा त्याच्यावर जीव असल्याने, ते त्याचे लग्न रुथशी ठरवायच्या विचारात होते. ह्युगो थोडा अशक्त आहे. तो कदाचित या लग्नाला मान्यता देईल. आणि पुढेमागे त्यातून बाहेर पडायचा प्रयत्न करेल.”

पायरोने विचारले, “तुम्ही या कल्पनेला हरकत घेतली नाही?”

“नक्कीच नाही. रुथ कदाचित त्याला घटस्फोट घेऊ देणार नाही. पण अजून तर बाजारात तुरी अन् --- ”

“म्हणजे तुम्ही प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे, हे बघायला आलात?”

“हो.”

“अरे मित्रा, अर्थात ह्युगोचे बरोबर होते. सर्व कुटुंब मानसिक दृष्ट्या वेडे होते! पण रुथ शहाणी वाटत होती. तिने तिचा मित्र

निवडला होता आणि तिला वडिलांनी ठरवलेल्या लग्नात काही रस नव्हता.''

''तू मिस्टर बरोजबद्दल म्हणतो आहेस का?''

''बरोज? अर्थात नाही. असल्या बोगस माणसाच्या प्रेमात रुथ पडणार नाही.''

''मग तिचा प्रियकर कोण होता?''

सुसान कार्डवेल थांबली, सिगरेट बाहेर काढून पेटवली आणि मग बोलली, ''तुम्ही तिलाच विचारा. हे माझे काम नाही.''

मेजर रिडलने विचारले, ''तुम्ही सर गेरव्हासना शेवटचे केव्हा भेटलात?

''चहाच्या वेळी.''

''त्याचे एकंदर वागणे तुम्हाला काही वेगळे वाटले का?''

त्या मुलीने खांदे शहारवले.

''नाही. नेहमीसारखेच वाटले.''

''तुम्ही चहानंतर काय केले?''

''मी ह्युगोबरोबर बिलीयर्ड खेळले.''

''त्यानंतर तुम्ही गेरव्हासना भेटला नाहीत?'

''नाही.''

“पिस्तुलाच्या गोळीच्या आवाजाचे काय?”

“ते जरासे विचित्रच होते. असे बघा, पहिली घंटी झाली होती. म्हणून मी माझा ड्रेस सांभाळत, माझ्या खोलीतून सुसाट निघाले. तेवढ्यात दुसरी घंटी ऐकल्याने, मी भरभर जिना उतरत होते. मी पहिल्याच रात्री, इथे असतांना, मला एक मिनिट उशीर झाला. ह्युगो मला म्हणाला, आता या वयस्क माणसाबरोबर आपली काही खैर नाही. म्हणून मी घाईघाईने येत होते. ह्युगो माझ्या थोडासा पुढे होता. आणि तेवढ्यात विचित्र असा मोठ्ठा आवाज झाला. ह्युगो म्हणाला, हा शँपेनची बाटली उघडल्याचा आवाज आहे. पण स्नेल त्याला ‘नाही’ म्हणाला. आणि तसेही मला वाटले, की तो जेवायच्या खोलीतून आला नव्हता. मिस लिंगार्डला वाटले, तो वरच्या मजल्यावरून आला. पण तसेही आम्ही मान्य केले, की तो स्फोट झाल्यासारखा आवाज होता. आणि सगळे हॉलमध्ये जमल्यावर, ते विसरून गेलो.”

पायरोने विचारले, “म्हणजे क्षणभर तुम्हाला कळलेच नाही, की सर गेरव्हासनी स्वतःवर गोळी झाडून घेतली असावी?”

“मी तुम्हाला विचारते, मला असे वाटणे शक्य होते का? वयस्क माणूस अहंपणात मश्गुल राहून, स्वतः छान मजा घेतांना

दिसत होता. तो असे काही करेल, अशी मी कल्पनादेखील केली नव्हती. त्याने असे का केले, याचा मी विचार करू शकत नव्हते.”

“एक दुर्दैवी घटना!”

“ह्युगो आणि माझ्यासाठी --- फारच. मला वाटले, त्याने ह्युगोसाठी काहीच ठेवले नसणार. किंवा जवळजवळ काहीच ठेवले नसणार.”

“तुला हे कोणी सांगितले?”

‘ह्युगोला हे फोर्ब्सने सांगितले.”

“ठीक आहे, मिस कार्डवेल --- “मेजर रिडल क्षणभर थांबला. “मला वाटते, एवढेच. तुम्हाला असे वाटते का, की मिस चेव्हेनिक्स-गोर खाली येऊन आमच्याशी बोलू शकेल?

‘ओहो, मला असे वाटते. मी तिला सांगते.”

पायरोने हातात गोळीसारखी पेन्सिल धरत शोध लावला, “एक मिनिट, तुम्ही आधी हे पाहिले होते का?”

“हो. आम्ही दुपारी ब्रिज खेळतांना, मी ते पाहिले होते. मला वाटते, ते वयस्क कर्नल बरींचे होते.”

‘खेळ संपल्यावर त्यांनी ते घेतले का?”

“त्याची मला काही कल्पना नाही.”

"आभारी आहे, तुम्ही जाऊ शकता." "ठीक आहे. मी रुथला सांगते."

रुथ चेव्हेनिक्स-गोर एखाद्या राणीसारखी खाली आली. तिचा रंग निर्धाराचा होता. डोके ताठ होते. पण तिचे डोळे, सुसानसारखेच जागरुक होते. पायरो आला तेव्हा तिने घातलेला, फिकट पीचसारख्या फळाच्या रंगाचा फ्रॉकच अजून तिच्या अंगावर होता. तिच्या खांद्यावर, एक गुलाबी फूल पिनेने लटकवलेले होते. ते ताजे होते. तासाभरपूर्वीच उमललेले पण आता मान टाकलेले वाटत होते.

'रुथ म्हणाली, "काय?"

मेजर रिडलने सुरवात केली, "मी तुम्हाला त्रास देतो आहे, त्याबद्दल माफ करा."

तिने त्याला मध्येच तोडत म्हटले, "अर्थात तुम्हाला मला त्रास द्यायलाच पाहिजे. तुम्हाला प्रत्येकाला त्रास द्यायला पाहिजे. मी तुमचा वेळ वाचवते. सर गेरव्हास यांनी का आत्महत्या केली, याची मला जराही कल्पना नाही. मी तुम्हाला एवढेच सांगू शकते, की ते असे काही करणारे नव्हते."

“आज तुम्हाला त्यांच्यात काही वेगळे जाणवले का? ते उदास होते का? किंवा फार उद्दीपित झाले होते का? --- काही असामान्य असे त्यांच्या बाबतीत घडले होते का?”

‘मला नाही असे वाटत. माझ्या तरी काही लक्षात आले नाही.”

“तुम्ही त्यांना शेवटचे केव्हा पाहिले?”

“चहाच्या वेळी.”

पायरो बोलला, “तुम्ही नंतर अभ्यासिकेत गेला नाहीत?”

“नाही. मी त्याना शेवटचे या खोलीत, तिकडे बसलेले पाहिले.” तिने एका खुर्चीकडे बोट दाखवले.

“अस्स! तुम्हाला ही पेन्सिल माहिती आहे का?”

“ती कर्नल बरींची आहे.”

“तुम्ही ती अलीकडे पाहिलीत का?”

“मला खरे तर आठवत नाही.”

“कर्नल बरी आणि सर गेरव्हास यांच्यात काही वितुष्ट आल्याचे तुम्हाला माहिती आहे का?”

“हो.”

“म्हणजे तुम्हाला पॅरॅगॉन रबर कंपनीबद्दल म्हणायचे आहे का?”

“हो.”

“मला असे वाटते. सर गेरव्हास वेड्यासारखे चिडले होते.”

‘त्यांना कदाचित असे वाटले असावे, की त्यांना फसवण्यात आले आहे?”

रुथने तिचे खांदे शहारवले.

“त्याना आर्थिक बाबतीत काही समजत होते, असे मला वाटत नाही.”

पायरो म्हणाला, “बाईसाहेब, मी तुम्हाला थोडा उध्दट वाटू शकेल, असा एक प्रश्न विचारू शकतो का?

“जर तुम्हाला विचारायचा असेल, तर खुशाल विचारा.”

“तुम्हाला तुमचे वडील वारल्याचे वाईट वाटते आहे का?”

तिने त्याच्याकडे रोखून बघितले. “अर्थात वाईट वाटते आहे. पण मी रडण्यात आनंद घेत नाही. पण मला त्यांच्याविना चुकचुकल्यासारखे होईल. मला त्यांचा लळा होता. आम्ही, ह्युगो आणि मी, त्याना ‘म्हातारा’ म्हणत असू. काहीतरी मनुष्यसदृष एप माकडांचा टोळीप्रमुख असल्यासारखे! ते जरा अपमानकारक

वाटत असे, पण त्यामागे प्रेमच होते. अर्थात तो खरोखर पूर्णपणे गोंधळलेला व मानसिक दृष्ट्या कमकुवत व आतापर्यंत जगलेल्या लोकांमधील म्हातारे डुक्कर होता!"

"बाईसाहेब, तुम्ही माझ्यात रस निर्माण केलात."

"म्हाताऱ्याला ऊचे डोके होते, असे म्हणण्यासाठी मला माफ करा. पण हे खरे आहे. तो डोक्याच्या कुठल्याही कामात अक्षम होता. तुम्हाला सांगते, तो एक अवलिया होता. खूप शूर आणि असाच! द्वंद्व खेळण्यासाठी किंवा करिअर करण्यासाठी, तो ध्रुवप्रदेशापर्यंत जाऊ शकत असे. मला नेहमी वाटते, की तो नेहमी परिणामशून्य पण मोठ्या आवाजात आरडाओरडा करत असे, कारण त्याला खरेच माहिती होते, की त्याला फारशी अक्कल नाही. कुणीही त्याच्यापेक्षा बरे ठरले असते."

पायरोने खिशातून त्याला आलेले पत्र काढले. "बाईसाहेब, हे वाचा."

तिने ते वाचून त्याला परत दिले. "म्हणून तुम्ही इथे आलात तर!"

"या पत्राद्वारे ते तुम्हाला काही सुचवत आहेत का?"

तिने डोके हलवले.

“ते कदाचित खरे असेल. त्या गरीब बिचाऱ्या म्हाताऱ्याला कोणीही लुबाडू शकत होते. जॉन म्हणाला, की मागील दलालाने फसवून त्याची पार धुलाई केली. असे बघा, म्हातारा इतका भोळा आणि नुसता भपकेबाज पण पोकळ होता, की सर्व गोष्टीतले त्याला सर्व काही समजते, असा त्याचा भ्रम होता. तो म्हणजे मूर्खांना दिलेले आमंत्रणच होते.”

“आम्ही मान्य केले होते, त्यापेक्षा त्यांचे वेगळेच चित्र तुम्ही रेखाटलेत.”

“ओहो, ठीक आहे --- तो चांगली सुसंगती दाखवू शकत असे. व्हेन्डा [माझी आई] त्याला देऊ शके, त्या सगळ्यात पाठींबा देई. तो जसा काही सर्वज्ञ आहे, अशा तऱ्हेने ढोंग करत, तो तिच्याभोवती पिंगा घाले. त्यामुळे तो मेल्याने, मला एक प्रकारे आनंद झाला आहे. ही त्याच्यासाठी सर्वात चांगली गोष्ट आहे.”

“तुम्ही काय म्हणत आहात, मला नीटसे कळत नाही.”

रुथ विचार करत रागाने म्हणाली, “त्याचे वेड वाढत चालले होते. केव्हातरी त्याला कोंडून घालायची पाळी येणार होती --- लोक असे बोलायला लागले होते.”

“बाईसाहेब, तुम्हाला माहिती आहे का, ते असे इच्छापत्र तयार करत होते की ज्यात म्ह्टल्याप्रमाणे, तुम्ही ह्युगोशी लग्न केलेत, तरच तुम्हाला पैसे मिळणार होते?”

ती ओरडली, “किती मूर्खपणा! माझी खात्री आहे की ते कायदेशीर रीत्या रद्द करता येईल --- माझी खात्री आहे, की तुम्ही कोणाला कुणाशी लग्न करावे, यासाठी बळजबरी करू शकत नाही.”

‘जर त्यांनी खरोखर अशा इच्छापत्रावर सही केली असेल, तर तुम्ही ते मान्य कराल का?”

ती रोखून बघू लागली. “मी --- मी” ती मध्येच थांबली. दोन तीन मिनिटे तिच्या लोंबणाऱ्या स्लीपरकडे बघत, चुळबुळत बसली. त्या स्लीपरच्या टाचेतून थोडी माती निघून गालीच्यावर पडली.

अचानक रुथ चेव्हेनिक्स-गोर म्हणाली, “थांबा.” ती उठून खोलीबाहेर धावली. आणि लगेच कॅप्टन लेकला बरोबर घेऊन आली. ती जवळजवळ धापा टाकत म्हणाली, “आज ना उद्या हे बाहेर येणारच आहे. तीन आठवड्यापूर्वी जॉनने व मी लंडनमध्ये लग्न केले आहे.”

## अकरा

त्या दोघांपैकी कॅप्टन लेक फार लाज वाटलेला दिसत होता.

मेजर रिडल बोलला, “मिस चेव्हेनिक्स-गोर --- मी मिसेस लेक म्हटले पाहिजे. हे लग्न झाल्याचे कुणालाच माहिती नाही का?

“नाही. आम्ही सगळ्यांना अंधारात ठेवले आहे. त्यातील काही भाग जॉनला फारसा आवडत नाही.”

लेक थोडा चाचरत बोलला, “मी --- मला माहिती आहे की हा जरा बेकार प्रकार आहे. मी सरळ सर गेरव्हास यांच्याकडे जायला पाहिजे होते --- “

मध्येच रुथ बोलली, “आणि त्याला सांगायचे, की मला रुथशी लग्न करायचे आहे. आणि स्वतःला बाहेर हाकलून, डोक्यावर आपटून घ्यायचे. नंतर त्याने बहुधा मला त्याचा वारस म्हणून नाकारले असते. घर डोक्यावर घेतले असते. आणि आम्हाला एकमेकांना सांगायला लावले असते, की आम्ही किती सुंदर वागलो आहोत! माझ्यावर विश्वास ठेवा. माझा मार्ग चांगला होता. एकदा एखादी गोष्ट केली म्हणजे केली. कदाचित भांडण झाल्यावर सुद्धा त्यातून मार्ग निघू शकला असता.”

लेक अजूनही दुःखी दिसत होता.

पायरोने विचारले, “ही बातमी सर गेरव्हास यांना केव्हा सांगायचा तुमचा विचार होता?”

रुथ उत्तरली, “मी तयारी करत होते. ते माझ्याबद्दल व जॉनबद्दल जरा साशंकच होते. त्यामुळे मी माझे लक्ष गॉडफ्रेकडे असल्याचे नाटक केले. त्यामुळे ते एकदम तयार होते. मी असा अंदाज केला, की मी जॉनशी लग्न करत असल्याची बातमी, जवळजवळ सुस्कारा टाकत ऐकली जाईल!”

‘कुणाला या लग्नाबद्दल माहिती आहे का?”

‘हो. शेवटी मी व्हेन्डाला सांगितले. मला तिला माझ्या बाजूला ओढायचे होते.”

“आणि तुम्ही असे करण्यात यशस्वी झालात का?”

“हो. असे बघा, माझे लग्न ह्युगोशी करून देण्यात तिला फारसा रस नव्हता. मला वाटते, तो माझा भाऊ होता, म्हणून असेल. ती बहुधा असा विचार करत होती की आधीच कुटुंबात वेडेपणा आहे आणि असे झाल्यास आम्हाला वेडी मुले होतील. ते फारच काही वेडेवाकडे होते. कारण तुम्हाला माहिती आहे, मी तर दत्तक मुलगी होते. माझा असा विश्वास आहे, की मी त्यांच्या लांबच्या भावाची मुलगी आहे.”

“तुमची खात्री आहे, की सर गेरव्हास यांना खऱ्याबद्दल संशय नव्हता?”

‘ओहो, नाही.”

पायरो म्हणाला, “कॅप्टन लेक, हे खरे आहे का? आज दुपारी सर गेरव्हासबरोबर झालेल्या तुमच्या भेटीत तुम्ही लग्नाबद्दल काही न सांगितल्याची तुमची खात्री आहे का?”

‘नाही, सर. मी सांगितले नव्हते.”

”कारण असे पहा, कॅप्टन लेक, सर गेरव्हासने तुमच्याबरोबर वेळ घालवल्यावर, ते फार उत्तेजित अवस्थेत होते, यासाठी सबळ पुरावा आहे. ते एकदोनदा कुटुंबाच्या मानहानीबद्दलही बोलले.”

लेकने परत सांगितले, “पण आम्ही काही सांगितलेच नव्हते.” त्याचा चेहरा पार पांढरा पडला होता.

“तुम्ही सर गेरव्हासना त्यावेळी भेटलात, ते शेवटचेच का?”

“हो, हे मी तुम्हाला आधीच सांगितले आहे.”

“आज संध्याकाळी आठ वाजून आठ मिनिटांनी तुम्ही कुठे होतात?”

“मी कुठे होतो? अर्ध्या मैलावर, गावाच्या शेवटी असलेल्या, माझ्या घरी.”

“तुम्ही त्या सुमारास हॅमबोरोग घरामध्ये आला नव्हतात?”

“नाही.”

पायरो मुलीकडे वळला. ”तुमच्या वडिलांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली, तेव्हा तुम्ही कुठे होतात?”

“बागेत.”

“बागेत? तिथे तुम्हाला आवाज ऐकू आला का?”

“हो. पण त्याबद्दल मी फारसा विचार केला नाही. मला वाटले, बाहेर कुणीतरी सशांची शिकार करते आहे. तरी आता मला आठवते, की तो आवाज खूप जवळून आला होता.’””

“तुम्ही घरात कुठल्या वाटेने शिरलात?

“मी या खिडकीतून शिरले.”

रुथने डोके वळवून, तिच्या मागे असलेल्या खिडकीकडे निर्देश केला.

“तिथे कुणी होते का?”

“नाही. पण जवळजवळ लगेच तिथे ह्युगो, सुसान आणि मिस लींगार्ड हॉलमधून येत होते. ते पिस्तुलाचा नेम, खून आणि असेच काही गोष्टींसंबंधी बोलत होते.”

पायरो म्हणाला, “अस्स, मला वाटते आता मी --- “

मेजर रिडल संशयपूर्वक बोलले, “ठीक आहे, मी तुमचा आभारी आहे. आता एवढे पुरे.”

रुथ आणि तिचा नवरा वळून खोलीबाहेर पडले.

मेजर रिडलने सुरु केले व निराशेने शेवट केला, “काय भयंकर आहे! या प्रकरणाचा शोध घेणे अजूनच कठीण होत चालले आहे.”

पायरोने मान डोलावली. त्याने रुथच्या बुटातून जमिनीवर पडलेली माती उचलून घेतली आणि ती हातात धरून, त्याकडे विचारपूर्वक पाहू लागला.

तो म्हणाला, “ही भिंतीवर पडलेल्या कवडशासारखी चकाकते आहे. आपल्याला सापडणारा नवीन पुरावा मेलेल्या माणसाच्या वेगवेगळया पैलूंवर प्रकाश टाकतो आहे. त्यामुळे निरनिराळ्या प्रकारचे पटणारे दृष्टीकोन पुढे येत आहेत. लवकरच आपल्याला पूर्ण चित्र दिसेल --- “

तो उठला आणि ती माती नीटपणे केराच्या टोपलीत टाकून दिली.

“माझ्या मित्रा, मी तुला एक गोष्ट सांगतो, या गूढाचे रहस्य आरसा हे आहे. तुझा विश्वास नसेल, तर तू अभ्यासिकेत जा आणि स्वतः पहा.”

मेजर रिडल ठामपणे बोलला, "हा खून आहे. तो सिद्ध करणे तुझे काम आहे. पण जर मला विचारलेस, तर ही आत्महत्या आहे. ती मुलगी आधीच्या दलालाने सर गेरव्हासला फसवल्याबद्दल काय म्हणाली, ते ऐकलेस ना? मी पैजेवर सांगतो, लेकने सांगितलेली गोष्ट त्याचे स्वतःचे हेतू साध्य करण्यासाठी होती. तो कदाचित स्वतःला मदत करत होता. सर गेरव्हासना संशय आला आणि त्यांनी तुला इथे येण्यासाठी पत्र लिहिले., कारण त्याला कळत नव्हते की रुथ आणि लेकमधील संबंध कुठपर्यंत गेले आहेत. मग आज दुपारी लेकने त्याना सांगितले, की त्यांनी लग्न केले आहे. त्यामुळे गेरव्हास मोडून पडला. आता काहीही करण्यास 'फार उशीर' झाला होता. त्याने या सर्वातून बाहेर पडण्याचे ठरवले. खरे तर त्याचे डोके कधी चांगल्या वेळीदेखील स्थिर नसे. तो निराश झाला. माझ्या मते, असे झाले असावे. याविरुद्ध तुला काय सांगायचे आहे?"

खोलीच्या मध्यभागी पायरो दिग्मूढ होऊन उभा राहिला. "मी काय सांगणार? तुझ्याविरुद्ध सांगण्यासारखे माझ्याकडे काही नाही. पण हे मला पटत नाही. यात काही गोष्टी लक्षात घेतलेल्या नाहीत."

"उदाहरणार्थ?"

“आजच्या सर गेरव्हासच्या मनस्थितील वेगवेगळा आश्चर्यकारक बदल, कर्नल बरीची पेन्सिल सापडणे, मिस कार्डवेलचा पुरावा [तो फार महत्वाचा आहे], लोक जेवणासाठी कसेकसे खाली आले, तो मिस लिंगार्डने सांगितलेला पुरावा, गेरव्हास खुर्चीत मेलेला सापडला, तेव्हाची त्याची स्थिती, संत्री असे लिहीलेली पिशवी आणि शेवटी महत्वाचा पुरावा असलेला फुटका आरसा.”

मेजर रिडल बघत बसला. त्याने विचारले, “आता मला तू असे सांगणार आहेस का, की ही गुंतागुंतीची मालिका आहे?”

पायरो हळूवारपणे म्हणाला, “मी उद्यापर्यंत ती असल्याची खात्री करतो.”

## बारा

दुसऱ्या दिवशी पहाटेनंतर लगेच पायरोला जाग आली. त्याला घराच्या पूर्व बाजूकडील झोपायची खोली देण्यात आली होती. अंथरुणाबाहेर पडून, त्याने खिडकीचे पडदे बाजूला केले. आणि सूर्य उगवलेला बघून, त्याला समाधान वाटले. आजची सकाळ स्वच्छ सूर्यप्रकाशाची सकाळ होती. त्याने नेहमीच्या रीतीने काळजीपूर्वक कपडे करायला सुरवात केली. जाड ओव्हरकोट घातला आणि मानेभोवती मफलर लपेटून घेतला.

मग तो पाऊलांचा आवाज न करता, खोलीबाहेर पडला. त्याने फ्रेंच खिडकी आवाज न करता उघडली आणि त्यातून बागेत गेला. आता सूर्य थोडा वर आला होता. हवेत धुके पडले होते. ती छानशी सकाळ होती. तो घराच्या कडेने चालत चालत, सर गेरव्हासच्या अभ्यासिकेच्या खिडकीशी आला. इथे थांबून, तो निरीक्षण करू लागला.

खिडकीनंतर लगेच बाहेर, घराला समांतर अशी गवताची पट्टी होती. त्याला लागून झुडुपांचा रुंद पट्टा होता. पुढची फुले बागेला शोभा आणत होती. त्यापुढे दगडी फरसबंद वाट होती. तिथे पायरो उभा होता. तिथून मागील बसायच्या जागेपर्यंत गवताची पट्टी होती.

पायरोने त्याचे नीट निरीक्षण केले. मग डोके हलवून, त्याने त्याचे लक्ष दोन्ही बाजूला असलेल्या हिरवळीच्या पट्ट्याकडे वळवले. परत त्याने सावकाशीने डोके हलवले. उजव्या हाताकडील वाफ्यात दिसतील असे पाऊलांचे ठसे होते. तो ते बघू लागला तेव्हा त्याच्या कानावर आवाज आला. त्याने डोके वर उचलले

त्याच्या वरची खिडकी उघडली गेली त्याला लाल केसांचे डोके दिसले. त्याभोवती सोनेरी लालसर तेजोवलयात त्याला सुसान कार्डवेलचा बुद्धिमान चेहरा दिसला. ती बोलली, “मिस्टर पायरो, तुम्ही यावेळी तिथे काय करत आहात? गुप्तहेराचे काम चालू आहे का?”

पायरो योग्य प्रकारे वाकला. “शुभ सकाळ, बाईसाहेब. हो माझे काम चालू आहे. तुम्ही कामात असणारा गुप्तहेर बघू शकता.” तो हे थोडे आत्मप्रौढीने म्हणाला. सुसानने डोके एका बाजूला कलते केले. ती म्हणाली, “मी हे माझ्या आठवणीत जपून ठेवले पाहिजे. मी खाली येऊन तुम्हाला मदत करू का?”

“मला जादू झाल्यासारखे वाटेल.”

“मला वाटते, तुम्ही आधी चोर असणार. तुम्ही बागेत कुठून आलात?”

“हॉलच्या खिडकीतून.”

“मी एका मिनिटात येते.”

ती बोलल्याप्रमाणे आली. तिने पहिल्यांदा पायरोला पाहिले, त्याच स्थितीत तो होता. तो बोलला, “बाईसाहेब, तुम्ही एवढ्या लवकर उठलात?

“मला नीट झोप लागली नाही. सकाळी पाच वाजता मला काही विचित्र वाटत होते.”

“पाच म्हणजे काही इतके लवकर नाही.”

“पण तसे वाटत होते. तर मग माझे थोर गुप्तहेर, तुम्ही काय शोधत आहात?”

“हे बघा पाऊलांचे ठसे.”

‘हो. आहेत खरे.”

पायरोने चालू ठेवले, “त्यापैकी चार मी तुम्हाला दाखवतो. दोन खिडकीकडे जात आहेत आणि दोन येत आहेत.”

“ते कुणाचे आहेत? माळ्याचे?”

“बाईसाहेब, हे ठसे कुण्या बाईच्या लहानशा, सुंदर, उंच टाचांच्या बुटांचे आहेत. बघून खात्री करा. मात्र माझी विनंती आहे, की त्यावरून न चालता कडेला पाऊल ठेवा.”

सुसान एक मिनिट माघार घ्यायला बघू लागली पण नंतर पायरोने सांगितलेल्या ठिकाणी तिने पाऊल ठेवले. तिने गडद तपकिरी रंगाच्या उंच टाचांच्या चामडी स्लीपर घातल्या होत्या.

"हे बघा, तुमच्याही जवळजवळ त्याच मापाच्या आहेत. पण तंतोतंत नव्हे. हे दुसरे ठसे जास्त लांब पायाचे आहेत. कदाचित मिस चेव्हेनिक्स-गोरचे, मिसेस चेव्हेनिक्स-गोरचे --- किंवा मिस लींगार्डचे असू शकतील.

"मिसेस चेव्हेनिक्स-गोरचे नाहीत. तिची पाऊले लहान आहेत. त्या काळात लोक तसे करत असत. लहान पाऊल राखायचा प्रयत्न करत. आणि मिस लींगार्ड विचित्र प्रकारचे सपाट टाचांचे बूट घालते."

"मग त्या पाऊलखुणा मिस चेव्हेनिक्स-गोरच्या आहेत. ओहो, हो, मला आठवते, मला काल संध्याकाळी ती बागेत गेल्याचे म्हणाली होती."

त्याने परत घराभोवती फिरायला सुरवात केली.

सुसानने विचारले, "आपण अजून पुरावे शोधत आहोत का?

"आता आपण सर गेरव्हास यांच्या अभ्यासिकेत चाललो आहोत." तो पुढे आणि त्याच्यामागोमाग सुसान कार्डवेल चालली होती. दार अजून उगीचच उदासीने हलत होते. आतमध्ये खोली,

काल होती, तशीच होती. पायरोने पडदे सरकवून, उजेड आत आणला. तो बाहेरील हिरवळीच्या पट्ट्याकडे एक दोन मिनिटे बघत राहिला व मग म्हणाला, “बाईसाहेब, मला वाटते, तुम्ही चोरांना विशेष ओळखत नाही?”

सुसानने तिचे लाल डोके पश्चात्तापदग्धतेने हलवले. “मिस्टर पायरो, ते खरे आहे.”

“मुख्य कॉन्स्टेबलचेसुद्धा चोरांशी मित्रत्वाचे नाते असले, तरी त्याचा फायदा नव्हता. त्याचे गुन्हेगारांशी नाते नेहमी फक्त कामाच्या स्वरूपाचे असे. पण माझ्याबरोबर असे काही नव्हते. एकदा एका चोराने मला फ्रेंच खिडकीबद्दल एक रुचीपूर्ण गोष्ट सांगितली --- जर ती नीट बंद केलेली नसेल, तर एक युक्ती करता येते. त्यासंबंधी त्याने मला सांगितले.”

बोलता बोलता तो डाव्या हाताने खिडकीचे हँडल फिरवत होता. जमिनीतून लांब, कडी भोकातून बाहेर आली. पायरोला खिडकीची दोन्ही दारे त्याच्याकडे ओढता आली. ती सताड उघडल्यावर, त्याने हँडल सोडून दिले व परत हँडल न फिरवता ती बंद केली, जेणेकरून लांब कडी भाग परत भोकात जाऊ नये. मग त्याने खिडकीच्या दाराच्या मध्यभागी झटपट अचानक एक दणका

मारला. त्यामुळे कडी परत जमिनीतील भोकात गेली. आणि हँडल आपोआप फिरले.

“बाईसाहेब, तुम्ही पाहिले का?”

“मला असे वाटते, मी पाहिले.”

सुसान पांढरीफटक पडली.

“आता खिडकी बंद आहे. ती बंद असतांना खोलीत शिरणे अशक्य आहे, पण खोलीतून बाहेर पडणे शक्य आहे. बाहेरून दारे खेचणे शक्य आहे. आणि मग आता मी केले तसे करून, हँडल फिरवून, कडी खाली जमिनीत घुसवणे शक्य आहे. त्यानंतर खिडकी घट्ट लागते. आणि ती बघणारा कुणीही म्हणतो, ती आतून बंद केली आहे.”

सुसानचा आवाज थरथरू लागला. “हे असे --- हे असे काल रात्री झाले का?”

“बाईसाहेब, मला असे वाटते.”

सुसान आक्रमकपणे बोलली, “माझा यातील एकाही शब्दावर विश्वास नाही.”

पायरोने उत्तर दिले नाही. तो शेकोटीकडे चालत गेला. तो तिथे सूक्ष्म निरीक्षण करू लागला.

“बाईसाहेब, मला साक्षीदार म्हणून तुमची गरज आहे. माझ्याकडे एक साक्षीदार आधीच आहे, मिस्टर ट्रेन्ट. त्याने काल मला आरशाचा छोटासा चंदेरी तुकडा शोधून काढताना पाहिले आहे. मी त्याच्याशी त्याबद्दल बोललो. मी तो पोलिसांसाठी आहे तिथे ठेऊन दिला. मी मुख्य कॉन्स्टेबललादेखील सांगितले, की फुटलेला आरसा हा महत्वाचा पुरावा आहे. पण माझ्या सूचनेमुळे त्याने त्याचा फायदा करून घेतला नाही. आज हा चंदेरी तुकडा मी तुमच्यासमोर या लहानशा पाकिटात ठेवतो.” त्याने बोलताना तो ठेवला. म्हणजे तुम्ही साक्षीदार झालात. [एवढे लक्षात ठेवा, की त्याकडे मी मिस्टर ट्रेन्टचे लक्ष आधीच वेधून घेतले आहे.] आता मी त्यावर लिहितो आणि तो बंद करतो. तुम्ही साक्षीदार आहात?”

“हो ---पण --- पण --- याचा अर्थ काय, मला समजत नाही.”

पायरो खोलीच्या दुसऱ्या बाजूला चालत गेला. तो टेबलासमोर उभा राहिला आणि त्याच्यासमोरील भिंतीवरील फुटलेल्या आरशाकडे निरखून पाहू लागला.

“याचा अर्थ काय ते मी सांगतो. जर काल रात्री तुम्ही इथे आरशात बघत उभ्या असतात, तर तुम्हाला खून होतांना दिसला असता --- “

## तेरा

रुथ चेव्हेनिक्स-गोर --- आता रुथ लेक ही आयुष्यात पहिल्यांदाच न्याहारीसाठी वेळेवर आली. पायरो हॉलमध्ये होता. त्याने तिला ती जेवणघरात जाण्यापूर्वी हटकले.

“बाईसाहेब, मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे.”

“काय?”

‘काल रात्री तुम्ही बागेत होतात. सर गेरव्हास यांच्या अभ्यासिकेतील खिडकीबाहेरील फुलांच्या ताटव्यात तुम्ही पाऊल घातले होते का?”

रुथ त्याच्याकडे बघत राहिली. “हो. दोनदा.”

“आहा! दोनदा.”

“दोनदा कसे?”

“पहिल्यांदा, मी फुले तोडत होते. ते सात वाजता.”

“फुले तोडायची ती जरा विचित्र वेळ नव्हती का?”

“हो. खरे तर होती. मी काल सकाळी फुले तोडून फुलदाणीत ठेवली होती. पण चहानंतर व्हेन्डा म्हणाली की जेवण टेबलावरील फुले फारशी चांगली दिसत नाहीत. मला तर ती चांगली वाटत होती. पण मग मी जाऊन ताजी फुले आणली.”

“तुमच्या आईने तुम्हाला तसे करायची विनंती केली? बरोबर?”

“हो. त्यामुळे मी सात वाजत आलेले असतांना गेले. मी कडेची फुले तोडली. कारण तिकडे कुणी विशेष जात नसल्याने, ती तोडली तरी डोळ्यांना फारसे खुपले नसते.”

“हो. हो. पण दुसऱ्यांदा. पण तुम्ही म्हणालात की तुम्ही दुसऱ्यांदा तिकडे गेलात?”

“ते थोडे जेवणापूर्वी. माझ्या ड्रेसवर खांद्याजवळ ब्रिलीयनटाइनचा डाग पडला होता --- मला कपडे बदलायचा कंटाळा आला होता. आणि खोट्या फुलांपैकी कोणतीच ड्रेसच्या पिवळ्या रंगासारखी नव्हती. मी मगाशी फुले तोडतांना पिवळा गुलाब पाहिल्याचे मला आठवले. त्यामुळे मी घाईने बाहेर जाऊन ते तोडले आणि माझ्या खांद्यावर त्या ठिकाणी लावले.”

पायरोने सावकाश मान हलवली.

“हो. मला आठवते आहे, काल रात्री तुम्ही ड्रेसवर पिवळा गुलाब लावला होता. बाईसाहेब, तुम्ही गुलाब तोडला, ती काय वेळ होती?”

“कुणास ठाऊक?”

“पण ते महत्वाचे आहे. विचार करा. आठवून बघा.”

रुथने भुवया उंचावल्या. तिने हळूच पायरोकडे पाहिले आणि लगेच नजर दुसरीकडे वळवली.

शेवटी ती म्हणाली, “मी नक्की वेळ सांगू शकते. तेव्हा --- अर्थात --- आठ वाजून पाच मिनिटे झाली असतील. मी बागेतून परत येताना मी घंटीचा आवाज ऐकला. आणि लगेच तो मजेशीर मोठा आवाज आला. मी घाई करत होते, कारण मला वाटले, ती पहिली नसून, दुसरी घंटी होती.”

“ओहो, म्हणजे तुम्हाला वाटले --- पण तुम्ही बागेत फुलांजवळ उभे राहून, खिडकीचा अभ्यास करायचा प्रयत्न केला नाही?”

‘खरे तर मी केला. मला वाटले, ती उघडी असेल, आणि तिकडून पटकन आत जाता येईल. पण ती बंद होती.”

“तर मग सर्व काही स्पष्ट केले गेले आहे. बाईसाहेब, मी तुमचे अभिनंदन करतो.”

ती त्याच्याकडे बघत राहिली. “याचा अर्थ काय?”

“की तुम्ही सर्व स्पष्टीकरण दिले आहे. तुमच्या बुटांवरील खळगा, फुलांच्या वाफ्यात तुमच्या पायांचे ठसे, खिडकीच्या बाहेर तुमच्या बोटांचे ठसे. हे सर्व फार सोयीस्कर आहे.”

रुथने उत्तर देण्यापूर्वी, मिस लिंगार्ड घाईने जिना उतरत खाली आली. तिच्या गालांवर विचित्र असा जांभळा रंग पसरला होता. पायरोला व रुथला एकत्र उभे असलेले बघून ती जरा गडबडली.

ती बोलली, “मला सांगा, काय झाले आहे?”

रुथ रागाने म्हणाली, “मला वाटते मिस्टर पायरोंना वेड लागले आहे!” ती तिथून निसटून जेवणघरात गेली. मिस लिंगार्ड आश्चर्यचकित चेहऱ्याने पायरोकडे वळली. त्याने डोके हलवले.

तो म्हणाला, “न्याहारी झाल्यावर, मी स्पष्टीकरण देतो. मला सर्वांनी दहा वाजता सर गेरव्हास यांच्या अभ्यासिकेत जमायला हवे आहे.” त्याने जेवणघरात शिरल्यावर पुन्हा तेच परत सांगितले.

सुसान कार्डवेलने त्याच्याकडे झटपट नजर टाकली. मग ती रुथकडे वळवली. तेव्हा ह्युगो म्हणाला, “काय? कशासाठी?” तिने त्याला एक कोपरखळी मारली आणि तो आज्ञाधारकपणे गप्प बसला.

त्याची न्याहारी संपल्यावर पायरो उठला आणि दाराकडे चालत गेला. तो वळला आणि जुन्या पद्धतीचा एक कटाक्ष टाकून बोलला, “दहाला पाच मिनिटे आहेत. पाच मिनिटात --- अभ्यासिकेत.”

## चौदा

पायरोने आजूबाजूला पाहिले. उत्सुक चेहरे त्याच्याकडे काही अपेक्षेने बघत, गोलाकार बसले होते. तिथे प्रत्येकजण असल्याची त्याने खात्री केली. फक्त एकजण कमी होती. त्याच क्षणी मिसेस चेव्हेनिक्स-गोर डौलदार पाऊले टाकत आली. ती आजारी व दमलेली दिसत होती.

पायरोने तिच्यासाठी मोठी खुर्ची पुढे ओढली. ती बसली. तिने फुटक्या आरशाकडे पाहिले. ती थरथरली. ती निर्लेपतेने म्हणाली, “बिचारा गेरव्हास --- आता लवकरच तो मोकळा होईल.”

पायरोने घसा खाखरून सुरवात केली. त्याने जाहीर केले, “सर गेरव्हास यांच्या आत्महत्येविषयी खऱ्या गोष्टी तुम्हाला माहिती व्हाव्यात, म्हणून मी तुम्हाला सगळ्यांना इथे बोलावले आहे.”

मिसेस चेव्हेनिक्स-गोर म्हणाली, “ते त्याचे नशीब होते. गेरव्हास कणखर होता. पण त्याचे नशीब त्याच्यापेक्षा कणखर होते.”

कर्नल बरी थोडासा पुढे सरकला. “व्हेन्डा, माझ्या प्रिये.”

ती त्याच्याकडे बघून हसली. “मग तिने तिचे हात वर केले. त्याने ते त्याच्या हातात घेतले. ती मृदुपणे म्हणाली, “नेड, तू म्हणजे माझा विसावा आहेस.”

रुथ टोकदारपणे बोलली, "मिस्टर पायरो, आम्ही असे समजू शकतो का, की तुम्ही माझ्या वडिलांच्या आत्महत्येचे कारण निश्चित केले आहे?"

पायरोने त्याचे डोके हलवून म्हटले, "नाही, बाईसाहेब."

"मग आपण कशासाठी जमलो आहोत?

पायरो शांतपणे म्हणाला, "मला सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर यांच्या आत्महत्येचे कारण माहिती नाही. कारण सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर यांनी आत्महत्या केली नाही, तर त्याना ठार मारण्यात आले."

"ठार मारण्यात आले?" अनेक आवाज एकाच वेळी बोलले. गोंधळलेले चेहरे पायरोकडे वळले. मिसेस चेव्हेनिक्स-गोर वर बघून बोलली, "ठार मारण्यात आले? ओहो, नाही." आणि तिने सावकाश डोके हलवले.

आता ह्युगो बोलला, "तुम्ही ठार केले असे म्हणालात का? अशक्य! आम्ही खोलीत आलो तेव्हा कुणीच इथे नव्हते. खिडकी आतून बंद होती. दार आतून बंद होते. आणि किल्ली माझ्या मामाच्या खिशात होती. त्याना मारणे कसे शक्य होते?"

'तरीही ते मारले गेले."

कर्नल बरी न पटल्यासारखे बोलले, “आणि मला वाटते, खुनी किल्लीच्या भोकातून निसटून गेला? की धुराड्यातून उडून गेला?”

पायरो म्हणाला, “खुनी खिडकीतून गेला. कसा ते मी तुम्हाला दाखवतो.” त्याने खिडकीच्या बाबतीतले त्याचे कौशल्य दाखवले. तो म्हणाला, “पाहिलेत? तर अशा तऱ्हेने खुनी बाहेर पडला. पहिल्यापासूनच मला असे वाटत होते, की सर गेरव्हासने आत्महत्या केली नाही. ज्याने पहिल्यापासून, आत्मकेंद्रीपणा व अहंमन्यपणा दाखवला आहे, असा माणूस स्वतःला मारून घेणार नाही.”

“आणि अजूनही बऱ्याच गोष्ट आहेत! तसे बघता त्याच्या मृत्यूपूर्वी, सर गेरव्हास त्यांच्या टेबलाशी बसलेले होते. त्यांनी ‘माफ करा.’ असे शब्द कागदावर खरडले होते. आणि नंतर त्यांनी स्वतःवर पिस्तुल झाडून घेतले. पण ही शेवटची कृती करण्यापूर्वी, काही कारणाने, त्यांनी खुर्ची फिरवली. त्यामुळे ती टेबलाच्या रुंदीकडे आली. का? काही कारण असले पाहिजे. मला प्रकाश दिसला आणि मला जड ब्रॉन्झच्या बाहुलीसारख्या वस्तूच्या तळाशी छोटासा चंदेरी आरशाचा तुकडा सापडला ---

मी स्वतःला विचारले की फुटक्या चंदेरी आरशाचा तुकडा इथे कसा आला? आणि मला आपोआप उत्तर सापडले. आरसा फुटला

होता. आणि पिस्तुलातील गोळीने नव्हे, तर जड ब्रॉझच्या वस्तूने मुद्दाम फोडला गेला होता.

“पण का? मी टेबलाशी गेलो आणि खुर्चीकडे पाहिले. हो. मला दिसले. सगळे चुकीचे होते. आत्महत्या असती, तर खुर्ची फिरवली गेली नसती. त्याच्या कडेवर वाकून, नंतर स्वतःवर गोळी झाडून घेणे. सगळी गोष्ट तयार केली गेली होती. आत्महत्या खोटी होती!

आणि आता मी सर्वात महत्वाच्या भागाकडे येतो. मिस कार्डवेलचा पुरावा. ती म्हणाली, की काल संध्याकाळी ती घाईने खाली येत होती, कारण तिला वाटले, की दुसरी घंटी वाजली. म्हणजे तिला वाटले, की तिने आधीच पहिली घंटी ऐकली आहे.

आता निरीक्षण करा. जर गोळी लागली तेव्हा सर गेरव्हास त्यांच्या खुर्चीत नेहमी बसतात, तसे बसले असते, तर गोळी कुठे गेली असती? सरळ रेषेत जात, ती दारातून, ते उघडे असते तर, जाऊन सरळ घंटीवर आदळली असती!

आता तुम्हाला मिस कार्डवेलच्या विधानाचे महत्व पटेल का? कुणालाच पहिली घंटी ऐकू गेली नाही. पण नंतर त्याच्याबरोबर वर असलेल्या तिच्या खोलीत ती घंटी ऐकू

येण्यासाठी ती उत्तम जागी होती. लक्षात घ्या, घंटीचा आवाज फक्त एकदाच होणारा होता.

सर गेरव्हास यांनी स्वतःला मारून घेण्याचा प्रश्नच नव्हता. मेलेला मनुष्य उठू शकत नाही, दार लावून कुलुपबंद करू शकत नाही आणि सोयीस्कर अवस्थेत खुर्चीत बसू शकत नाही! कोणीतरी दुसरे यात होते. म्हणून ही आत्महत्या नव्हती, तर खून होता.

सर गेरव्हास यांना जिचे तिथे येणे सहजपणे मान्य होण्यासारखे असलेली, परिचित अशी व्यक्ती त्यांच्या बाजूला उभी राहून त्यांच्याशी बोलत होती. सर गेरव्हास कदाचित लिहिण्यात गुंग होते. खुन्याने पिस्तुल त्यांच्या डोक्याच्या उजव्या बाजूस आणले व झाडले. काळे कृत्य करून झाले. आता झटपट काम निस्तरायचे उरले. खुनी मोज्यांवरुन आवाज न करता चालतो. दार कुलुपबंद आहे. किल्ली सर गेरव्हास यांच्या खिशात आहे. पण समजा एक मोठा घंटीचा आवाज ऐकू आला असता तर? तर मग लक्षात आले असते, की गोळीचा आवाज आला, तेव्हा दार बंद नसून, उघडे होते. म्हणून खुर्ची फिरवली गेली. शरीरावर पिस्तुल दाबले गेले आणि आरसा मुद्दाम फोडला गेला. मग खुनी खिडकीतून बाहेर जातो. पुन्हा ती लावून घेतो. गवतावरून न चालता, जिथे पाणी

घातल्यावर पाउलखुणा पुसल्या जातील अशा फुलांच्या वाफ्यातून चालत जातो. घराला कडेने चक्कर मारून, हॉलमध्ये येतो.”

तो थांबून म्हणाला, “गोळीचा आवाज आला, तेव्हा एकच व्यक्ती बागेत होती. त्या व्यक्तीने तिच्या पाउलखुणा फुलांच्या वाफ्यात उमटवल्या आणि हाताचे ठसे खिडकीच्या बाहेरील बाजूला उमटवले.”

तो रुथजवळ आला.

‘आणि यासाठी काही हेतू होता, नाही का? तुमच्या वडिलांना तुमच्या गुप्त लग्नाचा सुगावा लागला होता. ते तुमचे दत्तकविधान नामंजूर करण्याच्या मागे होते.”

रुथचा आवाज स्पष्टपणे अहंमन्य होता. “या तुमच्या गोष्टीतील एकही शब्द खरा नाही. सुरवातीपासून शेवटपर्यंत, ती खोटी आहे.”

“बाईसाहेब, माझ्याकडे तुमच्याविरुद्ध बळकट पुरावे आहेत. ज्युरी तुमच्यावर विश्वास ठेवेल किंवा नाही ठेवणार!”

“तिला ज्युरीपर्यंत जायची पाळीच येणार नाही.”

सगळेजण चमकून, वळले. मिस लिंगार्ड चालत आली. तिचा चेहरा बदलला. ती थरथरत होती.

‘मी त्याला मारले. मी हे कबूल करते. त्याला माझ्याकडे कारण होते. मी --- मी त्यासाठी काही काळ थांबले होते. मिस्टर पायरो अगदी बरोबर आहेत. मी पिस्तुल खणातून आधीच काढून घेतले होते. मी त्यांच्या बाजूला उभी राहून पुस्तकाबद्दल बोलले --- आणि त्यांना मारले. ते मी आठनंतर लगेच केले. गोळी घंटीवर आपटली. ती त्यांच्या डोक्यातून आरपार जाईल, याची याची मला काही कल्पना नव्हती. बाहेर जाऊन पहाण्याइतका वेळ नव्हता. मी दार कुलुपबंद केले. किल्ली सर गेरव्हास यांच्या खिशात घातली. मग खुर्ची फिरवून ठेवली. आरसा फोडला. आणि एका कागदावर ‘माफ करा.’ असे खरडून, खिडकीतून मिस्टर पायरोनी दाखवलेल्या मार्गाने बाहेर पडले. फुलांच्या वाफ्यात पाय टाकले, पण ते काळजीपूर्वक रीत्या तिथे ठेवलेल्या झाडूवर टाकले. मग मी हॉलमध्ये गेले. मी खिडकी उघडीच टाकली. त्यातून रुथ गेलेली मला माहिती नव्हते. ती घराच्या पुढील बाजूने आली असणार आणि तेव्हा मी मागच्या बाजूला गेले असणार. मला झाडू परत शेडमध्ये जागेवर ठेवायचा असल्याने, मी हॉलमध्ये कोणीतरी खाली येऊन मला तिथे बघेपर्यंत आणि स्नेल घंटीशी जाईपर्यंत थांबले. आणि मग --- “

तिने पायरोकडे पाहिले. “नंतर मी काय केले, ते तुम्हाला माहिती नाही ना?”

‘ओहो, हो. मला माहिती आहे. मला कचऱ्याच्या बादलीत एक पिशवी सापडली. ती तुमची फार हुशारीची कल्पना होती. मुलांना जे करायला आवडते, ते तुम्ही केलेत. तुम्ही ती हवेने फुगवून फोडलीत. त्यामुळे समाधानकारक मोठा आवाज झाला. तुम्ही ती कचऱ्याच्या बादलीत टाकून दिलीत. आणि घाईने हॉलबाहेर पडलात. तुम्ही आत्महत्येची वेळ निश्चित केलीत --- आणि जणू गोळीचा आवाज आला, तेव्हा तुम्ही तिथे नसल्याचे भासवलेत. पण अजून एक गोष्ट तुम्हाला छळत होती. तुम्हाला गोळी उचलून घ्यायला वेळ झाला नाही. ती घंटीच्या जवळपास कुठेतरी होती. ती अभ्यासिकेत आरशाच्या जवळपास कुठेतरी सापडणे महत्वाचे होते. मला हे माहिती नव्हते, की तुम्ही कर्नल बरीच्या पेन्सिलीची कल्पना कधी केलीत --- “

मिस लिंगार्ड म्हणाली, “आम्ही सगळे हॉलमधून बाहेर आलो, त्यानंतर लगेच. रुथला खोलीत बघून मला नवल वाटले. मला समजले की ती खिडकीमधून जवळच्या मार्गाने बागेतून इथे आली असणार. मग मला कर्नल बरींची पेन्सिल ब्रिजच्या टेबलावर पडलेली दिसली. ती मी माझ्या बॅगेत टाकली. जर नंतर कोणी मला पिस्तुलातील गोळी उचलतांना पाहिले, तर मी असे ढोंग करू शकेन, की ती पेन्सिल होती. खरे तर मला वाटले, मला गोळी उचलतांना कोणी पाहिले नाही. तुम्ही प्रेताची तपासणी करत

असताना मी ती आरशाजवळ टाकली. जेव्हा तुम्ही माझी उलटतपासणी घ्यायला लागलात, तेव्हा मला माझ्या पेन्सिलीच्या कल्पनेबद्दल बरे वाटले.”

‘हो. ही तुमची हुशारी होती. माझा त्यामुळे गोंधळ उडाला.”

“मला भीती होती की कुणीतरी खऱ्या गोळीचा आवाज ऐकला असणार. पण मला माहिती होते, की सर्वजण आपापल्या खोल्यात जेवणासाठी कपडे करण्यात गर्क होते. नोकर त्यांच्या रहायच्या जागी होते. एकट्या मिस कार्डवेलने तो ऐकला असण्याची शक्यता होती. आणि बहुधा तिला वाटले असावे की मोटारीच्या इंजिनाचा किंवा सिलेंडरच्या स्फोटाचा तो आवाज असावा. खरे तर तिने ऐकलेला आवाज घंटीचा होता. मला वाटले --- मला वाटले, सर्व काही बिनबोभाट पार पडले --- “

मिस्टर फोर्ब्स त्यंच्या खास आवाजात सावकाश म्हणाले, “ही फारच असामान्य गोष्ट आहे. पण याचा काही उद्देश दिसत नाही“

मिस लिंगार्ड स्पष्टपणे बोलली, “त्यामागे हेतू होता --- “ती पुढे आक्रमकपणे बोलली, “जा. जा. पोलिसांना फोन करा. तुम्ही कशासाठी थांबला आहात?”

पायरो शांतपणे म्हणाला, “तुम्ही सगळेजण कृपया इथून जाल का? मिस्टर फोर्ब्स, मेजर रिडलला फोन करा. तो येईपर्यंत मी इथे थांबतो.”

एकेकजण हळूहळू खोलीबाहेर पडले. गोंधळलेले, काही न समजलेले, धक्का बसलेले ते, बारीक, ताठ, नीट भांग पाडलेल्या करड्या केसांच्या आकृतीकडे लज्जित कटाक्ष टाकत होते.

रुथ शेवटी गेली. ती दारात जाऊ की नको अशा मनस्थितीत उभी होती.

ती रागाने पायरोला शिव्या देत बोलली, “मला समजत नाही, आतापर्यंत तुम्ही म्हणत होतात की ते मी केले आहे.”

पायरो म्हणाला, “नाही. नाही. मला असे कधीच वाटले नाही.”

रुथ सावकाश बाहेर गेली.

आता मध्यमवयीन, लहानशा, नापसंती दर्शवणाऱ्या आणि हुशारीने आखलेल्या व थंड डोक्याने केलेल्या खुनाची आताच कबुली दिलेल्या बाईबरोबर पायरो राहिला.

मिस लिंगार्ड म्हणाली, “नाही. तुम्हाला ते तिने केले असे वाटले नाही. तुम्ही तिला शिव्या देऊन, मला बोलायला प्रवृत्त केलेत. बरोबर?”

पायरोने मान झुकवली.

मिस लिंगार्ड संभाषणातमक रीतीने म्हणाली, “आपण थांबलो आहोत तोपर्यंत, तुम्ही मला सांगू शकता, की तुम्ही माझ्यावर संशय कसा घेतला?”

”अनेक गोष्टी. सुरवातीला, तुमचे सर गेरव्हासबद्दलचे सांगणे. सर गेरव्हाससारखा अभिमानी माणूस तुमच्यासारख्या, बाहेरच्या इतक्या क्षुल्लक व्यक्तीजवळ त्याच्या भाच्याबद्दल काही बोलणार नाही. तुम्हाला आत्महत्येची गोष्ट बळकट करायची होती, म्हणून तुम्ही असे सांगितले. तुम्ही तुमच्या मर्यादेबाहेर जाऊन, हे जे सांगितले, त्यामुळे तुमच्या मनात ह्युगोबद्दल काही अपमानकारक त्रास असला पाहिजे, हे मला समजले. हे देखील सर गेरव्हासने परक्या व्यक्तीला कधीच सांगितले नसते. आणि सर्वात विशेष गोष्ट म्हणजे, रुथ हॉलमध्ये शिरली, तेव्हा तुम्ही हे सांगितले नाही, की ती बागेतून, अभ्यासिकेच्या खिडकीतून ती हॉलमध्ये शिरली. शिवाय मला --- अगदी कचरा बाद्लीत कधी न आढळणारी --- कागदी पिशवी --- तिथे सापडली. हॅमबोरोग येथील घरासारख्या हॉलमधील कचरा बादलीत! गोळी उडाल्याचा आवाज आला, तेव्हा फक्त तुम्हीच हॉलमध्ये होतात. कचरा बादली प्रकरण असे सुचवत होते, की यामागे शोधक, घरगुती स्वरूपाची वस्तु कचरा

बादलीत टाकणारी एखादी बाईच असावी. असे ते सगळे जमत गेले. ह्युगोवर संशय घ्यायचा आणि रुथला त्यापासून दूर ठेवायचे, असा प्रयत्न झाला. गुन्हा असा असा घडला आणि हेतू!"

ती छोटीशी करड्या केसांची बाई हादरली. "तुम्हाला हेतू माहिती होता?"

'असे वाटते. रुथचा आनंद --- तो हेतू होता! माझी कल्पना होती, की तुम्ही तिला जॉन लेकबरोबर बघितले आहे --- त्यांचे काय गुफ्तगू आहे, ते तुम्हाला माहिती असावे. नंतर सर गेरव्हास यांची कागदपत्रे तुमच्यासाठी उपलब्ध असणे, तुम्हाला त्याच्या नवीन इच्छापत्राची माहिती असणे --- रुथने ह्युगोशी लग्न न केल्यास तिचे दत्तकविधान नामंजूर होण्याची शक्यता. त्यामुळे सर गेरव्हास यांनी मला पत्र पाठवले आहे, या गोष्टीचा उपयोग करून, तुम्ही कायदा तुमच्या हातात घेण्यास धजलात. बहुधा मला पाठवलेल्या पत्राची प्रत तुम्ही वाचली असावी. त्याने मुळात पत्र कुठल्या भीतीने, संशयाने व भावनांच्या गोंधळात लिहिले, कोणास ठाऊक! पद्धतशीरपणे त्याना लुटले जात आहे, असा बरोजचा किंवा लेकचा त्याना संशय आला असावा. रुथच्या भावना काय आहेत, याबद्दल त्यांना खात्री नसल्याने, त्याना खासगी गुप्तहेराकडून मदत मागवायची पाळी आली असावी. तुम्ही मुद्दामून

त्या गोष्टीचा उपयोग करून, आत्महत्येचा बनाव रचला. आणि असा आव आणला की ह्युगोमुळे सर गेरव्हास अतिशय वाईट मनस्थितीत आहेत. तुम्हीच मला पत्र पाठवले. आणि तुम्हीच असे सर गेरव्हासने म्हटल्याचे भासवले, की 'आता फार उशीर झाला.'"

मिस लिंगार्ड घाबरून म्हणाली, "गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर त्रासिक, सामाजिक उच्च स्तराबद्दल फार अभिमान असलेला व पोकळ बडबड्या होता. मी त्याला रुथचा आनंद घालवून देणार नव्हते."

पायरो शांतपणे बोलला, "रुथ तुमची मुलगी आहे का?"

"हो --- ती माझी मुलगी आहे --- मी नेहमी --- तिचा विचार करते. मी जेव्हा ऐकले, की सर गेरव्हास चेव्हेनिक्स-गोर याना कुटुंबाचा इतिहास लिहिण्यासाठी कोणीतरी हवे आहे, तेव्हा मी संधी घेतली. मला माझ्या मुलीला बघण्याची इच्छा होती --- माझी मुलगी. मला माहिती होते, चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब मला ओळखणार नाहीत. त्याला खूप वर्षे झाली ---मी तरुण आणि सुंदर होते. त्यानंतर मी माझे नाव बदलले. शिवाय चेव्हेनिक्स-गोर बाईसाहेब या काहीही ठामपणे जाणून घेण्यास असमर्थ होत्या. मला त्या आवडत असत, पण मला चेव्हेनिक्स-गोर कुटुंबाबद्दल राग होता. त्यांनी मला कस्पटासमान वागवले होते. आणि इथे गेरव्हास

अहंमन्यतेने व उच्च सामाजिक दर्जाबद्दलच्या वृथा गर्वाने रुथच्या आयुष्याचे वाटोळे करायला निघाला होता. पण मी ठरवले होते, की रुथ सुखी झाली पाहिजे आणि --- जर तिला माझ्याबद्दल कधीच काही कळले नाही तर --- ती सुखी होईल!”

ते भावनिक आव्हान होते --- प्रश्न नव्हता.

पायरो नतमस्तक झाला. “माझ्याकडून कुणाला काही कळणार नाही.”

मिस लिंगार्ड शांतपणे म्हणाली, “आभारी आहे.

## पंधरा

नंतर जेव्हा पोलीस आले आणि गेले, तेव्हा पायरोने रुथ लेकला तिच्या नवऱ्याबरोबर बागेत पाहिले. ती आव्हानात्मक भाषेत म्हणाली, "मिस्टर पायरो, तुम्हाला खरेच असे वाटते का, की मी ते केले?"

"बाईसाहेब, मला माहिती होते, तुम्ही ते करू शकणार नाही --- कारण फुले."

"फुले? मला समजले नाही."

"बाईसाहेब, तिथे कडेला फक्त चार पाऊलखुणा होत्या. पण तुम्ही जर फुले तोडत असतात, तर तिथे अजून पाऊलखुणा असायला हव्या होत्या. याचा अर्थ तुमची बागेला पहिली भेट आणि दुसरी भेट यामध्ये कोणीतरी त्या पुसून टाकल्या. हे फक्त अपराधी व्यक्तीच करू शकते. पण तुमच्या चार पाऊलखुणा पुसलेल्या नव्हत्या, त्याअर्थी तुम्ही अपराधी नव्हतात. त्यामुळे तुम्ही आपोआप सुटलात."

रुथचा चेहरा उजळला.

"ओहो, असे झाले तर! मला वाटले काही भयंकर होणार. पण त्या गरीब बिचाऱ्या बाईबद्दल मला वाईट वाटते. तिने कबूल

केल्यामुळे, मी सुटले. मला सोडवण्याचाच तिचा विचार असावा. हे फार उमदे कृत्य होते. तिला कोर्टात सुनावणीला तोंड द्यायला लागणार, हा विचार माझ्यासाठी असह्य आहे.”

पायरो हळूवारपणे बोलला, “फार त्रास करून घेऊ नका. ही गोष्ट या थराला जाणार नाही. डॉकटर मला सांगत आहेत की तिला हृदयाचा खूप जास्त त्रास आहे. ती फार आठवडे जगणार नाही.”

रुथने एक फुल तोडून उगीचच तिच्या गालावर चुरडले. “हे ऐकून मला बरे वाटले. बिचारी बाई! मला नवल वाटते, तिने असे का केले ---“

---- समाप्त----

# अनुवादिकेची ओळख

## डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे अठ्ठाविस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके






















## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके





ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)









वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-२

वृषाली जोशी
विश्वकथा-३

वृषाली जोशी
विश्वकथा-४

वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov

वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY

वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे अठ्ठाविसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू

गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१५), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३), रामदास खरे, अतुल देशपांडे, श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।